

# राजकीय पक्षांचे सीमोल्लंघन ?

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २९ ऑक्टोबर २०२३



**दसरा सण हा आनंदाचा सण आहे. या दिवशी विचारांचे सोने लुटता यावे, माणसांनी अंहकार,अनिष्ट प्रथा, कपटीपणा, दुष्ट विचार सोडून द्यावेत. या सणामागचा उद्देश आहे. पण यादिवशी ठाकरे व शिंदे या दोन्ही गटांनी एकमेकाच्या दसऱ्या मेळाव्यात शिव्यांची लाखोळी वाहिली. दुसरीकडे पंतप्रधान मोदीनी देशासाठी नवीन संकल्प घेण्याचे आवाहन केले. तर नागपूर येथे राष्ट्रीय स्वंयसेवक सरसंघचालक मोहन भागवत यांनी देशात राजकीय पक्ष समाजात फूट पाडत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. या निमित्ताने राजकीय नेत्यांनी निमित्ताने मराठा आरक्षणाचा प्रश्न उपस्थित केला. पण हा प्रश्न कसा सुटणार? याचे कोणाकडे उत्तर नाही.**

मनसे नेते राज ठाकरेंनी राजकीय गोंधळावर भाष्य केले होते. यात दोन पक्ष सत्तेतही आहेत आणि विरोधी पक्षात आहेत, असे म्हणाले! त्यांचे हे विधान शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीवरचे आहे. पण आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. देशातील राजकारणात आश्चर्यकारक घटना घडल्या आहेत. राष्ट्रीय काँग्रेसचे पक्षात १९६९ व १९७८मध्ये दोन वेळेस विभाजन झाले. तेव्हा काँग्रेस (आर) काँग्रेस (ओ) दोन गट सरळ पडले होते. तेव्हा सिंडीकेट काँग्रेस व इंडीकेट काँग्रेस म्हटले जायचे! इतकेच नव्हे, तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींमुळे काँग्रेस पक्षाचा राष्ट्रपतीपदाचा अधिकृत उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभूत झाला. त्यामुळे काँग्रेस राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष एस. निजलिंगप्पा यांनी श्रीमती गांधी यांना पक्ष शिस्तभंगावरुन पक्षातून काढून टाकले होते. त्यानंतर आणीबाणीनंतर पुन्हा. १९७८ मध्ये पुन्हा काँग्रेस (रेड्डी)व काँग्रेस (इंदिरा ) असे दोन गट पडले. देशात व राज्य पातळीवर काँग्रेस विरूध्द काँग्रेस असे दंड थोपटून राहिलेला होता. काँग्रेसने १९६९ मध्ये मर्यादाचे, विचाराचे सीमोल्लंघन केले आहे, पक्षाचे विभाजनास हे कारण आहे असे का घडते? जेव्हा पक्षातील लोकशाही, नितीमत्ता, त्याग लूप्त पावतो. जेव्हा पक्ष एका परिवाराच्या दावणीला बांधला गेला की, त्यातून मालकशाही, हुजरेगिरी, एकाधिकारशाही सुरू होते.काँग्रेसमध्ये जे घडले तेच आता शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे घडलेले आहे.देशात बहुतांश प्रादेशिक पक्ष एका परिवारांकडे आहेत, हे दुर्देव नाही काय? महाराष्ट्रात राज ठाकरे शिवसेना व शरद पवार यांनी काँग्रेसमधील एकाधिकारशाही विरोधात बंड केले नाही काय? त्यांनी नवीन पक्ष स्थापन केला, त्यांना राजकीय यश फारसे मिळालेले नाही. दुसरीकडे शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी तेच केले आहे. पण त्यांनी पक्षावर आपला बहुमताचा दावा केला. याबाबत निवडणूक आयोग व सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. यापूर्वी समाजवादी पक्षात मुलायमसिंह (बाप) व अखिलेस यादव (मुलगा) पक्षाच्या मालकीवर वाद झाला होता. पण लोकशाहीत राजकीय पक्ष एका परिवारांच्या मालकीचा कसा काय असू शकतो? ती राजसत्ता आहे काय? गादीची वंशपरंपरा आहे काय? वास्तविक पक्ष वाढीसाठी अनेक नेते नेते व सामान्य कार्यकर्त्यांनी घाम गाळतात! रक्त सांडलेले असताना! त्यांचा विसर का होतो? मग त्यांचा पक्षावर अधिकार नाही काय? केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हणून शिंदे गटाला शिवसेना व चिन्ह देण्याचा बहुमताच्या आधारावर निर्णय दिला. पण ठाकरे गटाला ते मान्य नाही.ते निवडणूक आयोगाच्या निकालाच्या विरोधात न्यायालयात गेले आहेत. यात शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या अपात्रते बाबत सुनावणी विधानसभाध्यक्षाकडे चालू आहे. केंद्रीय निवडणूक आयोग व विधानसभा अध्यक्षांना घटनात्मक अधिकार आहेत, पण त्यावर सर्वोच्च टिप्पणी केली. यात सर्वोच्च न्यायालयांकडून मर्यादेचे सीमोल्लंघन होणार नाही, असे अपेक्षा करू या! मोदी गुजरात मुख्यमंत्री असताना राज ठाकरे गुजरात दौऱ्यावर जाउन आले. त्यानंतर त्यांनी गुजरात विकास मॉडेलची स्तुती केली. पण अचानकपणे त्यांनी भूमिका बदलली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मनसेचा एकही उमेदवार उभा नसतानाही मोदी व शहा नेत्यांचे नेतृत्वाला पराभूत करावे, यासाठी राज ठाकरे यांनी 'लाव रे व्हिडिओ' म्हणत राज्यात अनेक सभा घेतल्या त्यांचा मतदारांवर काही परिणाम झाला काय? याचा काँग्रेसला फायदा मिळणार होता ना! शेवटी मतदार जागृत आहे तो निर्णय घेत असतो. ठाकरे यांनी राष्ट्रीय पातळीवर भाजपाचे, राज्यातील राजकारण मान्य नाही. त्यामुळे मनसे २०२४ ची लोकसभा व विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र लढवतील, असे दिसतेय!




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दि.३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवसेनाचा पहिला दसरा मेळावा घेतला होता.याचा उद्देश या निमित्ताने विचाराचे सोने लुटता आले पाहिजे.तसेचसेनेच्या सामान्य कार्यकर्त्याशी संवाद व पक्षाची भूमिका समजली पाहिजे, त्यावेळी राजकीय पक्षावर टीका करत असत! त्यांचे राजकीय भूमिका विचार ऐकण्यासाठी केवळ कार्यकर्ता नव्हे सामान्य लोकांची गर्दी होत असे. ती परंपरा बरेच दिवस चालत आली आहे. वास्तविक दसऱ्या मेळाव्यात राजकीय नेत्यांनी यश अपयशावर आत्मचिंतन केले पाहिजे. पण शिवसेनेच्या फुटीनंतर दोन्ही गट शिंदे गट व उध्दव ठाकरे स्वंतत्र दसरा मेळावा घेत आहेत! म्हणे! ठाकरे तोफ गरजणार! ते काय बोलतील याकडे लक्ष? पण आताचे सेनेचा मेळावा म्हणजे रडगाणे, त्यात शिव्यांची लाखाळी! महाराष्ट्रातील राजकारणात सुस्कंतपणा राहिलेला नाही. राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी राजकीय नेत्यांना बेरजेच्या राजकारणाचे धडे दिले. कराडचे यशवंतराव चव्हाण व आनंदराव चव्हाण हे दिग्गज नेते होते. त्यांनी राजकारणात कुरघोडीचा खेळ खेळला, पण त्याचा जनतेवर विकासावर परिणाम होणार नाही, याची त्यांना जाणीव होती.आजच्या राजकीय नेत्यांना याचे भान आहे काय? पक्ष मेळाव्यात विरोधकांनी टीका करणे गैर नाही. यासाठी भाषेचे ज्ञान व शब्दांच्या कोटी करता आल्या पाहिजेत. शस्त्रापेक्षा शब्दाचे बाण तीक्ष्ण असतात ते शत्रूंना घायाळ करतात! ठाकरेंकडे धनुष्य व शब्दाचे बाण नाहीत. त्यांचेकडे कोपरखळ्या व शालीतून जोडे भाषणशैली नाही. आज शिंदेगट स्वतंत्र मेळावा घेत असले तरी ते ठाकरे कुटुंबाचा आदर्श, विचार लोकांसमोर मांडत आहेत, मग त्याला विरोध कशाकरिता? यात गद्दार कोण? खर तर! उध्दव ठाकरे यांनीच प्रथम २०१९ मध्ये जनतेच्या मताशी गद्दारी केली. त्यांनी भाजपा व सेना युतीच्या नावावर मताचा जोगवा मागितला होता. स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी सत्ता व खूर्चीपेक्षा हिंदूत्वाला महत्व दिले. ते काँग्रेस विचार, धोरणाच्या विरोधात होते. याच काँग्रेस पक्षाने संयुक्त महाराष्ट्राला विरोध करत १०७ जणांचा बळी घेतला! हा पक्ष राम मंदिर उभारणीच्या विरोधात होता! आजही इंडिया आघाडी ही सनातन हिंदू धर्म नष्ट करण्याची, अशी भाषा करत आहेतआज बाळासाहेब हयात असते तर हे सहन केले असते का? उध्दवजी आपण खूर्चीसाठी युती तोडली.तेंव्हा शिवसेना प्रमुख बाळासाहेब व उध्दव ठाकरे शिवसेनेच्या विचारात हा फरक आहे. उध्दवजी पक्ष कार्यकर्त्यावर स्वत:चे विचार लादत आहेत. जालना लाठीमाराचा आदेश जनरल डायर कोण आहे? असा प्रश्न विचारला. मग पालघर येथे संताची क्रूरपणे हत्या व मुंबईत निष्पाप व्यापाऱ्यांची हत्येची सूपारी देणारा डायर नेता कोण होता, तसेच कोवीड काळात रुग्णांच्या नावावर कोट्यवधी भ्रष्टाचार गिधाडे कोणाचे संरक्षण होते? यावर दातखीळी बसते. उध्दव ठाकरेंना शिवसेना पक्ष हा कायम परिवारांकडे राहावा, यासाठी धडपड चालू आहे. कारण देशात व राज्यात राजकारण व सत्ता हे कमाईचे साधन बनले आहे. राजकारणी कोट्यधीश बनले आहेत! दुसऱ्याला खोके म्हणून हिणवता कंटनेरने पैसे घेतले जातात, मग आरोप शिंदे व नारायण राणे यांनी आरोप केला तर त्याचे उत्तर आहे काय? तेव्हा ठाकरे स्वतः चिखलात दगड मारुन अंगावर शिंतोडे उडवून घेत आहेत. उध्दवजी ठाकरे यांनी विचारांचे सीमोल्लंघन केल्यानेच शिवसेनेत फूट पडली आहे. त्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवारांच्या संमतीने राज्यात भाजपाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला गेला होता. पण त्यांनी ते गुपीत ठेवले. नंतर अचानकपणे स्वतः पक्षाचा निर्णय फिरवला आणि अजितदादांना तोंडघशी पाडले. राज्यात समविचारी पक्ष एकत्र असे राजकीय उपदेश देणारे पवारांनी शिवसेनेशी राजकीय घरोबा कसा काय केला? पवारांनी घेतलेली भूमिका योग्य होती, तर मग आता दादांनी घेतली भूमिका मात्र अयोग्य कशी काय ? यात शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाच्या मर्यादाचे सीमोल्लंघन केल्यामुळे पक्ष फुटला आहे.ज्यांनी बंडाचे बी पेरले तेच उगवले आहे. बीड जिल्ह्यात भाजपा नेत्या पंकजा मुंडे दरवर्षी दसऱ्यानिमित्ताने सभा घेवून आपल्या कार्यकर्त्यांना भावनिक साद घालतात! काँग्रेसधार्जिण्या पत्रकारांना मात्र पंकजा मुंडे भाजपावर नाराज आहेत असे सतत सांगत होते. त्या भाजपाच्या विरोधात काय बोलतात? यासाठी काही पत्रकार टपून बसलेले होते.भाजपाच्या ओ.बी.सी. 'व्होट बँके'ला छेद देण्याचा काँग्रेसी अजेंडा पत्रकार चालवत होते. पण त्यांची यावर्षी निराशा झाली आहे. ठाकरे व शिंदे व मुंडे या नेत्यांनी मराठा, ओबीसीचा प्रश्न उपस्थित केला. ठाकरे यांना सत्ता असताना मराठा आरक्षण टिकवता आले नाही. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ५० वर्षे मराठा समाजाला आरक्षण देता आले नाही. शिंदे सरकारने मात्र तातडीने आरक्षणाचा निर्णय घेतला घेतला अशी मागणी करत आहेत! कारण आरक्षण देणे तितेके सोपे नाही, हे विरोधकांना माहित आहे. कारण त्यात कायदेशीर व घटनात्मक तरतुदीनुसार अडचणी आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्ष राज्यात भाजपाच्या विरोधात वातावरण व्हावे यासाठी आगीत तेल ओतण्याचे काम चालू आहे. ते मराठा तरुणांना भडकवित आहेत. आता महाराष्ट्र सरकारने पुन्हा सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली आहे. ती न्यायालयाने मान्य केली आहे. राज्य सरकारकडे सर्वोच्च न्यायालयाशिवाय दुसरा पर्याय नाही. तोपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल! यात शिंदे सरकारने जरांगे यांना ४० दिवसाची मुदत दिली, ती का दिली? त्यामुळे ते जरांगे हे हट्टाला पेटले आहेत. तेव्हा रक्षणाचा प्रश्नाबाबत टोकाची घेवून प्रश्न सुटणारा नाही. यामुळे रोज तरूण आत्महत्या करत आहेत. प्रथम राज्य सरकार व आंदोलनकर्ते यांचेत विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे. कारण संवादातून यातून मार्ग निघू शकतो! सर्व पक्षांना 'व्होट बँक'ची चिंता आहे. राज्यात इतर समाजातील कुटुंब दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहे. राज्याचे जाणता राजा यांनी तर आर्थिक निकषांवर आरक्षण देण्याची भूमिका मांडली होती.यात ब्राह्मण समाज आहे. तो गरीब आहे हे पाहिले जात नाही. त्याची जात पाहून शासकीय योजनेचा लाभ दिला जात नाही. या समाजाकडे शेती राहिलेली नाही. ब्राह्मण कुटुंबांनी गाव सोडावे, ते इतरत्र स्थलांतरित होत आहेत. तो आरक्षण मागत नाही. आर्थिक महामंडळ स्थापन करण्याची मागणी करतोय. याबाबत राज्य सरकारला काय अडचण आहे. या समाजाची पत्रावर बोळवण केली. याचा अर्थ 'जिसकी लाठी उसकी भैंस' असे चालले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे दसरानिमित्त नागपूर येथे शस्त्रपूजन व पथसंचलन कार्यक्रम होत असतो. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे प्रसिध्द गायक शंकर महादेवन हे होते. सरसंघचालक भागवत यांनी देशातील राजकारणावर चिंता व्यक्त केली. देशात २०२४ च्या निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय पक्ष भावना भडवून सामाजात फूट प्रयत्न करत आहे. यावर त्यांनी राजकीय पक्षावर टीका केली. राजकीय स्वार्थासाठी व प्रतिस्पर्ध्याला पराभूत करण्यासाठी अनिष्ट शक्तीशी हातमिळविणी केली जात आहे, अशी कोपरखळी मारली.मणिपूरमध्ये मैतई व कुकी समाजात संघर्षाचे कारण काय? तेथे हिंसाचार घडविला जात आहे. याचा कोणाला फायदा होणार आहे? राज्यात सीमापलिकडून अतिरेकी संघटनांचे षडयंत्र आहे काय? याचा शोध घेतला गेला पाहिजे. जानेवारीत आयोध्यात प्रभूरामचंद्राची प्रतिष्ठापणा व मंदिराचे उदघाटन होणार आहे. निमित्ताने संघाने देशात प्रत्येक गावात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आवाहन केले गेले आहे. त्यामुळे २०२४ निवडणुकीपूर्वी राम मंदिरावरुन राजकीय वादळ उठणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच दसऱ्या निमित्ताने भारतीय जनतेला नवीन संकल्प करण्याचे आवाहन केले. त्यांनी रावणाचे दहन हे त्या प्रवृत्तीचे दहन आहे. आज जातीच्या व प्रादेशिक प्रश्नावरुन भारत मातेचे विभाजन करण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशा शब्दात त्यांनी विरोधकांच्या भूमिकेवर टीका केली. देशात भविष्यात येणारे पाणी संकट लक्षात घेता, तेव्हा नवीन पिढीला पाण्याची बचत करण्याचे शिकविले पाहिजे. तसेच प्रत्येकाने आर्थिक व्यवहार डिझिटल पध्दतीने केला पाहिजे. गाव व शहरात स्वच्छतेवर भर, योग खेळ, प्रकृतीकडे लक्ष दिले पाहिजे. किमान प्रत्येकाने एका गरीब कुटुंबाला, शक्ती व बळ देण्याचे काम केले पाहिजे. पंतप्रधान मोदींनी देशातील जनतेला नवीन संकल्प करण्याचे आवाहन केले ते मीडियाला देशाच्यादृष्टीने महत्वाचे वाटले नाही. देशात मिडीया राजकीय आरोप-प्रत्यारोप, गुन्हेगारीच्या घटना, खळबळजनक, भडक, ब्रेकींग न्यूज देण्यावर भर असतो.देशात जणू चांगले घडत नाही, असे दाखविले जातेय! तेव्हा पत्रकारांनी सकारात्मक व विकासाच्या वृत्ताला प्राधान्य दिले पाहिजे. पण आज देशात पत्रकारांनी धर्म विसरला आहे. कारण तो व्यवसाय बनला आहे. तिसरी व सत्य बाजू मांडण्याचे धाडस त्यांच्यात राहिलेले नाही. तो सुध्दा आपला धर्माचे, मर्यादेचे सीमोल्लंघन करत आहे. त्यामुळे भारतीय जनतेचा त्यांचेवरचा विश्वास उडत चालला आहे.

मांडणी व सजावट
अतुल खंडगावकर






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मैत्रीचे नाते जगातल्या सर्वात सुंदर नात्यांपैकी एक आहे. कुठलेही बंधन नाही, रक्ताचे नाते नाही तरीही जीवाला जीव देणारे मित्र ज्याला भेटतात ती व्यक्ती भाग्यवान! पण कधी काही कारणांनी हे मित्र दुरावतात किंवा शरीराने लांब जातात. फुले नित्य फुलतात आणि ज्योती अखंड जळतात आयुष्याचेही असेच आहे, चांगली माणसे नकळत मिळतात. नाते तोडायला एक क्षणही पुरेसा असतो पण जोडून ठेवणं हा आयुष्यभराचा खेळ असतो. मनाने जोडलेल्या नात्याला सतत भेटण्याची गरज नसते. आपल्या जवळच्यांच्या चेहेऱ्यावर हसू फुलवण्यासाठी त्यांची एक आठवणही पुरेशी असते. कधी कधी आपण त्या खास व्यक्तीला मिस करत नसतो तर आपण त्यांच्याबरोबर घालवलेल्या सुंदर क्षणांना मिस करत असतो. डोळ्यांतले अश्रू लपवण्याच्या प्रयत्नांत मी स्वतःलाच दोष देत राहतो आणि या खोट्या प्रयत्नांत तुझी आठवण अधिक तीव्रतेने येतच राहते. माझे दुःख, विरह, अश्रू हे तुझ्यापासून सगळेच कसे बरे आहे अजाणते तुझ्या विश्वात तू आहेस रममाण आणि केवळ आसवांचे देणे माझ्या नशिबी येते. आठवणी सांभाळून ठेवणे खूप सोपे असते कारण त्या मनात नीट जपून ठेवता येतात. पण एक एक क्षण सांभाळणे खूप कठीण असते कारण याच क्षणांच्या नंतर आठवणी तयार होतात. हल्ली WHATSAPP आणि सोशल मीडियामुळे आपल्या भावना दुसऱ्यांपर्यंत पोचवणे सोपे झाले आहे. राग आला असेल तर पाठवा इमोजी, समोरच्याला हसवायचे असेल तर पाठवा एखादे MEME आणि कुणाची खूप आठवण येत असेल तर त्याच्यासाठी खास स्टेटस ठेवता येते. तुम्हालाही तुमच्या भावना व्यक्त करायला स्टेटस ठेवायचे असेल तर खालील मराठी आठवण स्टेटस मधून एखादे छानसे स्टेटस निवडा. तुझी आठवण ही कस्तुरीसारखी आहे. जी कधीच साथ सोडत नाही पण सतत माझ्या मनात दरवळत असते आणि मला हवीहवीशी वाटते. माझ्या सुन्या मैफिलीत आज अंधार दाटला होता, भूतकाळातील आठवणींना आज पाझर फुटला होता.. येणारा रोजचा दिवस कधीच तुझ्या आठवणींशिवाय येत नाही.. दिवस जरी निघून गेला तरी तुझी आठवण मात्र जात नाही. माझ्या डोळ्यांतून वाहणारा प्रत्येक अश्रू हा तुझ्याच शोधात निघतो आणि नकळत तुझ्याच आठवणींच्या गावात हरवतो. संध्याकाळी, कातर वेळी अचानक या हृदयात धडधड झाली डोळे पाण्याने भरले आणि पुन्हा तुझी आठवण आली का कोण जाणे पण आज तुझी खूप आठवण येते आहे माझ्या आयुष्यात तुझी कमतरता आणखी तीव्रतेने भासते आहे.






## आनंदी पहाट

# आत्मसंवाद आत्मिक आनंद प्रदान करतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनेकदा आपलं व्यक्तं होणं आपल्या गप्प राहण्यांतून देखील काही विशिष्ट प्रकारे सूचित करू शकतं. काहीवेळा मूक संवादाचं आश्चर्य वाटतं. अर्थात, मूक असेल तर तो संवाद कसा आणि संवाद असेल तर अव्यक्त कसा? असा प्रश्न पडणं स्वाभाविक आले. त्यामुळे अनेकदा होणारा विचार आणि कृती एकांगी होण्याचीच अधिक शक्यता असते. प्रत्येक व्यक्ती सतत स्वतःशी संवाद साधत असते. आपण आपल्या विवेकी बुद्धीच्या जोरावर प्रत्येक प्रसंगाचं मूल्यमापन करीत असतो, त्या अनुषंगानं आपण संबंधित निर्णय घेत असतो. यामध्ये आपण स्वतःशीच संवाद साधत असतो, स्वतःलाच प्रश्न विचारतो, त्याची स्वतःच उत्तरं देतो. यांत संप्रेषकाची, श्रोत्याची अशा दोन्हीही भूमिका आपण एकटेच बजावत असतो. आपल्या आत्मसंवादाच्या प्रक्रियेत एक आणि केवळ एकच व्यक्ती सामील झालेली असते. दोन व्यक्तींमधील संवादात सहसा तिसरी व्यक्ती सामील झालेली नसते. हा संवाद व्यक्तिगत, थेट आणि निकटता निर्माण करणारा असतो, ज्यात शब्द, देहबोली यांचा अंतर्भाव असतो. या संवादामुळे व्यक्तीचं मन वळवणे, एखाद्यावर प्रभाव निर्माण करणे शक्य होतं. या संवादामध्ये मौखिक, अमौखिक संवाद शक्य असतो. त्याचबरोबर अशा संवादात तात्काळ प्रतिसादही मिळत जातो. समूह संवादात, संप्रेषक आणि श्रोता यांचा थेट संवाद प्रस्थापित न होता तो एखाद्या जनसंवाद माध्यमाद्वारे प्रस्थापित होतो. हा थेट संवाद नसल्यामुळे संप्रेषक आणि श्रोता एकमेकांना ओळखत नाहीत, त्यामुळे संवादाचा म्हणावा तसा प्रभाव श्रोत्यांवर पडत नाही आणि श्रोत्यांची प्रतिक्रिया देखील संप्रेषकाकडे उशिरा पोह्चते.

# दान...

आधुनिक केसरी

दानधर्म केल्याने पुण्य संचायात भर पडते असे आमचे बुजुर्ग सांगतात. त्यासाठी दानशूर उदार कर्णाचे उदाहरण देता येईल. दान करण्यासाठी खूप पैसा अडका आपल्याकडे असावा असं काहीच नाही. खूप श्रीमंत असावं असंही नाही. त्यासाठी हवी फक्त दान करण्याची वृत्ती.. अगदी साधं उदाहरण घेता येईल, मंदिरात जाताना अगदी लहान वाटी शोधून त्यात साखर घेतात. त्यापेक्षा घेऊच नका? देव कशाचाच भूकेला नाही! तो फक्त भक्तीचा भुकेला आहे. ती सुद्धा निःस्वार्थ भक्ती. दान फक्त पैसे वस्तूचे करता येते असे नाही.

## संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.२२

तुम्ही सेवेचे दान करू शकता. ज्ञानदानासारखे पवित्र कार्य दुसरे नाही. गोड शब्द बोलण्याचे सुद्धा दानच आहे. आणि आपण कमावलेल्या पैशात 30 टक्के नाही तर निदान दहा टक्के तरी हिस्सा समाजाचा असतो एवढं समजलं तरी दानक वृत्ती आपोआप येईल. खूप लोक दानधर्म करतात. परंतु दान केल्यानंतर ते व्यर्थ जायला नको. तुम्ही एखाद्या बेवड्याला रोज शंभर रुपये देता, तो घरी जातच नाही! ते शंभर रुपये इकडेच खर्च करतो. मग त्या दानाचा उपयोग काय?? कोणी आजारी आहे, कोणी उपाशी आहे, कोणाच्या पायात भर उन्हात चप्पल नाहीये, कोणाला फी भरायला पैसे नाही, कोणाला अंगभर कपडे नाही अशांना शक्य होईल तेवढी मदत करा. सहानुभूती नको, सहाय्य करा .दानशूर कर्ण, तुकाराम महाराज होणे आपल्याला शक्य नाही. पण आपल्याकडे बघून निदान कोणीतरी म्हणावं, उदार मनाचा आहे बरं का!! नेहमी मदत करतात ,नाही कधी म्हणतच नाही .फक्त घेण्याची वृत्ती नको. आपल्याजवळ जे काही चांगलं असेल, मग तो वेळ, पैसा ,मदत, चांगले विचार, गोड बोलणं, भेट देणं काही का असेना ते आपण दान करूया... श्रीमंता पेक्षा गरीब लोकांकडे दानत वृत्ती जास्त प्रमाणात असते. कारण श्रीमंतांना गरिबाला दान करावं, गरजूंना दान करावं असं कधी वाटतच नाही. श्रीमंत हे फक्त श्रीमंतांना दान करतात. त्यांनाच जेवू, खाऊ घालतील, कपडे करतील, आदर सत्कार करतील, पुरस्कार देतील. कशासाठी हे सगळं?? त्याचा काहीच उपयोग होत नाही आपल्या जीवनात. अरे जे खरंच गरीब आहेत, रंक आहेत, जर्जर आहेत, रंजलेले आहेत अशांना आपल्या मदतीची गरज असते. त्यांच्या वेळेला त्यांना मदत केली तर परमेश्वरला देखील ती आवडेल. कारण त्याला हेच तर हवं असतं! आपली हीच भक्ती त्याला आवडत असते. जिथे कुठे कुणाला आपली गरज आहे तिथे जाऊन आपण अवश्य मदत करावी. कारण देव सुद्धा त्याच्या भक्तांसाठी मंदिरात न राहता तो दीनदुबळ्यांमध्ये



जाऊन राहतो. ज्यांना त्याची गरज आहे त्याच्याकडे तो धाव घेतो. आपण खूप मोठे विचारवंत असाल, शिकलेले असाल, नोकरदार असाल, पगारदार असाल, गर्भश्रीमंत असाल पण जर आपण दुसऱ्यांच्या उपयोगी पडत नसेल तर आपला काय उपयोग?? धोत्र्याच्या फुलासारखं!!!! निरोपयोगी आणि निरोपद्रवी राहण्यापेक्षा कुणाच्या तरी उपयोगी यावं हेच आपल्या आयुष्याचं जीवनातील खूप मोठे यश आहे. फुल नाही तर निदान फुलाच्या पाकळीची तरी मदत आपल्याकडून कोणाला होईल असं बघावं. आणि ती करावीच. घरासाठी कितीही राबलं तरी आयुष्याच्या उतार वयात त्याचा काही उपयोग होत नाही .घरातील वृद्धांना झुरळासारखं झटकल्या जातं काही ठिकाणी. ज्यांच्यासाठी खूप पैसा कमवून ठेवला त्यांच्याकडून.

त्यापेक्षा दान धर्म करा. चांगलं कार्य करा. ते व्याजासहित तुम्हाला परत मिळेल. दान केल्यानंतर आपल्याला जो आनंद होतो तो घेण्याने कधीच होत नाही... अनुभव घेऊ या...

# निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

देवा सोडविसी येथून ।तरी मी स्वहित करीन ।
गर्भवास हा चुकवीन ।पुन्हां न ये येथें ॥३५॥
ऐसी दुखवोन प्रतिज्ञा केली ।तंव जन्मवेळ पुढें
आली ।माता आक्रंदों लागली ।प्रसूतकाळीं
॥३६॥नाकीं तोंडीं बैसलें मांस ।मस्तकद्वारें
सांडी स्वास ।

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

बन्धे बन्धन नहिं कटे, कटे रहे निरबन्ध ।
अन्ध अन्ध नहिं ले चलै, दोनों हैं वे अन्ध
।।४९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम
अध्याय) ०२/०१/४९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जो स्वतः बंधनात आहे, तो दुसऱ्याला बंधनातून मुक्त करू शकत नाही. जो बंधनरहित म्हणजेच निर्बंध आहे तोच दुसऱ्याचे बंधन तोडू शकतो. एक आंधळा दुसऱ्या आंधळ्या बरोबर चालू शकत नाही, कारण दोघेही चक्षूहिन आहेत.

.............................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शारदीय नवरात्र (माळ सातवी)

आधुनिक केसरी

ऋषीमुनींनी अत्यंत संतोषने देवीच्या या अवताराचे स्वागत केले. राक्षसांचा संताप हा सर्व आनंद राक्षसांना कसा बरं बघवणार!!




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

त्यांच्या गोटात संतापाच्या लाटा उसळल्या संपूर्ण असुरसेना असुरक्षित अस्वस्थ झाले. त्यांना आपल्या अस्तित्वाची काळजी वाटू लागली. आपल्या सैन्या समोर सेनापती,सरदार, घोडेस्वार पायदळ एकत्रीत करून महिषासुर राक्षस म्हणाला की!!! "हे काय चालले आहे"
आम्ही पराक्रमी असुर इंद्रादी देव गणांना जिंकणारे, आमच्या अजिंक्य सैन्यासमोर हा जयोन्माद कोणाचा? तो रागावला होता की त्याचे सर्वांग रागाने थरथरत होते.रागाने अंगाची लाही लाही होत होती. त्याचे सगळे असुरगण देवीचा शोध घ्यायला निघाले. आणि काय आश्चर्य हो!!! त्रिलोकात अद्भूत अशी निर्भयपणाने देवांसमोर उभी असलेली दुर्गा पाहिली. दुर्गेच्या पावलाखाली धरती नतमस्तक झालेली, शिरावर अप्रतिम मुकुटात प्रभा अंबर तेजाची स्पर्धा करणारी, धनृष्याच्या टणत्कारानी सप्तपाताळांचा थरकाप उडवणारी गर्वोन्नत प्रत्यक्ष अपराजिता देवीमाता आपल्या हजारो बाहूंनी सर्व दिशा व्यापून टाकतं आहे. अशा या युध्दकांक्षिण्यैमातेला माझा वारंवार नमस्कार असो. असा जयजयकार देवगणांनी केला. त्रैलोक्याच्या या स्वामीनी देवगणांचा आधारस्तंभ शक्तिमान आई जगदंबा प्रत्यक्ष अवतरल्यावर कसली काळजी हो!!!

# संत हे भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात

आधुनिक केसरी

ज्याला सत्याचे ज्ञान झाले तो सर्वज्ञच बनला; आणि जे या सत्याला धरून राहतात ते संत होत. संत आपल्याला मार्ग दाखवायला तयार असतात, परंतु आपला अभिमान आड येतो, आणि आपण संतांना नावे ठेवतो. एकजण संतांना उद्देशून म्हणाला, "तुम्ही आमचे नुकसान करता; अपकार करणाऱ्यावरही उपकार करायला सांगून आम्हांला मेषपात्र करता." वास्तविक, आपल्या संतांनी कर्मांचा ढीग पाडला आहे, पण त्यांच्या आणि आपल्या कर्मांमध्ये फरक आहे.
'राम कर्ता' या भावनेने त्यांनी कर्म केले; आपण 'मी' पणाने करतो, म्हणून कर्म आपल्याला बंधनकारक बनते. संतांची कामगिरी कुणाला दिसत नाही; आणि आमची फक्त दिसण्यापुरतीच असते, त्यामुळे ती पुरी पडत नाही ! एखादा पुष्कळ ज्ञानी झाला, पण ते ज्ञान जर वृत्तीत उतरले नाही तर त्याचा काय उपयोग ? जगाचे खरे स्वरूप समजून घेण्यासाठी जो सुखदुःखाच्या जाळयात सापडला नाही त्याच्याकडे जावे. तो साक्षित्वाने राहून जगापासून अलिप्तच राहतो.



कर्म करूनही तो अलिप्त राहतो. आपण मात्र सुखदुःखात गुरफटून जातो. संताचे अंतःकरण शुद्ध असल्यामुळे त्याची शिव्यांची भाषासुद्धा न बोचणारी, किंबहुना आशीर्वाद रूपच ठरते. सत्पुरूष काही विद्वान् नसतात. अती विद्वान् मनुष्य कोणी सत्पुरूष झालेला ऐकिवात नाही. कुणी आठव्या वर्षीच घरातून निघून जातो, तर कुणी लग्नातून पळून जातो, तर कुणाला लिहायला वाचायलाही येत नाही, असे लोक सत्पुरूष झालेले आढळतात.

संतांनी देह सोडल्यावर सुद्धा लोकांना त्यांचे अस्तित्व भासते.
लहान मूल बाहेर खेळत असते, परंतु मध्येच त्याला आईची आठवण होऊन तिच्याकडे धावते. याचा अर्थ असा की, मुलाला आईचे सूक्ष्म स्मरण सतत असते. तसा भगवंताचा चटका, तशी त्याच्या अस्तित्वाची जाणीव, तशी त्याची निष्ठा, आपल्याजवळ पाहिजे. भगवंताची अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो. त्या स्थितीत त्याला कुणी संत भेटला की तो निवांत होतो. संत हे खरोखर आईसारखे आहेत. ते आपल्याला भगवंताची आठवण देण्याचे कार्य करीत असतात.
सर्व जगावर संतांचे उपकार आहेत. त्यांनी परमात्म्याला सगुणात आणले आणि तो आपल्याला सुसेव्य केला; परमात्म्याला आपलासा करून घ्यायला नामस्मरण हे सोपे साधन दिले; एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी, असे सोपे सद्ग्रंथ निर्माण केले; आणि यथाशक्ती अन्नदान करणे हेच कलियुगात उत्तम साधन आहे असे सांगितले. या चार गोष्टी आचरणात आणायचा प्रयत्न ज्याने केला, त्याला काही कमी पडणार नाही; नेहमी समाधानच राहील.

# जालिंदरनाथ



त्या नंतर अग्निदेवाने त्यांना गुरू दत्तात्रेय याच्या कडे आणले व जालिंदर नाथांना दीक्षा द्यावी असा अनुग्रह केला । अग्नी देवाच्या म्हणण्यानुसार गुरू दत्तने जालिंदर नाथान दीक्षा दिला सर्व विद्या, मंत्र, तंत्र, सिद्धी दिल्या व बद्रीनाथ येथे तपास बसविले. जालिंदर नाथ हे कानिफनाथ महाराजांचे गुरू आहेत. नाथांची संजीवनी समाधी बीड जिल्यातील येवलवाडी येथे आहे, नगर-शिरूर-बीड रोड वरती रायमोहा या गावा मधून प्रवेश करून येवल वाडी येथे जाता येते.

रविवार, २९ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ८४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 29 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-84 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# येणाऱ्या निवडणुकींचा मोदींना धसका


## शरद पवार : पंतप्रधान पद हे संविधानिक त्यामुळे या पदाची प्रतिष्ठा राखली पाहिजे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मी देशाचा कृषीमंत्री असताना देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला, असे प्रत्युत्तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आरोपाला दिली आहे. २००४ ते २०१४ या कार्यकाळात कृषीमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी काय काय निर्णय घेतले या संदर्भातील माहिती आयोजित पत्रकार परिषदेमध्ये पवार यांनी दिली.**

शरद पवार म्हणाले की, पंतप्रधानपद हे प्रतिष्ठेचे पद आहे. त्यामुळे त्यांनी माहिती देताना नीट द्यायला हवी. २००४ ते २०१४ मी कृषीमंत्री होतो. मी पदभार घेतला तेव्हा अमेरिकेतून गहू आयात करावा लागत होता. त्यानंतर आम्ही काही निर्णय घेतले. गहू, तांदूळ, सोयाबीन, कापूस यांच्या हमीभावात दुप्पट वाढ केली. २००४ ते २०१४ मध्ये अनेक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतले होते. शरद पवार साहेब पुढे म्हणाले, पंतप्रधान शिर्डीतील कार्यक्रमात काही मुद्दे मांडली आणि जी माहिती दिली ती वस्तुस्थीती पासून दूर असून पंतप्रधान हे पद संवैधानिक आहे. मला पंतप्रधानाची प्रतिमा राखायला हवी, असे वाटते. मी पंतप्रधानाच्या पदाची प्रतिमा राखून बोलणार आहे. २००४ ते २०१४ या कालावधीत देशाच्या कृषिमंत्री पदाची जबाबदारी माझ्याकडे होती. देशात २००४ मध्ये अन्नधान्याची टंचाई होती. शपथ घेतल्यानंतर पहिला दिवशी नाईलाजाने एक कटू निर्णय घ्यावा लागला. देशात अमेरिकेहून गहू आयात करावा लागला. देशातील साठा हा चांगल्या स्थितीत नव्हता. ती फाईल माझ्याकडे आली. मी त्या फाईलवर सही केली नव्हती. मी विचार करत होतो आणि मी अस्वस्थ होतो की, कृषीप्रधान देश म्हणायचा आणि परदेशातून धान्य आणण्याची ती फाईल माझ्याकडे पडून होती. दोन दिवसांनंतर तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा फोन आला. ३ ते ४ आठवड्यात आपल्यासमोर अडचण उभी राहू शकते, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे मी सही केली, असे शरद पवार म्हणाले. पवार म्हणाले की, त्यानंतर शेतकऱ्यांनी उत्पादन वाढीसाठी निर्णय घेतले.

त्यामध्ये हमी भावात भरीव वाढ कशी करता येईल. याचा निर्णय घेतला. गहू, तांदूळ, कापूस, सोयाबीन याच्या हमीभावात दुपटीपेक्षा जास्त वाढ केली गेली. याची आकडेवारीच शरद पवार यांनी सविस्तरपणे मांडली. या सगळ्यांच्या किमतीत किमान १५० ते २५० टक्के वाढ झाल्याची माहिती पवार यांनी दिली. याचबरोबर शेतीसाठी एनएचएन या योजनेचा निर्णय घेतला. फळ बागांसाठी त्याचा फायदा झाला. या योजनेचा आढावा घेतला तर देशाच्या कृषी क्षेत्राचा चेहरा मोहरा यामुळे बदलला गेल्याचे दिसून येईल. अन्न धान्याबद्दल ठराविक राज्यांचा उल्लेख केला जायचा. मात्र ईशान्येकडील जो पट्टा होता त्याचा उल्लेख होत नसे. त्यामध्ये आसाम, बिहार, छत्तीसगड, ओडिशा, पूर्वांचल यामध्ये भात पिक होते. त्यावेळी या राज्यांना भरीव मदत करुन देशातील उत्पादन १०० लाख टनाच्या वर नेऊन दुसरी हरितक्रांती केली गेली. शहरी भाजी पाल्यासाठी योजना राबवली. नॅशनल फिशरिज डेव्हलपमेंट बोर्ड २००६ साली स्थापन केले. त्याचा फायदा होत आहे. शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाले.माझ्या कार्यकाळात देशातील शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय झाले असेही शरद पवार यांनी म्हटले आहे. २००४ ते २०१३-१४ या कार्यकाळात शेतमालाला दिलेल्या हमी भावाची यादीच शरद पवार यांनी वाचून दाखवली. इतकेच नाही तर २००४ मध्ये आपल्याला अन्नधान्य आयात करावे लागत होते. माझ्या कार्यकाळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ६२ हजार कोटीची कर्ज माफी करण्यात आली होती. मस्यपालनासाठी वेगळ्या महामंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आमच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना चांगला हमीभाव मिळाला होता. शेतकऱ्यांना दिलेल्या अनुदानाचा फायदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना झाला होता. मी देत असलेली आकडेवारी ही केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी आहे. मी कृषीमंत्री असताना नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन सुरू केले होते. यातून भाजीपाला उत्पादन वाढ झाली होती असे शरद पवार म्हणाले.



## पुढाऱ्यांना बंदी घाला, राज्यभर साखळी उपोषण करा; आंतरवालीतून जरांगेंचा यल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** ज्यांना शक्य आहे त्यांनी उद्यापासून आमरण उपोषण करावे, इतरांनी पाणी पिऊन साखळी उपोषण करावे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले आहे. या उपोषणादरम्यान कुणाला काही झाल्यास त्याची जबाबदारी राज्य सरकारची असेल अशा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. त्यामुळे रविवारपासून राज्यातील वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारला दिलेली वेळ संपली आहे. त्यानंतर आता जरांगे यांनी आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. जालन्यातील आंतरवाली सराटी या ठिकाणी त्यांनी आंदोलन सुरू केले असून आता यापुढे अन्न,



पाणीच काय तर उपचारही घेणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यानंतर आता या आंदोलनाचे लोन राज्यभर पसरताना दिसत आहे. याचाच भाग म्हणून राज्यभर आरक्षणासाठी आंदोलन सुरू करण्याचं आवाहन त्यांनी केले आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, गावागावात आता पुढाऱ्यांना बंदी करा. ते इकडे येऊन काय करणार आहेत. त्या आमदारांनी मुंबईत जाऊन मराठा आरक्षणावर आवाज उठवावा. आमची मुले मरत असताना तुम्ही मजा बघू नका, जरा गांभीर्याने घ्या, अन्यथा झेपणार नाही. ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी आमरण उपोषण सुरू करावे आणि इतरांनी पाणी पिऊन साखळी उपोषण करावे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले आहे. या आंदोलनाच्या दरम्यान जर कुणाला काही झाले तर त्याला राज्य सरकार जबाबदार असेल असा इशाराही त्यांनी दिला.

### आंबेजोगाईत तरूणाची आत्महत्या

मराठा आरक्षणासाठी आंदोलनाचे लोण गावागावात पोहोचले. मराठा आंदोलक आज विविध ठिकाणी चांगलेच आक्रमक झाले. आंबेजोगाई तालुक्यात मराठा आंदोलकाने टाकीवरून उडी मारत आत्महत्या केली. त्यामुळे संतापलेल्या आंदोलकांनी मृतदेह समोर ठेवत आंबेजोगाईत आंदोलन केले. तर लातूर जिल्ह्यात मांजरा नदीपात्रात जलसमाधी आंदोलन केले. परभणीत नेत्यांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. तर बीड जिल्ह्यातला एक युवक लोटांगण घालत मनोज जरांगेंच्या भेटीला पोहोचला.

### 40 जण मोबाईलच्या टॉवरवर चढले

राज्यात मराठा आंदोलकांच्या आंदोलनाला धार आणखी वाढली आहे. जालन्यात ठिकठिकाणी मराठा समाजाचे आंदोलन सुरु आहे .जालना–छत्रपती संभाजीनगर मार्गावर मराठा आंदोलकांनी चक्का जाम आंदोलन केले. आरक्षणाची मागणी करत आंदोलकांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. दुसरीकडे रोहिलागड गावात 40 जणांनी मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन केले. मराठा आरक्षणाचा जीआर काढून मनोज जरांगेंचे आंदोलन थांबवावे अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

## प्रधानमंत्री पीकविमा शेतकऱ्यांच्या नाही तर मोदींच्या मित्रांच्या फायद्यासाठी

### नाना पटोले : केळी व कापूस उत्पादक अडचणीत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील भाजपा सरकार शेतकऱ्यांसाठी एक



रुपयात पीकविमा योजना सुरु केल्याचा ढोल बडवत आहे पण ते खरे नाही. राज्य सरकार शेतकऱ्यांचा हप्ता विमा कंपन्यांना देते. केंद्र व राज्य सरकार जो पैसा विमा कंपन्यांना देतात तो जनतेचाच पैसा असून प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी सरकारने हजारो कोटी रुपये भरले आहेत. आज राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे, राज्य सरकाने सोयाबिनच्या नुकसान भरपाईपोटी २५ टक्के शेतकऱ्यांना द्यावेत असे पत्र वीमा कंपन्यांना दिले पण ते पत्र या विमा कंपन्यानी केराच्या टोपलीत टाकले. विमा कंपन्या सरकारला भीक घालत नाहीत. प्रधानमंत्री पीक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या नाही तर पंतप्रधान मोदींच्या मित्रांच्या फायद्यासाठी आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले जळगाव येथे प्रसार माध्यमांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जळगाव भागातील केळी उत्पादक व कापूस उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या अडचणीत आहे. केळीला भाव मिळत नाही तर दुसरे म्हणजे केळीवर पडलेला रोग, यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. या भागातील शेतकऱ्यांनी याप्रश्नी आंदोलनही केले पण भाजपा सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. सरकारने याप्रश्नी तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन पुढील पंधरवड्यात राज्यातील प्रत्येक तालुका व जिल्ह्यात काँग्रेस पक्ष आंदोलन करणार आहे. २०१४ साली नरेंद्र मोदी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन देऊन सत्तेत आले पण मागील १० वर्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले नाही पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या मात्र दहापट वाढल्या आहेत.

**मी पुन्हा येणार :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'मी पुन्हा येईन'च्या ट्वीटवर प्रतिक्रीया देताना नाना पटोले म्हणाले की, मी पुन्हा येईनची क्लीप एका तासात डिलीट करण्याची वेळ त्यांच्यावर आली, ते जनतेच्या मनातूनच डीलीट झालेले आहेत. फडणवीस व भाजपा जनतेच्या मनातुनही उतरले आहेत. सध्या सोशल मीडियाची ताकद प्रचंड वाढलेली आहे. त्यांच्या ट्वीटवर काय प्रतिक्रिया आल्या ते पहा. लोकच म्हणतात आता तुम्हाला संधी नाही. कंत्राटी नोकर भरती रद्द केली हे सांगत असताना सोशल मीडियावर तरुणांच्या काय प्रतिक्रीया होत्या तेही पहा. भाजपा हा खोटारडा पक्ष आहे हे जनतेला समजले आहे, त्यामुळे त्यांच्यावर आता कोणी विश्वास ठेवत नाही, असा टोला नाना पटोले यांनी लगावला.




# संस्कृती



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**संस्कृतीचा शोध, अध्ययन-अध्यापन हा तसा मानववंशशास्त्र, समाजशास्त्र यांचा विषय असल्याचे आपण समजतो. कारण सर्वच विषय आपण समजून घ्यायचे ठरवले तर मानवाच्या अल्पायुष्यात हे साध्य होणार नाही; परंतु जीवन सुटे-सुटे नसते, साकल्याने ते आपल्यापुढे दत्त म्हणून हजर असते. नैपुण्य हा गुण वजा केला तरी, काही एक माहिती आपणास असणे महत्त्वाचे असते. आज आपण सुसंस्कृत आणि सभ्य समाज म्हणून वावरताना आपला जो प्रवास झाला तो कसा होता? हे पाहणे उद्बोधक आणि रंजकही ठरणार आहे.**



## क्षितिजापल्याड

मानवेतर प्राणी आणि मानव यातील व्यवच्छेदक लक्षण म्हणजे संस्कृती. प्रकृतीशी समांतर नाते जोडत प्राणी आपला जीवनक्रम घालवतात; परंतु माणसाचे तसे नाही. निसर्गाशी साहचर्य राखत असतानाच नैसर्गिक आपत्तीवर मात करण्याचे कौशल्य प्राप्त होण्यासाठी माणसास लाखो वर्षे खर्ची घालावी लागली. यशापयश स्वीकारत माणसाने आपला प्रवास सातत्यपूर्ण राखला. सहा लाख वर्षांपूर्वीचा उत्तर आफ्रिकेतील नुकताच दोन पायावर उभा राहून हाताचा वापर करायला शिकलेला माणूस आणि दोन-चार लाख वर्षांपासून होमो इरेक्टस वर्गीकरणात मोडणारा माणूस आणि आजचा प्रगत समाज यामध्ये कमालीची तफावत आहे व हावभावाच्या भाषेपासून ते चित्रलीपीपर्यंतचा विकास आणि चित्रलिपी ते सांकेतीकरण असा झालेला प्रवास समजून घेतल्याशिवाय आजच्या प्रगतीचे महत्त्व आपणास कळणार नाही. संस्कृती म्हणजे काय? संस्कृती निर्मितीमागचे कारणे कोणती? संस्कृती मध्ये कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो? संस्कृतीत आदान-प्रदानतेची खरेच गरज असते का? सांस्कृतिक संपन्नता व आर्थिक- राजकीय पुढारलेपण यातील साम्य-भेद कोणते? सद्यस्थितीतील सांस्कृतिक वातावरणावरून भविष्यात्मक काही आडाखे बांधता येऊ शकतात का? संस्कृती आणि धर्म एक की भिन्न? असे अनेक प्रश्न संस्कृतीच्या अनुषंगाने आपणास पडणे साहजिक आहे. फार प्राचीन काळी माणसास फक्त दोनच कार्ये होती. उदरभरण आणि स्वसंरक्षण. वल्कले परिधान करून प्राण्यांची शिकार करणे आणि ऊन, वारा, पाऊस यापासून स्वतःचा बचाव करणे. प्रागैतिहासिक काळामध्ये अग्नी अथवा धातू याचा शोध लागलेला नसल्यामुळे फक्त पोटाची आणि हिंस्त्र पशूंची चिंता या दोनच चिंता त्याच्या ठायी होत्या. उदरभरण झाल्यानंतरच्या निवांतपणातून गरजेपोटी मग त्याने यथावकाश वेगवेगळ्या गोष्टीचा शोध लावला. अग्नीचा शोध हा फार अलीकडचा. तो म्हणजे चार लाख वर्षांपूर्वीचा. हा शोध आदी मानवाला चीनमध्ये लागल्याचा दाखला मिळतो. मांसाहार भक्षणाचे मूळ जसे आमच्या आदिम अवस्थेत सापडते तसेच आधुनिक काळातील अनेक संस्कृतींचे अग्निपूजक तत्त्वही आपल्या सांस्कृतिक संचितात दडलेले आहे. शेवटी संस्कृती म्हणजे काय? तर समाजात आणि व्यक्ती मनाच्या अवस्थेत दडलेले गुण म्हणजे संस्कृती. ही संस्कृती नेहमी मानसिक पातळीवर काम करते. मनोमय असणे हेच तिचे इंगित होय, तर या मनोमय विचाराचे दृश्यरूप म्हणजे सभ्यता. म्हणजेच सभ्यता ही भौतिकतेशी निगडीत असते तर संस्कृती मानसिक पातळीवर कार्य करते. विविध प्रकारच्या उन्नत कला प्रगत सांस्कृतिकतेच्या निदर्शक असतात. मानवाच्या इतिहासात अशा प्रकारच्या अनेक संस्कृती उदयास आल्या आणि इतर संस्कृतींना प्रेरणा देऊन त्यात विलीन झाल्या अथवा संपल्या. आजची आपली कथित सांस्कृतिक संपन्नता ही केवळ आपली निर्मिती होती, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारण संस्कृती ही केवळ फावला वेळ आहे म्हणून निर्माण झाली नाही तर गरजेतून निर्माण झाली. शेवटी माणसांनी जगण्यासाठी निर्माण केलेली डावपेचात्मक आखणी म्हणजे संस्कृती, असेही आपण म्हणू शकतो. इथे आणखी एक लक्षात घेण्यासारखा भाग म्हणजे या स्पर्धेत फक्त आज अस्तित्वात असलेल्या समाजाचेच पूर्वज होते असे नव्हे. आपल्या होमो-सेपियन प्रजाती सोबतच इतर तेवीस प्रजाती या स्पर्धेत होत्या. साधारणतः दोन लाख वर्षांपूर्वी या प्रजाती नष्ट झाल्याचे दाखले मानववंशशास्त्र देते. अनेक प्राच्यविद्या पंडितांचे त्यावर मतैक्य आहे. आजपर्यंतच्या इतिहासात जेवढा शोध सभ्यतांचा



लागलेला आहे तेवढा संस्कृतीचा मात्र झालेला नाही. कारण वर म्हटल्याप्रमाणे सभ्यता भौतिक स्वरूपाची असते आणि भौतिक वस्तू फार फार तर पाच सहा हजार वर्षापासूनच्या दाखविता येतील. हिस्ट्री ऑफ सिव्हिलायझेशन हा जागतिक पातळीवरील सभ्यतांचा बृहत आराखडा असणारा विल डुरांट यांचा ग्रंथही ज्ञात इतिहासापासूनच सुरु होतो. कारण साधनांचा अस्सलपणा तत्कालीन परिस्थितीत शोधूनही सापडत नाही. सभ्यतेच्या खुणांवरून आपण फार तर त्यांच्या सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना करू शकतो. वास्तू, शिल्प, चित्र, आभूषणे अशाच तत्सम गोष्टी आपण शोधू शकतो; परंतु तत्कालीन धारणा, विधीसंकेत, परस्परसंबंध, सांस्कृतिक स्तरीकरण, शिष्टाचार, नातेसंबंध, व्यक्ती आणि समाज, तसेच समूह आणि समूहाचे संबंध हे फक्त आपणास ज्ञात वस्तूवरून कल्पना करण्यास मदत करू शकतात; परंतु स्पष्टपणे तत्कालीन सांस्कृतिक चित्र आपण रेखाटू शकत नाही. ही संस्कृतीच्या अभ्यासातली फार मोठी अडचण आहे. मानवी जीवन स्थिरस्थावर झाल्यानंतर संस्कृतीचा विकास होण्यास प्रारंभ झाला. जगात प्राचीन काळी ज्या काही मोजक्या संस्कृती अस्तित्वात होत्या, त्यातील काही संस्कृतीमध्ये सांस्कृतिक आदान-प्रदान होत असल्याचे दिसून येते. यातूनच पुढे चालून काही नवीन संस्कृतीने जुन्या संस्कृतीची जागा घेतल्याचे लक्षात येते. ही परस्परांतील देवघेव व्यापार विषयक होती, तशीच अभौतिक बाबतीतीलही होती. प्रादेशिक सानिध्य हा घटक त्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसून येते. विशेषतः मेसापोटेमिया संस्कृतीच्या बद्दल आपणास असे म्हणता येईल. या गटात ज्या काही चार-पाच संस्कृती येतात, त्यांनी निश्चितच परस्परांवर प्रभाव पाडलेला आहे. एकेका संस्कृतीचा अभ्यास करताना या गोष्टी आपल्या निदर्शनास येतील. संस्कृती आणि धर्म या अनुषंगाने विचार करता तसा अर्थार्थी या दोघांचा काही संबंध नाही; परंतु धर्माने जबरदस्तीने सांस्कृतिक क्षेत्रात हस्तक्षेप करून संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आणले. धर्म म्हणजे अत्यंत सुसंघटितपणे व नियोजनबद्धरीत्या चालविलेली सामाजिक चळवळ असते, ती समाजाला एक चौकट प्रदान करते. व्यावहारिक डावपेच संस्कृतीमध्येही होते; पण धर्माने ते विशिष्ट चौकटीत बंदिस्त केल्यामुळे त्या बाहेरचे सांस्कृतिक भान घेण्यापासून त्यांना मज्जाव करण्यात आला. त्यामुळे फार तर धर्म म्हणजे बंदिस्त सांस्कृतिकता, असे आपण म्हणू शकतो. जागतिक प्रमुख संस्कृती, धर्म, संप्रदाय, अन्य विचारधारा या सर्वांच्या असण्यातही माणूस आज एकाकी आहे, हा खरेच चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# नौदल अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यामागे पाकचा कट ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306


आधुनिक केसरी

**मुस्लिम ब्रदरहुड संघटनेमधील हमासचं युद्ध इस्रायलविरुद्ध सुरु आहे. या दोघांमधील वाद तसा फार जुना आहे. मात्र सध्या दोन्ही गटांमध्ये ज्या पद्धतीने वाद सुरु आहे त्यामुळे संपूर्ण जगाचं टेन्शन वाढलं आहे. इराण, कतार आणि अन्य देशांच्या पाठींब्यामुळे हमासला बळ मिळालं आहे. हमासला पाठिंबा देणाऱ्या देशांचे अनेक प्रतिनिधी कतारमध्ये सध्या असल्याचं सांगितलं जात आहे. तर दुसरीकडे सध्या हमासमध्ये असलेला अन्य एक देश म्हणजे पाकिस्तानी. पाकिस्तान अनेकदा या देशांबरोबर भारताचे संबंध अधिक कटू व्हावेत यासाठी प्रयत्नशील राहिल्याचे अनेक दाखले इतिहासामध्ये सापडतील. सध्या भारताच्या ८ माजी नौदल अधिकाऱ्यांना कतारने फाशीची शिक्षा सुनावण्यात आल्यानंतर आता यामागेही पाकिस्तानचा कट असल्याचे समोर येत आहे.**

मध्य आशिया आणि पाकिस्तानसंदर्भातील प्रकरणांचे जाणकार असलेल्या कमर आगा साहब यांनी दिलेल्या माहितीनुसार कतारने भारतीयांनी फाशी देण्याचा घेतलेल्या निर्णयामागे पाकिस्तानचा मोठा हात असल्याचं सांगितलं जात आहे. कतारमध्ये राहणारे पाकिस्तानी लष्करातील निवृत्ती अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा प्रभाव कतारच्या निर्णयांवर फार खोलपर्यंत असणार असंही सांगितलं जात आहे. १७ वर्षांनंतर २०२० मध्ये एका व्यक्तीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यानंतर ३ वर्षांच्या आत ८ भारतीयांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. माजी भारतीय लष्करी अधिकाऱ्यांविरोधात जो कथित हेरगिरीचा ठपका ठेवण्यात आला आहे त्याची शिक्षा म्हणून मृत्यूदंड सुनावण्यात आला आहे. मात्र यासंदर्भातील माहिती कतारने भारताबरोबर शेअर केलेली नाही. कमर आगा यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि कतारचे संबंध चांगले आहेत. मात्र मुस्लिम ब्रदर हूडला डावलून भारताला प्राधान्य देण्याइतके हे संबंध दृढ नाहीत. याचाच पाकिस्तान फायदा घेत आहे.



भारताच्या ज्या माजी नौदल अधिकाऱ्यांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे त्यामध्ये कॅप्टन नवतेज सिंह गिल, कॅप्टन सौरभ वशिष्ठ, कॅप्टन बीरेंद्र कुमार वर्मा, कमांडर पूर्णेन्दु तिवारी, कमांडर सुग्राकर पकाला, कमांडर संजीव गुप्ता, कमांडर अमित नागपाल आणि सेलर रागेश यांचा समावेश आहे. दरम्यान या शिक्षेच्या सुनावणीमागील इस्रायल कनेक्शन समोर आलं आहे.



अलजजीरा'ने दिलेल्या वृत्तानुसार, ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कतारमधील तुरुंगात कैद असलेल्या या ८ भारतीयांवर इस्रायसाठी हेरगिरी करण्याचा ठपका ठेवण्यात आला. या आरोपांनुसार कतारमध्ये पाणबुड्यांसंदर्भातील प्रोजेक्टबद्दलची माहिती भारतीय अधिकाऱ्यांनी इस्रायलला दिली आहे. हे सर्व भारतीय कर्मचारी दहरा ग्लोबल टेक्नोलॉजीज ॲण्ड कन्सल्टिंग सर्व्हिसेस या कंपनीसाठी काम करायचे. ही कंपनी कतारला पाणबुड्यांसंदर्भातील तंत्रज्ञानाबद्दलची प्रमुख सल्लागार कंपनी आहे. या कंपनीच्या मदतीने रडारपासून वाचणाऱ्या पाणबुड्या बनवण्याचा कतारचा प्रयत्न सुरु आहे. या माहितीसंदर्भातील प्रकरण करताने नौदलाचा तळ निर्माण करुन आपल्या नौदलाच्या वाढीच्या दृष्टीने पाणबुड्यांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने जहाज निर्मिती करणाऱ्या फिनकॅंटिएरी एसपीए या कंपनीबरोबर काही करार केले होते. हे करार २०२० साली करण्यात आली होते. मात्र याअंतर्गत निर्मिती सुरु करण्यात आली नाही. कतार आणि इटलीदरम्यान पाणबुड्यांसंदर्भातील एक करार होणार होता. याचबद्दलची माहिती भारतीयांनी इस्रायलला दिल्याचा आरोप केला जात आहे. हे ८ भारतीय ज्या दहरा ग्लोबल टेक्नोलॉजीज ॲण्ड कन्सल्टिंग सर्व्हिसेस कंपनीमध्ये काम करत होते ती ओमानमधील रॉयल ओमानी (ओमानच्या वायूसेनेमधून सेवानिवृत्त झालेल्या स्क्वाड्रन लीडरच्या) मालकीची कंपनी आहे. ही कंपनी सुरक्षा क्षेत्रात कार्यरत आहे. विशेष म्हणजे भारताने इस्रायल आणि पॅलेस्टाईनच्या संघर्षामध्ये दोघांचीही बाजू घेतली आहे. भारताने टू स्टेट फॉर्म्युल्यावर जोर देण्याची भूमिका घेतली आहे. कोणत्याही दहशतवादी कारवायांच्या माध्यमातून जबरदस्तीने प्रांतावर ताबा सांगू नये असं म्हणत भारताने हमाससंदर्भात आपली भूमिका मांडली आहे. दुसरीकडे बुचर ऑफ पॅलेस्टाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाकिस्तानने पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आवाज दिला आहे. सौदी अरबिया, इजिप्त, यमन, युएई आणि बहरीनने कतारबरोबर आपले संबंध २०१७ साली संपवले होते. तेव्हा पाकिस्तानने या देशांबरोबर चांगले संबंध हवेत म्हणून कतारबरोबरचं नातं संपवलं होतं. पाकिस्तान आता पॅलेस्टाईनबरोबर उभं राहत असल्याची भूमिका मांडत कतारच्या नजरेत आपली प्रतिमा सुधरवण्याचा प्रयत्न करत आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# छत्रपती संभाजीनगरात आज अस्मिता वुमन्स ज्युदो लीग स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** खेल मंत्रालय भारत सरकार यांच्या महत्वाकांक्षी योजनेपैकी एक आणि स्पोर्ट्स ॲथारटी ऑफ इंडिया (साई) तर्फे कार्यान्वित पहिली 'अस्मिता वुमन्स लीग ज्युदो स्पर्धा' छत्रपती संभाजीनगर शहरात २९ ऑक्टोबर रविवारी आयोजित करण्यात आली आहे. देशभरातील २५



शहरात आणि महाराष्ट्रातील पाच शहरांपैकी रत्नागिरी, नाशिक, गोंदिया आणि धुळे यांसह छत्रपती संभाजीनगर हा एक जिल्हा निवडला गेला आहे. ही लीग स्पर्धा बालगट, कुमार गट, ज्युनिअर गट आणि वरिष्ठ गट या चार श्रेणीत आयोजित होणार आहे. भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्यातर्फे अंशतः अनुदानित या स्पर्धेसाठी आमदार अतुल सावे यांच्या आमदार निधीतून आणि शहरातील नामवंत व्यवसायीकांकडून आर्थिक सहकार्य प्राप्त होत आहे. या स्पर्धेचे उद्घाटन केंद्रीय अर्थ मंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते होणार आहे. जिल्ह्यातील १३० महिला खेळाडूंनी स्पर्धेसाठी नाव नोंदणी केली असून 'बंदी में हैं दम' हा पुरस्कार कॅडेट प्रकारातील दोन खेळाडूंना मिळेल. या स्पर्धेत जास्तीत जास्त महिला खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन साईचे सहसंचालक नितीन जयस्वाल आणि जिल्हा ज्युदो संघटनेचे अध्यक्ष अजीत मुळे आणि सचिव अतुल बामनोदकर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात उभे राहणार 52 नवीन तलाठी कार्यालये : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ग्रामीण भागात नागरिकांना मुलभूत



सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच गावपातळीवरील प्रशासकीय कारभार उत्तम रितीने चालावा, यासाठी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष पुढाकारामुळे 52 नवीन तलाठी कार्यालयाची निर्मिती होणार आहे. त्यासाठी विशेष बाब म्हणून 18 कोटी 19 लक्ष 24 हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

याबाबत महसूल व वनविभागाने 17 ऑक्टोबर 2023 रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

चंद्रपूर हा नक्षलग्रस्त आणि दुर्गम भाग असल्याने तेथील गावांमध्ये प्रशासकीय कामकाम उत्तमरित्या चालावे, गावातील नागरिकांना आवश्यक असलेले महत्वाचे दाखले, कृषीविषयक नोंदी / कागदपत्रे वेळेत मिळावेत, यासाठी नवीन तलाठी कार्यालयांची आवश्यकता होती. याबाबत प्रशासनाकडून सुरवातीला 7 कोटी 80 लक्ष रुपयांचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र कर्मचा-यांच्या निवासस्थानासह तलाठी कार्यालयाची निर्मिती करण्यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला सुचना केल्या. त्यानुसार विशेष बाब म्हणून 18 कोटी 19 लक्ष 24 हजार रुपयांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आला. राज्य शासनाने या प्रस्तावाला नुकतीच मंजूरी दिली असून नवीन तलाठी कार्यालय व कर्मचा-यांच्या निवासस्थानाचा मार्ग मोकळा झाला आहे. यात



पोंभुर्णा तालुक्यात 11, चंद्रपूर तालुक्यात 6, बल्लारपूर तालुक्यात 7 आणि मुल तालुक्यात 28 असे एकूण 52 नवीन तलाठी कार्यालये उभारण्यात येणार आहे. गावपातळीवरील राज्य शासनाचा महत्वाचा घटक म्हणून तलाठ्यांकडे अनेक प्रशासकीय कामे सोपविण्यात आली आहेत. यात गावपातळीवरील 21 गाव नमुने तयार करणे, ते अद्ययावत करणे, वारसान नोंदी घेणे, खरेदी-विक्री व्यवहारानुसार सातबारावर फेरफार नोंदी घेणे, नैसर्गिक आपत्तीच्या काळात नुकसानीचे पंचनामे करणे, नागरिकांना नुकसान भरपाईबाबत प्रक्रिया राबविणे, त्याचा अहवाल शासनाकडे सादर करणे, रहिवासी व उत्पनाचा दाखला काढण्यासाठी आवश्यक कागदपत्र नागरिकांना उपलब्ध करून देणे, गावाची पैसेवारी निश्चित करणे, पीक कापणी प्रयोग, ई-पीक पाहणी आदी महत्वाच्या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, कृषी गणना करणे, सातबारा वाटप करणे, ऑनलाईन सातबारा नागरिकांना उपलब्ध करून देणे आदी महत्वाच्या कामामुळेच तलाठी हा गावपातळीवरील प्रशासनाचा मुख्य कणा मानला जातो.

**या ठिकाणी होणार नवीन तलाठी कार्यालये**

पोंभुर्णा तालुक्यातील वेळवामाल, चेकबल्लारपूर, डोंगरहळदी, उमरी पोतदार, घोसरी, देवाडा (बुर्ज), देवाडा (खुर्द), नवेगाव मोरे, जाम तुकुम, फुटाना मोकासा आणि चेक ठाणेवासना. चंद्रपूर तालुक्यातील अजयपूर, पिंपळखुट, जुनोना, पद्मापूर, बोर्डा, दुर्गापूर चांदा रयतवारी. बल्लारपूर तालुक्यातील पळसगाव, मानोरा, कवडजाई, कळमना, विसापूर, कोठारी, बामणी, मूल तालुक्यातील मरेगाव, भादुर्णी, उश्राळाचक, केळझर, राजगड, पिपिरी दीक्षित, भेजगाव, चिंचाळा, सुशी दाबगाव, ताडाळा, नांदगाव, मूल, राजोली, नवेगाव, कोसंबी, कांतापेठ (रै), चिरोली, गडीसुर्ला, बोंडाळा (भुज), मारोडा, चिखली माल, चिमढा, हळदी गावगन्ना, बोरचांदली, सिंताळा, जुनासुर्ला, बेलघाटा माल आणि डोंगरगाव येथे नवीन तलाठी कार्यालय निर्माण होणार आहे.



# साखळी उपोषणाचा चौथा दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण च्या आमरण उपोषणाला पाठिंबा म्हणून सावंगी येथे दि.२८ चौथा दिवस आहे व उपोषणला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण साठी सरकारने ४० दिवसांची मुददत घेवून ४०-४५दिवस उलटले तरी अद्याप सरकारची आरक्षणाची घोषणा न झाल्याने खुलताबाद तालुका व इत्ररत्र ठिकठिकाणी सकल मराठा समाज सखळी व आमरण उपोषण करत असुण उपोषणाला मोठा व उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. सावंगी येथे जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा गत तीनचार दिवसांपासून सतत उपोषणवर असल्याने सखळी उपोषणला सावंगी सर्कल तथा मंडळ मधील अनेक नागरिक शालेय विद्यार्थी शिक्षक प्राचार्य प्राध्यापक डॉक्टर व्यापारी नौकरदार विविध पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते सर्व समाजाचा मोठा पाठिंबा मिळत आहे.




# मका सोंगणीला आला वेग

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी सद्या मका सोंगणी व काढणी ला मोठा वेग आल्याचे चित्र आहे. यंदा जेमतेम अपुऱ्या पावसामुळे खरिप पिक हंगामातील मका पिक ही जेमतेम आले आहे.यंदा सुरवाती पासुनच पावसाने हुलकावणी देत कधि रिमझिम तर कधी कमी अधिक पडत खरिप पिक हंगामाची पावसाभावी वाट लागली तर नाममात्र मका पिक आले. त्यात ज्या वेळी पावसाची गरज होती जसे कणसे येणे दाने भरणे त्या वेळी मात्र पावसाने उघडीप दिली होती.त्यामुळे मकाला ना कणसे आली ना दाने भरले ते वाझंट राहील नावाला कणसं व नावाला दाने आले त्यामुळे शेतकऱ्यांनी त्याचा चारा केला.तर आता शिल्लक मका ची सोंगणी काढणी हाती घेतली आहे.सद्या मका सोंगणी काढणीने वेग घेतला आहे.

महाराष्ट्र Business Katta












# दान



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**दान हा संस्कृत शब्द आहे. दान म्हणजे देणे ...धर्मासाठी देणे. शिवाय या शब्दाचा अजून एक अर्थ म्हणजे खेळात पडलेला डाव याला देखील दान असेच म्हटले जाते. पण पहिल्यादानाविषयी बोलायचे म्हटले तर दान म्हणजे पुण्य मिळवण्यासाठी केलेले दान म्हणजे धर्माने विस्तृत करून सांगितलेले देणे म्हणजे दान. अर्थात गणपती उत्सवात दिलेली वर्गणी म्हणजे दान नव्हे शिवाय कुठल्याही प्रकारचे दान देताना ते निरपेक्ष भावाने दिले गेले पाहिजे. ज्यांच्या अभंगाच्या चिंतनाने क्षणभंगुर मानवी जीवनात अक्षय आनंद निर्माण होतो ते संत श्रेष्ठ श्री नामदेव महाराज म्हणतात. भूमीदाने होशी भूमीपाळु। कनक दाने कांति निर्मळु। चंदनदाने सदा शीतळू। जन्मोजन्मी प्राणिया ॥१॥ अन्नदाने दृढायुषी। उदकदाने सदासुखी मंदिरदाने भुवनपालखी। सुपरिमळू उपचारां ॥२॥ वस्त्रदाने सुंदरपण। तांबूलदाने मनुष्यपण।गोपीचंदने ब्राह्मणपण। अति लावण्य सुंदरता ॥३॥जे वृक्ष लाविते सर्वकाळ। तयांवरी छत्रांचे झल्लाळ।**

**जे ईश्वरी अर्पिती फळ। नानाविध निर्मळ ॥४॥ ऐशा दानाचिया पंक्ती। वेगळाल्या सांगो किती। एका घ्यारे लक्ष्मीपती। विष्णुदास म्हणे नामा ॥५॥**

नामदेव महाराज म्हणतात, भूमीदानाने भूमी पालनकर्ता सुवर्णदानाने सौंदर्यवान, चंदन दानाने सदा शितलत्व असे भाव जिवांना जन्मोजन्मी प्राप्त होतात. अन्नदानाने दृढ आयुष्य, जलदानाने सदैव सुख ,मंदिर दानाने पालखीचे वाहन प्राप्त होऊन सुगंधित अशा अत्तरदादिकाचे सोहळे प्राप्त होतील. वस्त्रदानाने सुंदरपणा प्राप्त होईल, तांबुलदानाने मनुष्यपण प्राप्त होईल, ज्ञानदानाने ब्रह्म जाणण्याचे सामर्थ्य वाढेल तसेच अति लावण्यता प्राप्त होईल. जे सर्व काळ वृक्ष लावतात, त्यांना सर्वांमध्ये प्राविण्य प्राप्त होईल, प्रभुला जे फळ अर्पण करतात ते पुत्रवान होतात आणि सुखा समाधानाने राहतात. विश्वसंत नामदेव महाराज म्हणतात अशा वेगवेगळ्या दानाचे प्रकार किती म्हणून वर्णन करावेत तुम्ही सदैव लक्ष्मीच्या पतीचे ध्यान मनोभावे करावे.किती खोल विचार करून दानाचे असंख्य प्रकार नामदेवांनी महाराजांनी सांगितले आहेत.

अर्थात दान देणं हे मोठं पुण्य समजलं जातं. दान दिल्यामुळे दान देणाऱ्याचे पाप कमी होतं असं म्हणतात. त्यामुळे अनेकजण दान देत असतात मात्र दान देताना ते सत्पात्री असावं म्हणजेच दान घेणारी व्यक्ती गरजू असावी. असा त्याचा अर्थ आहे. त्याचबरोबर आपल्याला नको असलेल्या वस्तूचे दान देणे याला दान देणे म्हणत नाहीत. ते योग्य दान नसते. आपल्या सुखात व दुःखातही आपल्या आयुष्यातला काही भाग इतरांना देणे म्हणजे दान असते. गरजूंची संख्या मोठी आहे मात्र दान कशाच द्यायचं हे समजून घ्यायला हवे. दान देताना असे म्हणतात की एका हाताचे दुसऱ्या हातालाही कळू नये असे दान द्यावे. आजकाल जी दाने दिली जातात ती आपले नाव मोठ्या होर्डिंग वरती, फ्लेक्स वरती छापले जावे हा त्याच्या मागचा उद्देश असतो याला दान म्हणत नाहीत. एका सुभाषितात म्हटले आहे

**दानेन तुल्यो विधीरस्ति नान्यः।**
**लोभाच्च नान्योऽस्ती रिपुः पृथ्विव्याम ॥**
**विभूषणं शीलसमं न चांन्यत्।**
**संतोषं तुल्यं धनमस्ति नान्यत ॥**

म्हणजे दानासारखे या पृथ्वीवर दुसरे धर्मकृत्य नाही. लोभा सारखा दुसरा शत्रू नाही आणि चारित्र्यासारखा उत्कृष्ट अलंकार नाही आणि समाधानासारखे दुसरे धनही नाही. आपल्या ओंजळीत जितके मावेल तितकेच आपल्याला गरजेचे असते. ह्या व्यतिरिक्त जे आपल्याला भगवंताने दिलेले आहे ते दान केल्यामुळे माणसाला प्रतिष्ठा प्राप्त होते. निसर्गातला ही प्रत्येक घटक आपल्याला काहीतरी देत असतो तेही एक प्रकारचे दानच आहे. एकेका दानाविषयी बोलायचं झाले तर पहिल्यांदा आपण अन्नदान बघूया. समाजात कित्येक माणसं भुकेने मरतात किंवा कुपोषित असतात आणि आपण मात्र बऱ्याचदा अन्न फेकून देतो. त्यामागची शेतकऱ्याची मेहनत तसेच आपण अन्नाला सर्वस्व मानलेल आहे. अन्न नसले तर आपण जगू शकणार नाही हे विसरून आपण वाटेल तेवढे अन्न वाया घालवत असतो. मात्र भुकेलेल्यांना जर हे जेवायला दिले गेले तर ते अन्नदानासारखे दुसरे पुण्याचे काम नाही.



विद्यादान केले तर माणसाला जन्मभर समाधान मिळते. शिवाय ब्रह्म समजण्याचा एक मार्ग आपल्याला मिळतो. तसेच विद्यादान करताना जे अतिव समाधान मिळते त्यामुळे तुमच्या चेहऱ्यावर एक सात्विकता निर्माण होते.

जलदान ही देखील एक काळाची गरज आहे. अनेक शहरांमध्ये अनेक खेड्यांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष असते अशा खेड्यांमध्ये पाण्याची टंचाई असते. तसेच उन्हाळ्यामध्ये पशुपक्षांनाही पाणी मिळत नाही अशा वेळेला आपण जर त्यांना पाणी दिले तर ते पण एक मोठे कार्य ठरते.

तुकाराम महाराज म्हणतात,

**सरे ऐसे ज्याचे दान। त्याचे कोण उपकार ॥**

म्हणजे संपून जाणार दान जो देतो त्याचे कसले उपकार. विठ्ठला मला असलं काही देऊ नको. जे सत्य टिकणार असेल असं मला दे. एखादी माऊली आपलं मूल रडत असताना त्याला सोडून जाते ती माऊली थोर माउली म्हणावी का ...?

तुकाराम महाराज म्हणतात ज्याच्यामुळे कीर्ती वाढते, पसरते तो खरा दान धर्म होय. या व्यतिरिक्तही दानाचे असंख्य प्रकार आपल्याला माहित आहेत त्यामध्ये वस्त्रदान, धनदान, भूदान, गोदान, कन्यादान देहदान, रक्तदान ,अवयव दान, नेत्रदान आणि हो मतदान सुद्धा. धार्मिक दृष्टीने बळीराजा, कर्ण ही आपल्याला दान देणारी उत्कृष्ट उदाहरण माहिती आहेत.

अर्थात दान देताना चुकीच्या पद्धतीने जमा केलेली संपत्ती आणि त्यातून काही वाटा हा दान म्हणून देणे हे मात्र सर्वस्वी चूक आहे.

तुकाराम महाराज तर म्हणतात जर काही द्यायचंच असेल तर उगाच काही कीडुक-मिडूक देऊ नका. असं काहीतरी द्या जे शाश्वत असेल. न सरणारा न संपणार, नाश न पावणार असेल असे काहीतरी द्यावे. दान देताना आपण हा विचार जरूर मनामध्ये ठेवावा की काही विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करता येईल किंवा शाळा, वाचनालय, ग्रंथालय, अभ्यासिका, प्रयोगशाळा संगणक कक्ष निर्माण करण्यासाठी आपण दान दिले पाहिजेत ज्यातून येणाऱ्या पिढ्यांचा निरंतर विकास होईल.

पण दानाविषयी तुकाराम महाराज परखड मते ही व्यक्त करतात ते म्हणतात जिवंत माणसाला आपण भुकेले ठेवतो आणि तो माणूस मेल्यावर मात्र पिंडदान करतो. असो.... देणाऱ्याने देत जावे ,घेणाऱ्याने घेत जावे ...देता देता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे ! हेच खरे !

# माणुसकीच्या शोधात



डॉ.बलराज पांडवे
मो.नं. 9511885093

आधुनिक केसरी

**मला माझं बालपण अजून आठवतं. एक छोट्याशा खेडेगावात मी वाढलेला असून त्याकाळी रॉकेलचे कंदील लावून रस्त्यावर उजेड असायचा. प्रातकाळी सर्व गाव जागी व्हायचं. गाईच्या गोठ्यातील गुरांचा आवाज, बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज, शेळ्या मेंढ्यांचा आवाज, झाडावरील पक्षांची किलबिल, आई दळण दळत असताना येणारा जात्याचा आवाज, जात्यावरील ती गाणी, सकाळी सकाळी मंदिरातील घंटेचा आवाज हे सर्व कसे जिवंतपणाचे दर्शन घडवणारे प्रसंग अजून आठवतात मला.**

एकमेकांच्या दुःखात सामील होऊन आस्थेने विचारपूस करणारी माणसं. भलेही ती व्यक्ती कोणत्याही जाती धर्माची असो, गावगडा कसा बेताने चालायचा. परंतु आजची परिस्थिती पूर्णतः बदललेली आहे. खेडेगाव ओस पडत असून शहरातील सिमेंटचे जंगल वाढत आहे. रस्त्यावरील वाहनांचा व हॉर्नचा आवाज, होणारे प्रदूषण, त्यात तो गुदमरणारा माणूस, हे सर्व कसं बदललेलं वाटतं. माणसातील माणुसकी लोप पावत असून जो तो आपल्यातच मग्न आहे. शहरातील माणसाकडे वेळच शिल्लक नाही .माणूस कसा यंत्रमय बनत चालला आहे. यंत्रासोबत वावरत जणू तोही यंत्रच बनला आहे.स्वतःच्या विकासामध्ये व स्वतःच्या कल्पनेमध्ये व मर्यादित त्यांच्या विश्वामध्ये स्वतःलाच विसरत चालला आहे.

आमच्या लहानपणी एकमेकांचे दुःख वाटण्यासाठी सहज प्रवृत्ती माणसात आम्हाला दिसायची .कधी कुणाच्या घरी संकट ओढवले असेल तर शेजाऱ्यांकडून आसू पुसल्या जायचे .शेजाऱ्यांकडून जेवण यायचं .आग्रहाने घास भरवणारी माणसे दिसायची .माणुसकीचा व आपलेपणाचा ओलावा दिसायचा. एकमेकांना आधार देणारी माणसं असायची .एकमेकांना सहकार्य करण्याची अंतरीक भावना उघड उघड दिसायची ! विज्ञानाची कास व विकासाची दिशा मिळताच जणू काही माणुसकीच हरपून गेली आहे असे वाटते. घराची संस्कृती लोप पावत चालली असून शहरांमध्ये फ्लॅटची संस्कृती वाढीस लागत आहे.कुणासही कोणाचे देणे घेणे नाही. शेजाऱ्याच्या घरी कोणी मृत्यू मुखी पडला असेल किंवा शेजाऱ्याच्या घरी काही आपत्ती आली तरीही बाजूच्या फ्लॅट धारकास त्याची खबरही नसते. इतकं माणसाचं माणसाप्रती असलेलं प्रेम कमी होत चालले आहे.घराच्या चार भिंती पुरते विश्व सिमित होत चालले आहे. मोबाईल, टीव्ही, कम्प्युटर सारख्या यंत्रासी घट्ट मैत्री झाली आहे. तास न तास मोबाईलवर बोलणारी लहान मोठी माणसं पाहायला मिळतात. वाहन चालवत असताना जीवा धोक्यात टाकून बोलणारी बरीच मंडळी आपण रोजच पाहतो. त्यांना याची यत्किंचितही जाणीव नसते की अशा वेळेस गंभीर अपघात होऊ शकतो आपल्या जीवावर ही गोष्ट बितू शकते .पण प्रत्येक जण स्वतःच्या वेगात स्वतःच्या मर्जीनुसार कसल्याही अनुचित गोष्टींचा विचार न करता सतत धावत आहे.

प्रत्येक घरात टीव्ही संच सजलेला आहे. आयुष्याचे मौलिक क्षण टीव्हीसमोर बसून वाया



घालवणारे बरेच जण आहेत .कॉम्पुटर वर बसून आपल्याच कार्य मग्नतेमध्ये व्यस्त असणारे बरीच मंडळी आहेत. परंतु घरात वयोवृद्ध असलेल्या आईशी व वडिलांशी दोन शब्द सुखदुःखाचे बोलण्यासाठी मुळीच वेळ नाही .आई-वडिलांची सेवा करून आनंद घेणारे भाग्यवान मंडळी तशी कमीच आहे. कदाचित यालाच जग बदलले आहे असे म्हणावे लागेल. बदलत्या जगाशी बदलत्या फॅशनशी,बदलत्या सवयीसी माणूस इतका ॲडजेस्ट झाला आहे की, त्यात तो पुरता आधुनिक व यंत्रमानवासारखा वागत आहे. ही तर काळाची महिमा म्हणावी लागेल. यास तर बदलत्या काळानुसार बदलणारी पिढी, बदलणारारी समाज रचना व सामाजिक बदल म्हणावा लागेल.

पूर्वी एकत्रित कुटुंब पद्धती होती. आज ती पद्धती लोप पावत आहे. कुटुंब या संज्ञांशी माणूस दूर जाताना दिसत आहे. पाळणाघरात मुलांचं संगोपन व विकतचे संस्कार घेऊन संस्कारमय पिढीचे स्वप्न बघणे म्हणजे मनाचे समाधान म्हणावे लागेल. अशीच संस्कारहीन पिढी तयार करण्यामध्ये विश्वास वाढत आहे. प्रोग्रेस या नावाखाली माणूस पुरता एकुलकोंडा व स्वार्थी बनत आहे. याची कल्पना करवत नाही. मुलांच्या शिक्षणाचेही तसेच होत आहे. इवलासा तो जीव त्याच्या पाठीवरती दप्तराचे ओझे पाहिल्यास माणूस विचार करत राहतो. खरंच या मुलांना झेपत असेल का? हा तर एक संशोधनाचा विषयच आहे म्हणा. महागडे शाळा कॉलेजेस, भरमसाठ शिकवणीवर होणारा खर्च, याबाबत शांत डोक्याने विचार केल्यास असे वाटते की प्रोग्रेस या कल्पनेत जीवाचे रान करून भौतिक सुख प्राप्तीच्या प्रयत्नात माणूस स्वतःलाच विसरत आहे. स्वतःच्याच अस्तित्वासाठी आयुष्यभर झगडत आहे, असेच म्हणावे लागेल...!

# जीवनात चांगली पुस्तके वाचा...

आधुनिक केसरी

आजकालचा माणूस फार धकाधकीचे व धावपळीचे जीवन जगत आहे.त्याला चांगल्या कामासाठी व चांगली पुस्तके वाचण्यासाठी व लेखन करण्यासाठी जराही उसंत भेटत नाही. म्हणजे आजकालचा माणूस वयक्तीक जीवनात येवढा व्यस्त झालाय की त्याला आपल्या माणसांशी हितगूज साधायला व चार चांगली पुस्तके वाचायला नको वाटत आहेत.कामावून घरी आल्यावर बाहेर न जाता घरात बसून निवांतपणे मोबाईल व टिव्ही बघणे तसेच मोबाईलवरचे गेम खेळणे हे त्यांना व्यसन जडले आहे आणि वाचनाचे व्यसन दूरावले आहे.सांगायचा मूद्दा काय तर म्हणूनच



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आजकालच्या लोकांना अवांतर वाचनाची गोडीच राहीली नाही. मी असेही म्हणत नाही की मोबाईल व टिव्ही बघू नये.ते तर बघाच पण त्याचबरोबर थोडा वेळ काढून अवांतर वाचनाची व पुस्तकांची सवय लावून घ्या. काही लोकांना तर वाचन करायला जीवावर बेतत आहे.काहीजण तर असे म्हणतात की मी पुस्तके वाचायचा खूप प्रयत्न करत आहे पण पुस्तके वाचायला गेलो की झोपच लागते.म्हणजे पुस्तक जर वाचण्याजोगे नसेल तर जरा वाचायला किचकट वाटते व त्यामूळे झोप लागते.मग तसले किचकट साहित्य वाचायचे तरी कशाला? झोप लागते हे खरेही असेल कदाचित परंतू चांगल्या लेखकांची दर्जेदार पुस्तके वाचायला काय हरकत आहे?त्यांच्या दर्जेदार पुस्तकांने उलट तूम्हाला वाचायला उत्साह येईल व जिज्ञासा वाढेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, वि.स.खांडेकर, ना.सि. फडके, शंकरराव खरात,साने गुरुजी व अन्नाभाऊ साठे या नामवंत लेखकांची दर्जेदार पुस्तके वाचावीत. म्हणजे आपले मन तृप्त व समाधानी होईल व बुद्धीला चालना भेटेल आणि अवांतर वाचनाची सवय लागेल. मी सुध्दा अहमदपूरच्या महात्मा गांधी महाविद्यालयात शिकायला असताना अवांतर वाचन केले आहे. तेथील ग्रंथालय हे ज्ञानाचे भांडार होते.तिथे मला अनेक नामवंत लेखकांची एकापेक्षा एक दर्जेदार पुस्तके वाचायला मिळाली.आपणही अशाच चांगल्या लेखकांची दर्जेदार पुस्तके वाचून ज्ञानसंपदा वाढवावी. कारण आता वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.वाचनालयात पुस्तकांवर धूळ साचत आहे. या मोबाईलच्या जमान्यात पुस्तकांना किंमत राहीली नाही.लोक गूगलचा वापर करून माहीती मिळवत आहेत.परंतू गूगलवरची माहीती ही अर्धवट असते हे ओळखा आणि पुस्तकी ज्ञान हे सखोल असते.हे मनोमन ध्यानात ठेवा.आपल्या जीवनात पुस्तकाला खूप महत्त्व आहे. म्हणून जाताजाता आपल्याला कळकळीची नम्र विनंती करतो की,इतर फालतू छंदात वेळ दडवण्यापेक्षा वाचनालयाची वाट धरा.मिळालेला फावला वेळ वाचनात व वाचनालयात घालवा.तेथील पुस्तके आपली वाट पाहात आहेत.चला तर मग आपण सर्वांनी मिळून एक निश्चय करुया की मी रोज माझ्या दैनंदिन जीवनातील थोडासा वेळ वाचनासाठी राखीव ठेवणार.

# हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातील शांतता स्थैर्य



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**हिंद प्रशांत क्षेत्र हे जगाच्या राजकारणात भू राजनैतिक दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. त्याला आशिया प्रशांत क्षेत्राचे राजकीय ह्रदय म्हटले जाते. त्यामुळे चीनला प्रतीशह देण्यासाठी भारत करत असलेल्या व्यूहरचनेला विशेष महत्व आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आिण परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या प्रयत्नामुळे हिंद प्रशांत क्षेत्र अधिक भक्कम, मजबूत आिण जागरूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे.शित युद्धानंतरच्या काळात अमेरिका व रशिया यांच्यातील सुप्त संघर्ष संपून द्वीध्रुवी जगाचे रूपातंर बहुमुखी राजकारणामध्ये झाले आणि त्यानंतर रागतिक राजकारणाचे चित्र झपाट्याने बदलत गेले त्यामुळे दक्षिण याशियामध्ये भारताला आपले राजकिय स्थान भक्कम करण्यासाठी चीन बरोबर भारताला स्पर्धा करावी लागत आहे. कारण हिंद प्रशांत महासागर क्षेत्रामध्ये चीनची कुंडाई वाढली आहे. आग्नेय आशियातील व्हिएतनाम, कंम्बोडिया, लाओस तसेच इंडोनेशिया, मलेशिया ही राष्ट्रे चीनच्या गुंडगिरीला कंटाळली आहेत.**

त्यामुळे भारताला ठाम भूमिका घेणे आवश्यक झाले आहे. भारताने मुक्त व खुल्या हिंद प्रशांत क्षेत्राची जडण-घडण करण्यावर भर दिला आहे. तसे करताना कायद्याचे राज्य बिनधोक सागरी वाहतूक, साचेगिरीचा बंदोबस्त तसेच मुक्त व खुल्या व्यापारावर भर दिला आहे. आशियातील सत्तेच्या समतोलातील राजकारण चीनला प्रतिशह देऊन भारताची बाजू भक्कम करण्यासाठी पोषक ठरत आहे. हिंद प्रशांत क्षेत्रात भारताची भूमिका थोरल्या भावाची आहे. भारत मित्र, मार्गदर्श आणि संरक्षक या नात्याने अनेक छोट्या राष्ट्रांच्या पाठिशी भक्कमपणे उभा आहे. पार्क संघटना तसेच आशियान या संघटनामध्ये सुद्धा भारत दमदार भूमिका घेऊन पुढे वाटचाल करत आहेत. त्यामुळे हिंद प्रशांत क्षेत्रात आपले स्थान पूर्वीपेक्षा अधिक मजबूत व भक्कम करून वाटचाल करत आहे. **चीनला जबर प्रतिशह :** चीनने जगामध्ये वन बेल्ट वन रोड या योजनेचा पुढाकार घेऊन जगावर आपले प्रभूत्व गाजविण्याचा सपाटा लावला आहे. त्यासाठी चीन अनेक डावपेच आपटून भारताला मागे टाकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी चीनने श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, आफगाणिस्तान, बांग्लादेश या देशांना आर्थिक कर्जे देऊन त्यांना विकलांग करण्याचा प्रयत्न करत आहेत. पाकिस्तान आणि श्रीलंक तर चीनच्या वाढत्या कर्जामुळे हे देशोधडीला लागले आहेत. आता चीनी ड्रॅगनने अफगाणिस्तान मधील तालिबानच्या अजगराला जबरदस्त विळखा घातला आहे तसेच छोट्यास्या मालदीवला आर्थिक लॉलिपॉप देऊन एखाद्या मांजराने उदराला पकडावे तसे आपल्या पंज्यात पकडले आहे. हिंद प्रशांत क्षेत्रामध्ये चीनची लुडबूड सतत वाढत आहे. येन केन प्रकारे चीनला आपणच दादा आहेत असे जगाला भासवावयाचे आहे. चीनच्या नाकात दोरीबांधण्यासाठी भारत, अमेरिका, जपान, ऑस्टोलिया ही राष्ट्रे एकत्र येत आहेत. कारण चीनी ड्रॅगनचा वाढता लष्करी प्रभाव नव्या जगामध्ये अशांतता निर्माण करत आहे. लेनिनने जगातील सर्व गरिब राष्ट्रांना एकत्र करून त्यांचा विकास करण्यावर भर दिला होता. पण चीन नेमके त्याच्या उलटे काम करत आहे. आणि आशिया व आफ्रिका खंडातील अनेक देशामध्ये आपली साम्राज्यवादी सत्ता पसरवित आहे. मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार असा प्रश्न असून चीनी ड्रॅगनला रोखण्यासाठी भारत व अमेरिका एकत्र येत आहेत. लोकशाही राष्ट्रांचे हे ऐक्य हिंद प्रशांत क्षेत्राच्या स्थैर्यासाठी पुरक व उपयुक्त ठरणार आहे.

**भारताचा सक्रीय अलिप्तता वाद :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भारताने सक्रीय अलिप्तता वाद हे नवे धोरण स्विकारले आहे. विशेषतः 'सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास ' या मोदी यांच्या विकास धोरणाचा सर्वाधिक फायदा कोणाला होत असेल तर तो शेजारील राष्ट्रांना होत आहे.

नेपाळ, श्रीलंका, अफगाणिस्तान या देशांना अधिकची मदत करून त्यांच्या विकासात भारत खारीचा वाटा उचलत आहे आणि त्यांच्या विकासात भक्कम पणे उभा राहत आहे. या देशामध्ये लोकशाही, कायद्याचे राज्य, सामाजिक आणि आर्थिक विकास प्रक्रियेला गती देण्यामध्ये भारताने गेल्या 75 वर्षापासून सदैव रचनात्मक भूमिका घेतली आहे. परंतु गेल्या 5-10 वर्षात पुढे आलेल्या साम्यवादी लाल चीनने राणा भिमदेवी थाटात आपणच जगाचे उद्धार कर्ते आहोत अशी भूमिका घेऊन त्या राष्ट्रांवर कर्जाचे मायाजाल टाकले आहे. जर हे देश चीनचे कर्ज फेडू शकले नाही तर चीन या देशाचा तुकडा फस्त केल्या शिवाय राहणार नाही. चीनच्या या राक्षसी साम्राज्यवादी वृत्तीमुळे हिंद प्रशांत क्षेत्रामध्ये अशांतता आणि अस्वस्थता आणि असंतोष पसरलेला आहे. चीन व रशिया यांचे गुळपीठ जमत आहे व दोन देशांची जवळीक धोकादायक ठरू शकत आहे. हे लक्षात घेऊन हिंद प्रशांत क्षेत्रामधील आपल्या राजकारणाची भारताला



नव्याने व्यूव्ह रचना करावी लागेल. भविष्य काळात हिंद प्रशांत क्षेत्रातील छोट्या राष्ट्रांना सामाजिक व आर्थिक मदत करावी लागेल तसेच त्यांच्या पाठिशी लष्करी बळ उभे करावे लागेल. भारताच्या पुढाकाराने हिंद प्रशांत क्षेत्रातील राष्ट्रांची संघटना उभारण्यात आली आहे. परराष्ट्र मंत्री यश जय शंकर यांनी हिंद प्रशांत क्षेत्रातील या संघटनेचे अध्यक्ष पद श्रीलंकेकडे दिले आहे आणि भारत या संघटनेचा उपाध्यक्ष बनलेला आहे. चीनी ड्रॅगनला जबरदस्त प्रतिशह देण्यासाठी भारताने केलेली ही डावपेचात्मक रचना महत्त्वाची असून अमेरिकेतील फॉरेनल पॉलिसी या प्रत्रिकेमध्ये सुद्धा जय शंकर यांच्या कुटनीतिक राजकारणाचे कौतुक केले आहे. नव्या जगाचे रंग झपाट्याने बदलत आहेत व त्यामध्ये भारताची भूमिका महत्त्वाची आहे.

**भू-राजनैतिक महत्त्व :** हिंद प्रशांत क्षेत्रातील भारताची भूमिका भू-राजनैतिक डावपेचाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे कारण भारताला आपले स्थान टिकववायचे आहे व वाढवावयाचे आहे. आपल्या सक्रिय अलिप्तता वादी धोरणामुळे भारताने दक्षिण आशिया क्षेत्रात भारताचे स्थान आहे. हिंद प्रशांत क्षेत्रात कोणी भारताला आव्हान दिले तर भारत त्याला धडा दिल्याशिवाय राहणार नाही हा मोदी सिद्धांत आहे. 1962 सालचा भारत आता राहिलेला नाही. आता भारत पूर्वीपेक्षा अधिक मजबूत झाला आहे. हे लक्षात घेऊन चीनने भारताशी पंगा घेता कामा नये. हिंद प्रशांत क्षेत्रात चीनच्या वाढत्या गुंडगिरीला प्रतिशह देण्यासाठी भारत निर्णायक व ठोस भूमिका घेऊन अधिक भक्कम पणे उभा आहे. पतप्रधान नरेद्र मोदी यांचे नेतृत्व अधुनिक जगामधील पहिल्या क्रमांकाचे नेतृत्व आहे. त्यांच्या पाठिशी युरोप व अमेरिकेतील सर्व राष्ट्र उभे आहेत. जी-20 परिषदेमधील भारताचे अध्यक्ष पद जगामध्ये भारताची मान अधिक ताट व उंच करणारे आहे. 2023 मधील भारताची वाटचाल अधिक समर्थ आणि अधिक निर्णायक बनली आहे भावी काळात भारताला मागिल समिकरणे बदलून नवीन प्रम्येय मांडावी लागतील. भागाकार करण्याऐवजी गुणाकार करून आणि बेरजेचे राजकारण करून जगामध्ये मित्र राष्ट्रांची संख्या वाढवावी लागेल. पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी गेल्या नऊ वर्षात 70 पेक्षा अधिक दौरे करून त्यांच्याशी राजकिय आर्थिक संबंध मजबूत केले आहेत. या सर्व चर्चेवरून हे सिद्ध होते कि हिंद प्रशांत क्षेत्रामध्ये भारताची भूमिका अधिक महत्त्व पूर्ण भागिदारी प्रोत्साहन देणारी आहे. एक विश्वासू मित्र या नात्याने भारताने हिंद प्रशांत क्षेत्रातील अनेक देशांना मदतीचा हात दिला आहे. हिंद प्रशांत क्षेत्रातील सामुदायिक विकासाची भागिदारी ही सामुदायिक भर भराटीसाठी आणि उत्कर्षासाठी प्रेरक ठरणार आहे. हिंद प्रशांत क्षेत्रात शांतता स्थैर्य व विकास हि बाब सत्येच्या समतोलावर अबलंबून आहे आणि भविष्य काळात हिंद प्रशांत क्षेत्रातील प्रगतिला नवी दिशा देण्याचे काम केवळ भारत करू शकतो. हिंद प्रशांत क्षेत्रातील छोट्या राष्ट्रांचा सर्वांगिण विकास भारताच्या मार्गदर्शनावर अबलंबून आहे. 21 वे शतक हे आशियाचे शतक आहे, भारताचे शतक आहे आणि पंतप्रधान नरेद्र मोदी याच्या नेतृत्त्वाचे शतक आहे यात शंका नाही.

# सत्य मौन असतं याचा अर्थ ते दुर्बल नसतं



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सत्य हे मौन असतं हे वास्तव आहे पण मौन असतं म्हणून ते दुर्बल नसत . सरतेशेवटी ते असत्यावर भारी पडत कारण सत्याची बाजू ही न्यायाची धर्माची असल्याने निसर्ग देखिल सत्याचा सारथी ठरतो. सत्य हे सृष्टी वरील सर्व श्रेष्ठ बळ शक्ति असून हि शक्ति जीवनात क्रांतीकारी बदल घडवते पण सत्य टिकविण्यासाठी अथवा पचविण्यासाठी मौन ही शक्ति कामी येते. जीवन हे सत्याचा वाहक होण्यासाठी असत पण क्षणिक लाभ मोह आणि स्वार्थ या चक्रव्यूहात आपण फसतो आणि असत्याच्या वाटेवर मार्गक्रमण करतो पण हे सगळं शेवटी क्षणिक ठरतं.**

असत्य कितीही बलशाली असलं तरी योग्य वेळी मौन सत्य असत्यावर भारी पडत हे वास्तव सत्य आहे.सत्य हे ज्ञानावर उभा असत म्हणून ते मौन धारण करून असतं याचा अर्थ असा कधीच होत नाही कि सत्य हे कमजोर आहे दुबळ आहे. उलट सत्याच मौन हे असत्याला योग्य वेळी मुळासकट उखडून टाकत एवढी प्रचंड ताकद शक्ती क्षमता सत्याच्या मौनात असते. सत्य हे धर्म, संस्कार, ज्ञान, संस्कृती, असल्याने ते सदैव स्थिर शांत, सोज्वळ, संयमी निस्वार्थी, दिशादर्शक असत. याउलट असत्य हे चंचल उतावीळ, अस्थिर, घाबरट, बेचैन, लाचली, दिशाहिन, स्वार्थी आणि असंयमी असत. सत्य हे ज्ञानावर स्थिर असल्याने मौन असतं स्थिर असतं पण असत्य सतत अज्ञानावर स्थिर असल्याने ते नियमित अस्थिर असुन दिशाहिन असल्याने आपणच सत्य आहोत हे सिद्ध करण्यासाठी धडपडत असत पण असं होतं नाही. असत्याचा कितीही प्रचंड भायनक मोठा भयानक आवाज असला तरी तो फार काळ टिकत नाही तो आवाज सत्याला थोड्या वेळासाठी शांत मौन करू शकतो .या पेक्षा जास्त क्षमता त्या मध्ये नसतेच मुळी पण सत्याच मौन असत्याला योग्य वेळी मुळासकट उखडून फेकण्याची ताकद ठेवून असतं आणि त्याचा प्रत्यय आपल्याला योग्य वेळी येत असतो. म्हणून असत्याचा मोठा आवाज हा काही कालावधी साठी सत्याला मौन करू शकेलही हे जरी अगदी खरं असल तरी हा कालावधी फार विशाल किंवा मोठा नसतो. पण याच दरम्यान सत्याने राखलेल मौन योग्य वेळ आल्यानंतर असत्याला मुळासकट उखडून टाकत हा निसर्गाचा नियम सिद्धांत आहे. म्हणून सत्यच मौन स्वीकारणं याचा अर्थ ते कमजोर आहे असा मुळीच होत नाही.उथळ पाण्याला खळखळाट फार असतो आणि खोल पाणी स्थिर संयमी पाण्याचा प्रवाह शांत असतो .या उलट उथळ पाणी प्रचंड खळखळाट करत पण ते पाणी हे अंतिमतः उथळच असत. हेच गणित समान पद्धतीने मानवी स्वभावाला लागु पडत. सत्य आणि असत्य या मानवी स्वभावाच्या दोन परस्परविरोधी बाजु आहेत. आपण जी बाजू स्वीकारली त्या बाजुच आपण समर्थन करतो आणि तीच बाजु कशी मजबूत आहे हे सिद्ध करण्यासाठी आपण प्रयत्नशिल असतो. मग ती बाजु सत्याची आहे कि असत्याची आहे याची जाणीव ठेवण गरजेचे आहे. पण दुर्दैव असं आहे कि सध्या कोणीही याकडे गांभीर्याने पाहत नाही.पण



योग्य वेळी योग्य परिणाम आल्यावर मात्र पश्चात्ताप करण्याला अर्थ नसतो. आपण कोणाची बाजु घेतली.पण ते खुल्या मनाने बोलण्याच कोणी धरिष्ठय करत नाही. योगायोगाने जर आपण असत्याची बाजु स्वीकारली तर आपण किती ही प्रयत्न केले तर फार काही उपयोग होत नाही.हे अनुभव सत्य असतं पण हे मान्य करण्यासाठी सुद्धा खूप मोठ धारीष्ठय लागत. कारण सत्याची बाजू हि दुबळी वाटत असली तरी ती दुबळी नसते कारण सत्याच्या बाजूने निसर्ग असतो न्याय असतो निति असते . निसर्गातील सर्व सकारात्मक शक्ति ह्या सत्याच्या बाजूने कार्यरत असतात म्हणून सत्य हे मौन भासल वाटलं याचा अर्थ ते पराभूत झाल असा होत नाही. उलट जेव्हा निसर्ग आणि धर्म आपला प्रभाव दाखवतात तेव्हा मौन असलेलं सत्य असत्याला मुळासकट उखडून टाकत हा इतिहास आहे. नैसर्गिक सिद्धांत आहे. म्हणून आपल्या जीवनातील ज्ञाना ठरवतं आपण कोणाच्या बाजुने उभा राहयच ते. सद मार्गावर आपण मार्गक्रमण करत असु तर आपण नक्कीच सत्याची बाजूने उभा राहणार आणि आपण अज्ञानावर असू तर आपण कळत न कळत असत्याचा बाजूने जाऊ शकतो. म्हणून सदैव ज्ञानावर असणं म्हणजे सत्याची बाजू ने भक्कम उभा असण आणि अंतिमतः शाश्वत विजयला गवसणी घालण म्हणून सत्य हे मौन भासल वाटलं म्हणून त्याला कमजोर न समजता त्याच्या बाजुने आपल्याला उभा राहता येण हेच जीवनातील महत्वाचे व्यवहारिक ज्ञान आहे.

# माणूस असूनही आपण माणसासारखे का वागत नाही ?



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**आपण माणसं ज्या पृथ्वी वर राहतो त्या पृथ्वी वर इतरही असंख्य सजीवांचे व प्राण्यांचे वास्तव्य आहे.ते सजीव कळपाने व एकोप्याने राहतात. हिंस्त्र प्राण्यांपासून आपल्या सर्व सदस्यांचे संरक्षण करतात. चारा व पाणी मिळून मिसळून खातात व पितात. ते सजीव व प्राणी नेहमी एकत्र व आनंदाने राहतात. परंतु ज्या माणसांना बुध्दी, भावना, वाचा व विचारशक्ती यांचे वरदान लाभले आहे ती माणसे माणूस असुनही माणसासारखे वागत नाहीत ही वस्तुस्थिती व आजचे भयानक वास्तव आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जोरावर माणूस नावाच्या प्राण्याने संपूर्ण पृथ्वीवर ताबा मिळवला आहे.**

अन्नधान्याची रेलचेल आहे, कपडालत्ता खूप आहे.सिमेंटचे अलिशान बंगले आहेत. दळणवळणासाठी असंख्य आधुनिक अशी सुसज्ज वाहने आहेत. खूप पैसा अडका व जीवन उपयोगी वस्तू आहेत. तरीपण माणूस सुखी नाही. जीवनात स्थिर नाही आणि माणसासारखे वागत नाही, असे का? आपण माणसे खूप लोभी व अतृप्त आत्मे आहोत. समाधान, आनंद,संतुष्टपणा आणि सामंजस्य हे गुण त्यागून आपण असमाधानी बनलो आहोत. कितीही पैसा, संपत्ती, सोने, धनदौलत मिळाले तरी आपण माणसे समाधानी होत नाही.वडिलोपार्जित संपत्ती, शेती, घर,जागा यांच्या वाटणीसाठी कोर्ट कचेरी सुरु आहे, भांडणतंटे जोरात सुरु आहेत. दैनंदिन जीवन आरामात जगता येईल एवढी तरतूद केली असली तरीही माणसाची हाव संपत नाही. ज्यांच्याजवळ खूप संपत्ती आहे ते लोक आणखी संपत्ती मिळवण्यासाठी खटाटोप करतात. या हव्यासापोटी भ्रष्टाचार,लाच, अफरातफर,फसवणूक,लूटमार या दुष्टप्रवृत्ती उदयास आल्या. क्षुल्लक कारणांवरून माणूस हमरीतुमरीवर येतोय, हाणामारी करतोय, हिंसक बनतोय.वृध्द आईवडिलांना सांभाळण्याची जबाबदारी झिडकारली जात आहे. नात्यातला ओलावा व आपलेपणा नष्ट होत आहे. व्याभिचाराची लालसा व संशय प्रवृत्ती बळावत चालली आहे त्यामुळे अनेकांचे संसार उद्धवस्थ होत आहेत. आयाबहिणींकडे अतिशय घाणेरड्या नजरेने बघण्याच्या दृष्टिकोनात बदल व्हायला तयार नाही. दिवसेंदिवस पुरुषी अहंकार जलदगतीने वाढत आहे. एकीकडे मुके प्राणी माणसापेक्षाही जास्त चांगले व समजदारपणे जीवन जगतात.ते स्वतः कधी कोणाला त्रास देत नाहीत.कोणाचे नुकसान करत नाहीत.मग माणूसच माणसाचा शत्रू का बनतोय.चांगले जीवन जगायचे सोडून रानटी का बनतोय. याचा विचार करण्याची वेळ आली आहे.जर का माणसाने स्वतःवर नियंत्रण नाही ठेवले,दुर्गुणांचा वेळीच त्याग केला नाही आणि लोभीपणा नाही सोडला तर मग मानवजातीचा विनाश अटळ आहे. महामानव तथागत गौतम बुद्धांनी मानवाच्या सर्व दुःखाचे मूळ कारण तृष्णा सांगितले आहे.ही तृष्णा आपण त्यागली पाहिजे.तरच आपण सुखी होऊ.माणसासारखे वागत राहू,माणसासारखे जीवन जगत राहू.

# साळुंकीचे पिल्लू आणि मी...



कु.सेजल श्रीकृष्ण वानखेडे,
वर्ग ३रा ,गांधी विद्यालय एकता नगर परभणी.

आधुनिक केसरी

**उन्हाळ्याचे दिवस होते... एप्रिल महिना संपत आला होता... उन्हाने पशु- पक्षांची, माणसांची तगमग होत होती. सकाळची वेळ होती... आमच्या बाई म्हणजेच माझी आजी पहाटेच अंगण झाडण्यासाठी बाहेर आली... अंगण झाडताना तिचे लक्ष पाण्याच्या टाकी समोर पाण्याने भरलेल्या टोपल्यात पडलेल्या इवल्याशा साळुंकी च्या पिल्लाकडे गेले... आमच्या घराच्या छताला पावसाचे पाणी बाहेर पडण्यासाठी सोडलेल्या पाईपांमध्ये साळुंकीने इवलेशे घरटे केले होते....**

ती अधून- मधून त्या घरट्यात येता जाता मला नेहमीच दिसायची... चोंचीत काहीतरी खाऊ आणून ती तिच्या पिलांना भरवायची. तिचा हा खेळ मी रोज पाहायची... तसे पाहिले तर छोट्या- छोट्या पक्षी ,प्राण्यांबद्दल का कुणास ठाऊक मला खूपच माया वाटते... बाईचे लक्ष त्या पिलाकडे गेले त्यावेळी मी झोपलेलीच होते. जेव्हा मी उठून बाहेर आले. तेव्हा मला बाईने सांगितले.,

"अगं दिदी साळुंकी चे पिल्लू खोप्यातून खाली पडलंय, बघ मी ते ओट्यावर उचलून ठेवलंय." बाईचे ते शब्द ऐकून मला खूपच वाईट वाटलं. मी ब्रश करण्याऐवजी आधी त्या पिल्लाकडे गेले. उंचावरून पाण्याच्या टोपल्यात पडल्यामुळे ते थंडीने गारठून कुडकुडत होते. त्याला थंडीने कुडकुडताना पाहून काय करावे मला काहीच सुचत नव्हते. आई चहा करत होती.मी पटकन घरात गेले. बाईंची देवापुजेच्या फुलांची एक प्लास्टिकची जाळीदार परडी घेऊन आले.साध्या टोपलीत त्या पिल्लाला कदाचित घाम आला असता.परडीत मी एक मऊ कापड अंथरले. त्या कपड्यावर स्पंच एक तुकडा ठेवला. गादी खालचा एक मऊ रुमाल घेतला. तो त्या स्पंचवर अंथरला... मला जसं कळेल तसं मी करत होते. नंतर त्या पिल्लाला पांघरण्यासाठी एक नॅपकिन घेतला. अलगद उचलून त्या पिल्लाला मी परडीत ठेवले. नंतर हळूच त्याच्या अंगावर नॅपकिन पांघरला.

नॅपकिन पांघरताच त्या पिलाला थोडीशी ऊब मिळाली. हळूहळू त्याचे कुडकुडणे कमी झाले. ते पिल्लू आता निपचित पडले होते. माझी आई पप्पा, दादा ,बाई सगळे पिल्ला जवळ येऊन थांबले. माझा ब्रश वगैरे झाल्यावर मी पुन्हा पिल्ला जवळ गेले. एका छोट्याशा वाटीत मी पाणी घेतले. मला वाटले उंचावरून पडल्यामुळे त्याला तहान लागली असेल. मी त्या पिल्लाच्या डोक्यावरून हळुवार हात फिरवला. माझ्या हाताचा त्याच्या डोक्याला स्पर्श होताच त्यांने चोंच उघडली. मी हळूच पाण्याचा एक थेंब त्याच्या चोंचीत सोडला आणि काय गंमत त्याने पुन्हा एकदा चोंच उघडली. मी एकेक थेंब त्याच्या चोंचीत टाकत गेले. पिल्लाने थोडेसे पाणी पिले आता त्याने चोंच उघडणे बंद केले होते. मला वाटले त्याचे पोट भरले असेल. असेच दिवसभर मी त्या पिल्लाच्या सारखे अवती भोवती फिरत होते. मी त्याचे नाव 'पिऊ'ठेवले.दुपारची वेळ झाली, मला वाटले त्याला भूक लागली असेल. मी एका डब्यातले गुपचूप थोडेसे तांदूळ घेऊन पिल्लाच्या जवळ आले. हळुवार पिल्लाच्या डोक्यावरून हात फिरवला. तशी पिल्लाने चोंच उघडली.एक छोटासा तांदळाचा तुकडा पिल्लाच्या चोचीत टाकला. तेवढ्यात आई आली. माझ्या मुठीतले तांदूळ पाहून मला म्हणाली,"अगं दिदी ते पिल्लू खूप छोटे आहे. ते कच्चे तांदूळ खाणार नाही."तिने मला समजावले. एका छोट्याशा वाटीत शिजवलेला मऊ भात घेऊन आई आली व मला





म्हणाली, "हा मऊ भात एक -एक कण त्याला खाऊ घालण्याचा प्रयत्न कर एकदाच खूप जास्त खाऊ घालू नकोस."आईचे ऐकून मी पिल्लाच्या डोक्यावर हळुवार हात फिरवला. त्याने लगेच चोंच उघडली. मी एक-एक कण भात त्याला खाऊ घालत होते अन् पिल्लूही भात खाऊ लागले. त्याला भात खाताना पाहून मला खूप आनंद वाटला. पिल्लाने थोडासा भात खाल्ल्यानंतर मी त्याला पुन्हा पाणी पाजवले. दिवसभरात सारखी अधून मधून मी त्याच्याकडे जायची.माझे दोन्ही भाऊ हर्षल दादा, प्रज्वल दादा व मी आम्ही तिघेही त्याच्याजवळ बसूनच जेवायचो. त्या पिल्लाला सोडून आम्हाला कुठेच जावेसे वाटत नव्हते. दोन दिवस सारखे असे चालू होते. घरातील सगळ्यांनाच त्या पिल्लाची जणू ओढच लागली होती.

पिल्लू ठेवलेल्या परडीतील कपडे मी अधून -मधून बदलायची ते धुऊन वाळवायची. वाळलेले स्वच्छ कपडे पुन्हा पिलासाठी अंथरायची. माझ्या आई- पप्पांनाही माझे खूप कौतुक वाटू लागले. माझी आई सुद्धा सकाळी उठली की,आधी त्या पिल्ला जवळ जायची. दोन दिवस आम्ही त्या पिल्लाला जपत होतो. आता ते चांगले खायला- प्यायला लागले होते. आम्हाला एका दिवसासाठी मामाकडे संभाजी नगरला जायचे होते. माझ्या मामीचा डोहाळ जेवणाचा कार्यक्रम होता. मला आई सोबत जावेसे वाटत होते अन् पिल्लासाठी त्याच्याजवळही राहावे असे वाटत होते . मी आई सोबत गावाला गेल्यावर पिल्लाकडे कोण बघेल ? ही काळजी मला वाटत होती. मी माझ्या आजीला ( बाई ) म्हणाले, "बाई आम्ही गावाला गेल्यावर तू पिल्लाची काळजी घेशील ना गं? मी जशी त्याला चारा पाणी वेळेला देते तसा तू देशील ना गं? माझा प्रश्न ऐकून बाई लटकेच मला म्हणाली,"मी नाही घेणार बाईत्या पिल्याची काळजी? मी काम करू का त्या पिल्याला बघू, बाई असे म्हणताच सगळे हसू लागले. तेवढ्यात आमच्या शेजारची माझी मैत्रीण पुनम आली. मी तिला म्हणाले,"पुनम मी गावाला गेल्यावर माझ्या पिल्ल्याकडे लक्ष देशील का गं?"पूनम हो म्हणाली. दुसऱ्या दिवशी पहाटेच आम्हाला संभाजीनगर ला जायचे होते. आईने सर्व तयारी केली होती. मी रात्री झोपेपर्यंत कितीदा तरी पिल्ल्याजवळ जात होते. पिल्ल्याच्या विचारातच मला रात्री झोप लागली. पहाटे पाच वाजताच आईने मला उठवले. सहा वाजता आम्हाला घराच्या बाहेर पडायचे होते. मी उठन्या पूर्वीच आईने सर्व आवरावर केली होती. मी उठताच त्या पिल्लाकडे गेले. अन् पाहते तर काय? ते पिल्लू काहीच हालचाल करत नव्हते. मी मोठ्याने आईला ,"आई गं SS ... म्हणून आवाज दिला. तशी आई माझ्याकडे आली. माझ्या डोक्यावर मायेने हात ठेवून मला म्हणाली, "हो दीदी!! मी उठले तेव्हा आधी पिल्ल्याकडे येऊन पाहिलं. त्याचा रात्रीच कधीतरी जीव गेला. "आईचे ते शब्द ऐकून मला खूपच रडू आले...आईने मला कुशीत घेऊन समजावले म्हणाली,"बाळा कदाचित त्याचे आयुष्य तेवढच असेल. तू त्याला जीवदान देण्याचा खूप प्रयत्न केलास. तेवढेच दोन-तीन दिवस त्याचे आयुष्य वाढले. तू दोन दिवस त्याच्या चारा-पाण्याची सगळी सोय केली यातच सगळे आले. आता फार वाईट वाटून घेऊ नकोस,"

मी कशी-बशी ब्रश करायला गेले. आईने पटापटा माझे आवरून दिले. गाडीची वेळ होतच आली होती.आई, मी, माझे दोन भाऊ व आईचे मामा- मामी मी सगळे संभाजीनगरला जाणार होतो. घराबाहेर पडण्यापूर्वी पुन्हा एकदा त्या परडीतल्या पिल्लाकडे मी पाहिले. त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला... आणि आम्ही स्टेशनला जायला निघालो. स्टेशनला जाईपर्यंत माझ्या मनात पिल्लाचाच विचार सारखा येत होता... वाटलं स्वतःचा जीव देऊन त्याने माझी काळजीच मिटवली होती की काय? खरंच कोणतंही पिल्लू त्याच्या आईला सोडून राहूच शकत नाही हेच खरे...दोन दिवसाचा जिव्हाळा लावून ते पिल्लू आम्हाला अखेर सोडून गेले...

# तणावाचे व्यवस्थापन



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052


आधुनिक केसरी

**आपला स्वतःचा चेहरा हा अंतर्मनाचा प्रतिबिंब दाखवणारा आरसा आहे. आपल्या मनात जी खळबळ सुरू असते ते चेहऱ्यावर त्याचे पडसाद लगेच उमटतात. त्यामुळे अंतर्मनात उमटल्या जाणाऱ्या विचारांच्या लहरींवर ज्याला तरता येते तोच आयुष्याचा भवसागर तरुन जाऊ शकतो.**


देहरूपी प्रकृतीला जर काही वेदना झाल्या तर लगेच उपचार घेता येतात. पण मनावर जे आघात होतात त्यावर उपचार कसा करावा हे बऱ्याच अंशी लक्षात येत नाही आणि त्यामुळे ताण वाढत जातो. मनाची चलबिचल होणं, मनात सतत अस्वस्थता निर्माण होणं, छोट्या छोट्या गोष्टींनी क्रोधीत होणं, इतरांची घृणा, द्वेष करणं म्हणजेच तणाव वाढत आहे, हे लक्षात यायला हवं. कारण आपण डॉक्टरांकडे जातो तेंव्हा आपल्याला माहीत असतं की काय होत आहे, नेमका त्रास कोणता होत आहे, तेंव्हाच डॉक्टर उपचार करतात ना! अगदी तद्वतच कोणत्या गोष्टींचा मनावर ताण येतो याची उकल जर झाली तर जीवन आनंदी व्हायला फार वेळ- काळ लागणार नाही. ताण काय फक्त मोठ्या माणसांनाच येतो का? असे नाही जेंव्हा लहान मूल चिडचिडेपणा करते, बंडखोरी करते, सांगितलेले ऐकत नाही म्हणजेच त्याचे मन त्याच्या ताब्यात नाही. मनामध्ये प्रचंड अस्वस्थता आहे हे आपण समजून घ्यायला हवे. एकंदरीत काय लहान चिमुरड्यां बालकांपासून ते वयोवृद्ध लोकांपर्यंत प्रत्येक जण तणावाखाली आहे. ह्याच तणावाचे व्यवस्थापन कसे करायचे याचे अपुरे ज्ञान त्यामुळे सर्वजण विविध आजारांच्या विळख्यात अडकले आहेत. आपणच देहाची नऊ द्वारे आजारांसाठी स्वतः ताण घेऊन खुली केली आहेत. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या आजाराची दररोज एक गोळी खात आहे याला कारण एकच ते म्हणजे बदललेली जीवन शैली त्याचा मनावर आलेला ताण. आपल्यात अंतर्गत बदल झाला की तो सर्वात आधी स्वतःलाच जाणवतो मग देहबोलीतून बाहेर प्रकट होतो. म्हणून आपण स्वतः तणावमुक्त जीवन जगायचं. आनंदी राहण्याचा प्रयत्न करायचा. प्रत्येक जण मी आनंदी कसा आहे हे दाखवण्याचा अटोकाट प्रयत्न करत असतो. पण वास्तव चित्र उलट असल्याचे दिसून येते. डिजिटल युगात स्टेटस ला आपण अत्यंत महत्व दिल्याने सुखी, आनंदी दाखवण्याचा अट्टाहास सुरू झाला आहे. याच छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आपण इतके अडकत आहोत की, खरा आनंद इतरांना सुखी आहे दाखवण्यापेक्षा आनंदी राहण्यात आहे. हेच प्रत्येकजण विसरत चाललो आहे त्यामुळेच खरंतर तणावग्रस्त बनत आहोत. मग ह्या तणावाचे व्यवस्थापन करायचं म्हणजे नेमकं काय करायचं ? असाही प्रश्न स्वतःला पडत असतो. फक्त तो विचार अधिक काळ टिकत नाही, चिंतन अधिक होत नाही त्यामुळे जीवनाचं रहाट गाडगं तसंच चालू राहतं. म्हणून तणावाचे व्यवस्थापन करत असताना प्रथम मनावर हळूहळू काम करायला सुरुवात करायची. मला अतिशय छोट्या छोट्या गोष्टींचा राग का येतो यावर प्रथम काम करायचे, त्या रागाचे प्रमाण हळूहळू जाणीवपूर्वक कमी करायचे.

आपण क्रोध करतो इतरांचा, द्वेष करतो इतरांचा, प्रेम करतो इतरांवर, बदलावं वाटतं इतरांनी, मला आनंद द्यावा इतरांनी, माझ्यावर प्रेम करावं इतरांनी, माझं कौतुक करावं इतरांनी... हा मनीचा भाव अधिक वेदना देणारा आहे, अधिक ताण निर्माण करणारा आहे. म्हणून जीवनशैलीत प्रथम बदल करायला हवा. मी दररोज स्वतः साठी एक तास देईल, मी माझ्या कुटुंबातील व्यक्तीसाठी दररोज वेळ देईल, मला माझ्या मनावर ताण येणाऱ्या गोष्टी मी मोकळेपणाने सांगायला सुरुवात करेल, लहान सहान गोष्टीत आनंद शोधेल, चार तास मोबाईलला देण्यापेक्षा मी अर्धा तास वाचन करेल, स्वतःची कामे स्वतः करेल, वर्तमानात अधिक काळ जगण्याचा प्रयत्न करेल असं स्वतःशी ठरवलं आणि नित्य क्रम जर न चुकता सुरू झाला तर प्रत्येकाचा चेहरा बिना क्रीम पावडर चा आनंदाने उजळल्या शिवाय राहणार नाही. खोट्या मुखवट्यांची गरज पडणार नाही.

तंत्रज्ञानाच्या युगात संपर्क संख्या अति प्रमाणात वाढलेली आहे पण हक्काने ज्याच्याशी बोलावं, मनमोकळं करावं असं एकही व्यक्तिमत्व जवळ नाही. आपण गर्दीत असूनही एकाकी जीवन जगत आहोत. आपल्या मनाप्रमाणे घटना घडल्या तर आपल्या सारखा आनंदी जीव कोणताच नाही. मनासारखे नाही घडले तर सर्व जगाचं दुःख आपल्यालाच असल्यासारखे आपण वावरत असतो. म्हणून सोडून द्यायला शिकलं पाहिजे. तणावाचे व्यवस्थापन करण्याची कला ज्याला अवगत झाली तोच ह्या कलियुगात आनंदाने वावरू शकतो. **मन का हो तो अच्छा... मन का ना हो तो और भी अच्छा...**



# राणी चेन्नम्मा



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**_राणी चेन्नमा या कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील कित्तूर या संस्थानाच्या राणी होत्या. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीविरूद्ध राणीने दिलेला लढा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण होता. या राणीने ब्रिटिशांच्या दडपशाहीच्या विरोधात सन १८२४ ते १८२९ सालापर्यंत शौर्याने लढा दिला आणि मातृभूमीसाठी प्राणार्पण केले.**

त्यांची महती व शौर्य अशा शब्दांत कोरून ठेवलेले आढळून येते- "लक्ष्मीरहल्या चेन्नम्मा रूद्रमाम्बा सुविक्रमा| निवेदिता सारदा च प्रणम्या मातृदेवताः||"मातृदेवता म्हणून राणी चेन्नमा प्रातःस्मरणीय ठरल्या आहेत. त्या कर्नाटकातील कित्तूर राज्याच्या राणी होत्या. राणी चेन्नमा या इंग्रजांविरुद्ध सन १८२४ साली सशस्त्र लढा देणाऱ्या वीरांगना होत्या. त्या कर्नाटकच्या लोकनायिका होत्या.

राणी चेन्नमाचा जन्म दि.२३ ऑक्टोबर १७७८ रोजी पुणे-बेंगळूरू महामार्गावरील कर्नाटक राज्यातील जिल्हा बेळगाव कित्तूर- काकती गावातील किल्ल्यात झाला. आंध्रातील काकतीय लिंगायत संप्रदायाचे उपासक असलेल्या राजघराण्यातील घुलप्पा देसाई आणि त्यांची पत्नी पद्मावती यांच्या पोटी झाला. लहानपणापासून चेन्नमाला तिरंदाजी, अश्वारोहण, तलवारीचे युद्ध, भालायुद्ध अशा मर्दानी कलांची आवड तर होतीच, शिवाय या सर्व कलांमध्ये तिने प्रावीण्यही मिळविले होते. चेन्नमाला कानडी, मराठी, उर्दू या भाषा अवगत होत्या. दिल्ली येथील विधानभवनात राणी चेन्नमा यांच्या पुतळ्याचे अनावरण तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सन २००७ साली करण्यात आले आहे. राणी चेन्नमा यांना संस्कृत भाषा सुद्धा ज्ञात होती.

वयाच्या १५व्या वर्षी त्यांचा विवाह कित्तूर येथील मल्लसर्जा या राजकुमाराशी झाला. विधात्याने आयुष्य अगदी साधे सरळ आखून दिले नाही. सन १८१६ मध्ये तेथील सगळ्या विरांगनांसह महाराजा आणि सन १८२४ साली त्यांचा एकुलता एक मुलगा राजकुमार मल्लसर्जा यांचेही निधन झाले. त्यामुळे कित्तूरच्या संपूर्ण राज्याची अवजड जबाबदारी राणीवर येऊन पडली. याही परिस्थितीत त्या मुळीच डगमगल्या नाहीत. केवळ त्यांच्या आयुष्याने थोडी कलाटणी घेतली एवढेच! कित्तूर राज्यासाठी वारसदार म्हणून राणींनी शिवलिंगप्पा यांना दत्तक घेतले. आता इंग्रजांनी आपले सारे लक्ष कित्तूरवर केंद्रित केले होते. इंग्रजी कायद्याप्रमाणे जे राजे निपुत्रिक मृत्यू पावतात, त्यांच्या राज्याचा कारभार इंग्रज हुकूमत आपल्या ताब्यात घेत असे. दत्तक मूल हे वारसदार म्हणून त्यांना मान्य नव्हते. कित्तूर आता इंग्रजांच्या राजवटीखाली जाऊ नये, म्हणून राणी चेन्नमा यांनी वेळीच तत्कालीन लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना पत्र लिहून आपला मुद्दा प्रदर्शित केला. परंतु, इंग्रजांचे लक्ष्य तर संपूर्ण भारतवर्षच गिळंकृत करण्याकडे लागले असताना चालून आलेली सुवर्ण संधी ते कशी काय सोडणार, नाही का? पत्राच्या उत्तरादाखल इंग्रजी सैन्याला पाचारण करण्यात आले. वीस हजाराच्या वर सैन्य आणि दारुगोळा घेऊन इंग्रजांनी कित्तूरवर हल्ला चढविला. राणी चेन्नमा यांनीही आपल्या सैन्यासह या हल्ल्याला कडवे प्रत्युत्तर दिले. इंग्रजांना नुसतीच हार पत्करावी नाही लागली, तर त्यांचे मोठे अधिकारी मारले गेले होते. त्याच बरोबर काही अति महत्वाचे अधिकारी युद्धबंधक बनविण्यात आले होते. बडा इंग्रज अधिकारी कॅपलीन यांच्याशी झालेल्या तहात या बंधकांना सोडण्यास आल्यास युद्ध थांबविण्यात येईल आणि कित्तूर स्वतंत्र राहील, असे ठरले. परंतू आपला शब्द प्राणपणाने पाळतील, ते इंग्रज कसले? त्यांनी फिरून वार केला. राणी चेन्नमांनी प्रयत्नांची शर्थ केली, प्राणांची बाजी लावली. तरीही त्यांना बंधक बनविण्यात इंग्रज यशस्वी झालेच.

त्यांना बेळहोंगळ किल्ल्यात युद्धबंदी म्हणून कोंडून ठेवण्यात आले होते. त्यांच्या पश्चात त्यांचे सेनापती संगोली रायन्ना यांनी युद्ध चालू ठेवले होते, पण तेही मारले गेले. कित्तूर आता पराभूत झाले. राणीचे दत्तकपुत्र शिवलिंगप्पा यांनाही वीरमरण पत्करणे भाग पडले होते. राणी युद्ध कैदेत जखडून असतानाच त्या वीरगतीला प्राप्त झाल्या. हरामखोर संगप्पा व हुराकडली या दोन सरदारांनी फितूर होऊन इंग्रजांना शहरात शिरण्याच्या चोरवाटा दाखविल्याने इंग्रजांनी किल्यात घुसून राणी चेन्नमाला पकडले होते. राणी चेन्नमाला इंग्रजांनी पकडून बेळहोंगळच्या कारागृहात ठेवले. त्याच कारागृहात दि.२१ फेब्रुवारी १८२९ रोजी राणी चेन्नमाचे दुःखद निधन झाले होते. इंग्रजांविरुद्ध लढा किती काळापासून सुरू होता, त्याचे जीतेजागते उदाहरण राणी चेन्नमा यांचा कित्तूर वाचविण्यास दिलेला प्राणांतिक लढा होय.

!! चला तर, परत परत त्यांच्या जयंती व हौतात्म्य दिनी त्या मातृशक्तिला वंदन करून स्मरण करुया !!



# भावनिक तरलता आणि समाजभान यांचा उत्तम समतोल



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**प्रत्येक व्यक्तीमध्ये कोणते ना कोणते कलागुण असतात. ते ओळखता यायला हवेत आणि त्यात सातत्य ठेवता आले पाहिजे. मग बघा जीवन अधिक सुंदर होते. व. पु. म्हणतात की, 'छंद माणसाला जगायला शिकवतात'. पोटापाण्याचा व्यवसाय कोणताही असू दे पण एखादी कला जोपासली की जगणं सुलभ होते. आपल्या आजूबाजुला नकारात्मकता पुरेपूर भरलेली आहे.पण सकारात्मकतेची बीजे ही जाणिवपूर्वक पेरावी लागतात. हिच सकारात्मकतेची बीजे कवी नारायण गाडेकर यांच्या मनात महाविद्यालयीन जीवनापासूनच रुजली गेली. कवितेमध्ये रमणाऱ्या कवी गाडेकर यांना विविध जबाबदाऱ्या, पोलीस खात्यातील कामाची व्यस्तता यामुळे छंद जोपासण्यास वेळ मिळत नव्हता पण एक़ा ठरावीक टप्पावर त्यांनी कामातून वेळ काढून आवड जोपासली.**

महाविद्यालयीन जीवनात रुजलेल्या काव्यबीजांचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले आहे, तो वटवृक्ष म्हणजे 'शब्दसुगंध' काव्यसंग्रह होय.

पोलीस खात्यातील रूक्ष वातावरणात आपल्या मनातील ऋजुता आणि संवेदनशील भाव जपणारे कवी नारायण गाडेकर यांचा नुकताच 'शब्दसुगंध' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. माणुसकी जपण्याची शिकवण आणि सामाजिक भाव जपण्याची प्रेरणा कवीला आपल्या कुटुंबाकडून प्राप्त झाली. आई-वडिलांच्या मायेच्या सावलीत मोठे होताना मेहनतीने जगण्याचे संस्कार लाभले. या स्नेहबंधातून साकारलेले भावनांचे नितांत सुंदर प्रतिबिंब म्हणजे 'शब्दसुगंध' कवितासंग्रह होय. 'शब्दसुगंध' कवितासंग्रहात ५१ कवितांचा समावेश असून या कविता जनमानसाला सहज आकलन होतील, अशा शब्दरचनेने सजलेल्या आहेत. मानवी भावभावनांची मनोवेधक रचना, निसर्गाशी असलेले अबोल नाते, प्रीतीचे रंग, अंतर्मनातील भावकल्लोळ,जीवनातील गमक, समाजाप्रति, देशाप्रति असणारी कटिबद्धतेची भावना, मायमराठी, महाराष्ट्रभूमीविषयीचा अभिमान आणि विचारांची गहन व्याख्या सोप्या शब्दात उलगडणाऱ्या कविता या संग्रहात समाविष्ट आहेत.

ज्या सामाजिक वातावरणात आपलं व्यक्तिमत्त्व घडत असतं, त्या वातावरणाचा खोल परिणाम आपल्यावर होत असतो.त्याच जाणिवा, अनुभव लेखणीतून परावर्तित होतात.व.पु. म्हणतात की, माणूस ह्रदय घेऊन जन्माला येतो पण तो बुद्धी समाजाकडून घेतो.या समाजाप्रति आपण काहीतरी देणं लागतो, आपण कटिबद्ध आहोत, ही सामाजिक जाण, कृतज्ञतेची भावना जपणारे कवी नारायण गाडेकर आहेत. 'अति उत्कट असं काही असतं तेव्हा कविताच ती उत्कटता पेलून धरु शकते, असं कायम वाटतं.' - व . पु. नी सांगितलेली काव्यक्षमता लक्षात घेऊन कविने व्यक्त होण्यासाठी कवितेचं माध्यम निवडले. कवीची कविता फक्त स्वतःपुरते टाहो फोडणारी नाही तर इतरांच्या डोळ्यातील अश्रु पुसणारी असून त्यांची कविता ही कुठेही आत्ममग्न , स्वकेंद्री राहत नाहीतर समाजातील विविध घटकांचा समावेश या कवितांमध्ये केलेले आढळून येते. 'शब्दसुगंध' कवितासंग्रहातील 'प्रतिबिंब' ही कविता पाहू : **'कधी वाटते असे असावे, कधी वाटते असे जगावे...** आपल्यापाशी जे जे सुंदर ते इतरांना वाटत जावे' या कवितेतून कवीच्या निःस्वार्थ मनाची छबी दिसून येते. आपल्याकडे ज्या चांगल्या गोष्टी आहेत, त्या इतरांना देण्याची वृत्ती कवीने जपली आहे. पण आपल्या आजूबाजूच्या निसर्गाकडूनही आपण ही निःस्वार्थ भावना जपण्यास शिकले पाहिजे, हा संदेश दिला आहे.

शस्त्राने जे वार होतात त्याचे व्रण शरीरावर दिसतात पण जिभेने होणारे शाब्दिक वार मनावर खोल जखमा करतात , तेव्हा 'शब्दांचा खेळ' कवितेतून कवी सांगत आहे की,

**'शब्दानेच शब्द वाढतो,**
**शब्दाला कधी कमी समजू नका**
**म्हणे धार असते शब्दाला**
**शाब्दिक वार करू नका'**

प्रत्येकाने बोलताना कशी काळजी घ्यायला हवी आणि कोठे बोलावे, कोठे बोलू नये याचा विचार करणं आवश्यक आहे.

'सरिता' , 'श्रावण मास', 'ऋतु दिवाळा', 'पहाट' अशा कवितांमधून निसर्गशक्तिच्या विविधांगी रूपाचे वर्णन केले आहे. ऋतुमानानुसार परिसरात होणारे बदल अत्यंत बारकाईने कवीने टिपले आहेत.

**'टिचभर पोटासाठी ते खरकटे खाताना**
**त्याचे डोळ्यातून जे अश्रु वाहिले**
**तेव्हा भूक काय असते ते**
**या डोळ्यांनी पाहिले'**

'भूक' कवितेतील या ओळी खरेच डोळ्यात अंजन घालणाऱ्या आहेत.समाजात गरीब- श्रीमंत दरी वाढताना दिसते. विविध समारंभात अन्नाची होणारी नासाडी ही गंभीर बाब आहे. काहीना पोटभर अन्न मिळत नाही आणि दुसरीकडे कित्येक अन्नपदार्थ ताटात घेऊन टाकून दिले जाते. कवीने या समस्येकडे आपले लक्ष वेधून घेतले आहे. आवश्यक असेल तेवढेच ताटात घेतले पाहिजे त्यासोबतच भुकेल्या जिवाला अन्नदान करण्याची भूमिका आपण निभावली पाहिजे, ही जाणीव कवीने करुन दिली आहे.

सामाजिक भेदामुळे अस्वस्थ झालेला कवी प्रेयसीच्या आठवणीत रमणाऱ्या प्रियकराच्या भावना तितक्याच रसिकतेने व्यक्त करतो. 'आठवण' कवितेत कवी म्हणतो,

**'तुझं ते समोर असणं**
**चारचौघीत उठून दिसणं**
**कधी उगाच रुसून बसणं**
**सांग मी कसं विसरु**
**तुझं ते खळखळून हसणं'**

पैसा जगण्यासाठी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करुन देणारे साधन आहे, त्यामुळे जगणं सुखकर होते पण समाधानी नाही. पैशांमुळे लाभणारा आनंद आणि होणारे दुःख अशा दोन्ही बाजू कवीने 'पैसा' कवितेत मांडल्या आहेत.

शेतात राबणाऱ्या कवीने आपल्या शेतकरी बांधवांच्या वेदना, समस्या जवळून पाहिल्या आहेत. ज्याच्या राबण्यामुळे संपूर्ण जगाला अन्न प्राप्त होते, त्या अन्नदात्याच्या समस्यांवर कवीने विचारमंथन केले आहे. अवकाळी पावसामुळे पिकांची होणारी नासाडी, महागडे बी- बियाणं, पिकाला योग्य भाव न मिळणं, नुकसानभरपाईची आश्वासने, सावकारी कर्जाचा बोजा यामुळे शेतकरी आत्महत्येचा पर्याय स्वीकारतो, आम्ही जगायचे कसे, असा प्रश्न त्याला पडला आहे,ह्या समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रामाणिक प्रयत्न कवीने 'बळीराजा' कवितेतून केला आहे. देशभक्ती', ' सैनिक', 'खाकी' या कवितांमधून समाजासाठी, देशासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या घटकांप्रति आदरभाव, कृतज्ञता आणि अभिमान व्यक्त होतो आहे. पोलीस खात्याविषयी समाजात असणारी रूढ प्रतिमा,उदासिनता बदलण्याचा प्रयत्न या कवितेत केलेला आहे. 'मायेची सावली' , 'आई' आणि 'स्त्री' या कवितेत स्त्रित्वाच्या संवेदनशील, वात्सल्य, त्याग याने आपले आयुष्य व्यापून टाकणाऱ्या स्त्रीशक्तिला कवीने मानाने अभिवादन केले आहे. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या संग्रहाला अंतरीच्या भावनांचा परिसस्पर्श लाभलेला आहे.

मनाच्या गाभाऱ्यातील नितळ, पारदर्शी प्रवाह 'शब्दसुगंध' होऊन दरवळत आहे. जगण्यातील विविध स्थित्यन्तरे वैचारिक दृष्टिकोनातून व्यक्त होणाऱ्या या कविता अस्सल जगरहाटीचे दर्शन घडवणाऱ्या आहेत.या कवितासंग्रहाला सुप्रसिद्ध गीतकार, कवी अरूण म्हात्रे यांची आस्वादक प्रस्तावना लाभली आहे. कवितासंग्रहाचे लक्षवेधक मुखपृष्ठ संदेश सावंत यांनी साकारले आहे. अंतर्मनाच्या कुपीत भावरंगाचा सुगंध कायमस्वरूपी साठवून ठेवण्यासाठी 'शब्दसुगंध' नक्की अनुभवा !




**(शब्दसुगंध - कवितासंग्रह /कवी : नारायण गाडेकर / प्रकाशक :शारदा प्रकाशन / मूल्य : १०० रुपये )**

# को ऽ जागर्ति



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात सर्व दूर कोजागिरी पौर्णिमा मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. कोजागिरी पौर्णिमेचे सांस्कृतिक आणि धार्मिक दोन्ही महत्त्व आहे. आश्विन पौर्णिमा ही कोजागरी पौर्णिमा किंवा शरद पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. हिलाच 'माडी पौर्णिमा' असेही म्हणतात. ही शरद ऋतूतील आश्विन महिन्यात येते. म्हणून अश्विनी करतात. घरातील मोठ्या अपत्याला औक्षण करतात. यावर्षी चंद्रग्रहण असल्यामुळे कोजागिरी पौर्णिमा केव्हा साजरी करावी याविषयी संभ्रम निर्माण झालेला आहे. काहींच्या मते 28 तारखेलाच कोजागिरी साजरी करावी तर काहींच्या मते 29 ला कोजागिरी साजरी करावी असे मत आहे. शरद पौर्णिमा शनिवारी 28 ऑक्टोबर रोजी पहाटे 4 वाजून 17 मिनिटांनी सुरू होऊन रविवार 29 ऑक्टोबर रोजी मध्यरात्री 1 वाजून 52 मिनिटांनी समाप्त होईल. पौर्णिमेला चंद्रोदयाची वेळ 28 ऑक्टोबरला संध्याकाळी 5 वाजून 20 मिनिटांनी सुरू होणार आहे.**

या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. या दिवशी घेतलेले औषध लवकर लागू पडते असा समज आहे. ह्या दिवशी पाळावयाच्या व्रताला 'कोजागरव्रत' म्हणतात. दिवसा उपवास करून रात्री लक्ष्मी व ऐरावतारूढ इंद्र यांची पूजा करावी; या पूजेनंतर रात्री चंद्राला आटीव दूधाचा नैवेद्य दाखवायचा असतो. दूध आटवून त्यात केशर, पिस्ते, बदाम, चारोळ्या, वेलदोडे, जायफळ वगैरे गोष्टी घालून,.त्या दुधात मध्यरात्री पूर्ण चंद्राची किरणे पडू देतात आणि ते दूध मग प्राशन केले जाते. उत्तररात्रीपर्यंत जागरण केले जाते. अशी आख्यायिका सांगतात की या दिवशी उत्तररात्री साक्षात लक्ष्मी चंद्रमंडळातून पृथ्वीवर उतरते व लक्ष्मीदेवी येऊन 'को जागर्ति',म्हणजे 'कोण जागत आहे' असे विचारते, म्हणून या दिवसाला 'कोजागरी पौर्णिमा' म्हणतात. आरोग्यदृष्ट्या ही पौर्णिमा महत्त्वाची मानली जाते किंवा अस्थमा या सारख्या आजारावर औषध दिले जाते.



औषध दुधात मिसळून कोजागिरीच्या रात्री चंद्राच्या प्रकाशात ठेवले जाते त्यामुळे त्याचे गुणधर्म दुधात उतरून ते औषध परिणामकारक ठरते असे मानतात. काही भागात कोजागिरी पौर्णिमेला दूध आणि तांदळाची खीर तयार करून ती चंद्राच्या प्रकाशात ठेवतात. शेतकरी वर्गात हा दिवस उत्साहाने ग्रामीण भागात साजरा होतो. नवीन धान्य घरात आलेले असते त्याची पूजा करतात. या दिवशी कुटुंबातील ज्येष्ठ अपत्याला ओवाळून अश्विनी साजरी करतात, व त्यांच्या भरभराटीसाठी एकमेकांना शुभेच्छा देतात. आशीर्वाद देतात. आज तुमच्याकडे काय आहे ? असे महिला औक्षणानंतर एकमेकांना विचारतात, तेव्हा आमच्या घरी अश्विनी आहे. तेव्हा दुसऱ्या महिला म्हणतात तुमची मुलं सिंहासनी. असा म्हणण्याचा प्रघात आहे. स्त्रिया एकमेकांच्या कडे जाऊन औक्षण करतात. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या अगदी जवळ असतो अनेक ठिकाणे लक्ष्मीची उपासना केली जाते. अनेक पौराणिक कथात शरद पौर्णीमा हा लक्ष्मीचा जन्मदिवस मानला जातो.पौराणिक कथांनुसार त्या दिवशी ती समुद्र मंथनातून प्रकट झाली होती. कोजागरी पौर्णिमेच्या रात्री चंद्र आपल्या संपूर्ण १६ कलांमध्ये असतो. चंद्राची किरणं विशेष अमृतमयी गुणांनी युक्त असतात. श्रीकृष्ण १६ कलांचे अवतार मानले जातात. द्वापार युगात वृंदावनमध्ये भगवान श्रीकृष्णाने गोपिकांसोबत रात्री रासक्रीडा, महारासलीला केली होती. वृंदावनात निधिवनात आजही श्रीकृष्ण आणि गोपिका रासलीला रचतात अशी मान्यता आहे. त्या विशेष प्रसंगाची आठवण करुन वैष्णव संप्रदायाचे भक्त रासोत्सव साजरा करतात. श्रीकृष्ण आणि राधाची विशेष उपासना केली जाते. कोजागरी पौर्णिमेच्या अनेक कथा आहेत, त्यापैकी एक अशी सांगितली जाते की, एकदा एक राजा आपले सगळे वैभव्य आणि संपत्ती गमावून बसतो. त्याची राणी महालक्ष्मीचे व्रत करते आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होऊन तिला आशीर्वाद देते आणि त्या राजाचे वैभव त्याला परत मिळते. असं म्हणतात की महालक्ष्मी मध्यरात्री या चंद्रमंडलातून उतरून खाली पृथ्वीवर येते. ती चांदण्यांच्या प्रकाशात "अमृतकलश' घेऊन प्रत्येकालाच विचारते, की "को जागर्ति...? को... जागर्ति...?' म्हणजे आपल्या कर्तव्याला कोण जागृत आहे का? कुणी जागं आहे का? अन् तिच्या हाकेला साद देण्यासाठी सगळेच जागे राहतात. मग तिची वाट पाहणाऱ्या, साद देणाऱ्या सगळ्यांना ती "अमृत' म्हणजे लक्ष्मीचं वरदान देते, धनधान्य, सुखसमृद्धी देते.

हा दिवस वेगवेगळ्या राज्यात जसे गुजरात, राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, आदी ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने दिवस साजरा होतो. अनेक शहरात कोजागिरी पहाट म्हणून गायनाचे, संगीताचे,भक्तिगितांचे कार्यक्रम सादर होत असतात. लक्ष्मीच्या स्वागतार्थ रात्री रस्ते, घरे, मंदिरे, उद्याने, घाट इ. ठिकाणी असंख्य दीप लावतात. रोषणाई करतात. सनत्कुमार संहितेत ह्या व्रताची कथा दिली आहे. प्राचीन काळी याच दिवशी 'कौमुदी महोत्सव' साजरा करीत. 'कौमुदी पौर्णिमा' व 'शरदपौर्णिमा' अशीही नावे ह्या दिवसाला आहेत. पावसाळ्यानंतर थंडीची चाहूल लागली असते. वातावरण प्रसन्न असते. शरद ऋतूतील ही पौर्णिमा असल्यामुळेही तिला उत्सवाचे महत्त्व आले असावे. तांब्याच्या किंवा मातीच्या कलश्यावर वस्त्राने झाकलेली सोन्याची लक्ष्मीची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करून पूजा करतात. संध्याकाळी चंद्रोदय झाल्यावर सोने, चांदी किंवा मातीचे तुपाने भरलेले दिवे लावतात. देवीला नैवेद्य दाखविला जातो. तूप घातलेली खीर तयार करून व बऱ्याच पात्रात भरून ती चंद्र किरणांखाली ठेवतात. ती नंतर संपूर्ण खीर लक्ष्मीला अर्पित करून ब्राह्मणांना प्रसाद म्हणून वाढतात. त्याबरोबर मंगल गाणी म्हणून, भजने म्हणत रात्री जागरण करतात. कोजागरी पौर्णिमेच्या मध्यरात्री देवी महालक्ष्मी आपल्या कर कमलांमध्ये वर आणि अभय घेऊन भाविकतेने आपले व्रत करणाऱ्याला प्रसन्न होत असते. जो मनुष्य जागून माझी पूजा करत असेल त्याला मी अपार अपार धन-धान्य देईन, असे ती म्हणते. दरवर्षी करण्यात येणारे हे व्रत लक्ष्मीला संतुष्ट करण्यासाठी केले जाते. त्याने लक्ष्मी प्रसन्न होऊन समृद्धी लाभतेच पण मृत्यूनंतर परलोकातही सद्‌गती मिळते. भाद्रपद महिन्यात अनंत चतुर्दशीनंतर पौर्णिमेला अनेक ठिकाणी मुली आणि स्त्रिया भुलाबाई आणि भुलोजीची स्थापना करतात. भुलाबाई म्हणजे पार्वती आणि भुलोजी म्हणजे शंकर अशी त्यामागची भावना आहे. पहिली ग भुलाबाई देवा देवा साथ दे... साथीला खंडोबा खेळी खेळी खंडोबा.....किंवा सा बाई सु, सा बाई सु, बेलाच्या झाडाखाली महादेवा तू हार गुंफिला, विडा रंगीला, झेंडूची फुले माझ्या भुलाबाईला..अशी गाणी महिनाभर रोज संध्याकाळी गाणे म्हणतात. काही ठिकाणी गुलाबाई आणि गुलोजी असेही म्हणतात. कोजागिरी पौर्णिमेला गाणे म्हणून जागरण करून आणि कोजागिरीची आटवलेले दूध घेऊन याची सांगता करतात व दुसऱ्या दिवशी आरती करून त्यांचे विसर्जन करतात. शहरी भागात कमी पण ग्रामीण भागातच हा गुलाबाई गुलोजीचा सण साजरा करताना दिसतात. परंतु आजच्या बदलत्या जीवनशैलीत/ काळाचे ओघात अशा बऱ्याचशा गोष्टी बदलत चालल्या आहेत. पूर्वीच्या काळी सर्वजण एकत्र जमून, मग ते कुटुंबातील सदस्य, मित्रमंडळी, महिला मंडळ, असे सर्व एकत्र जमून चांदण्या रात्री चंद्रप्रकाशात आटवलेल्या दुधाचा स्वाद घेत असत. एकवेगळाच आनंद होता. पण आता त्यात खूपच बदल होत चालला आहे.आनंद मिळवण्याचे मार्ग बदलले आहे. काही काही ठिकाणी कुटुंब एकत्र येतात, नाही असे नाही.मंडळ ही आहेत. पण बऱ्याच ठिकाणी कोजागिरी पौर्णिमेला पार्टीचे स्वरूप आले आहे, हे मात्र काही बरे वाटत नाही. पूर्वापार चालत आलेल्या ह्या चांगल्या परंपरा यांची जपणूक व्हायला हवी. ह्या दिवशी विष्णुसहस्त्रनामाचे पठाण तसेच चंद्राशी संबंधित मंत्र तसेच देवी महालक्ष्मीची संबंधित मंत्राचा जप अवश्य करावा.

# बापानों, तुम्ही सावध व्हा; मोबाईलपासून लेकरं दूर ठेवा



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने होत असलेली वाटचाल लाभधारक वाटत असली तरी करोना संकटापासून सुरू झालेला ऑनलाईनचा जमाना ज्या विळख्यात लेकरं आडकली असुन समाज व्यवस्थेला भविष्याच्या दृष्टीने फारच मोठा धोका म्हणावा लागेल.काळाची गरज म्हणुन ऑनलाईन शिक्षण आलं पण त्याला चिकटुनच लेकरं राहिली. ज्याचे परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. शाळेत जायचं वय झाल्यानंतर लेकराची शाळा सुरू होते. पण आता खऱ्या अर्थाने पालकांनी सावध होवुन पहाटच्या शाळा मोबाईलविना घरी करण्याची गरज वाटते. ज्यांचे पालक सावधान, त्यांची लेकरं छान छान असं म्हणायला आता हरकत नाही. मोबाईल कचाट्यातून मुक्ती मिळण्यासाठी पालकांनीच दक्ष रहाण्याची गरज वाटते.**

मोबाईलच्या ठोकड्याला खेळणी समजुन पाळण्यातल्या लेकराला देखील आई जेव्हा मोबाईल हातात देते तेव्हा आपणच आपल्या लेकरांचं नुकसान किती करू लागलो? हे न सांगणे बरे.

करोनासारख्या काळात ऑनलाईन शिक्षणाच्या नादात विद्यार्थ्यांच्या गळ्याभोवती मोबाईलचा विळखा (फास) कमी होण्यापेक्षा वाढत जाताना दिसतो. ज्याचे दुष्परिणाम आरोग्यावर आणि मानसिकतेवर मोठ्या प्रमाणावर व्हायला लागले. लेकरांवर आलेले हे फार मोठं संकट असुन ज्यातुन बाहेर पडण्यासाठी शाळा शिक्षकावर अवलंबुन रहावे असं जर पालकांना वाटत असेल तर तो चक्क मुर्खपणा आत्मघातकीपणाचा म्हणावा लागेल. एखादी सवय भारतीयांना लागल्यानंतर जंगलाला आग लागल्याप्रमाणे अंगवळणी पडते. जो काळ संपर्काचा पोस्टमेनवर होता. त्या अगोदरही प्राण्याच्या चोचीत पत्र पाठवण्याची प्रक्रिया कदाचित मैने प्यार किया चित्रपटातुन सर्वांनीच पाहिली. अनेक संकल्पांना कधीतरी गावाकडचा माणुस आला तरी माहेरच्या माणसाकडून निरोप येत असे. बाजारात कुणी भेटलं तर खुशालीचा निरोप. कोणत्या दिशेला आभाळ उठलं? तिथपासुन हवामानाचा अंदाज अगदी मामाचं गाव, उन्हाळी सुट्या, खेळणे, बागडणे या साऱ्या रूढी परंपराच्या गोष्टी वर्तमान सामाजिक व्यवस्थेत बंद झाल्या. पुरातन काळात श्रीकृष्ण मैदानी खेळ खेळताना कबड्डी, हुतुतु, सुरपाट्या कलियुगात देखील कालांतराने सुरू होत्या. मग कुस्ती खेळ असतील, व्यायाम अगदी नदी, नाले, विहीरीत पोहणं या सर्व गोष्टी लुप्त पावल्या. जुनं ते सोनं कालपरत्वे पुन्हा परत येईल तो भाग वेगळा. पण जुना जमाना गेला आणि मोबाईल ठोकड्याचा व्हॉटसअप जमाना आला असं म्हणायला हरकत नाही. पुर्वी लोकांच्या भेटी व्हाव्यात म्हणुन घराबाहेर पडायचं, राम राम, चहा पाणी आवक जावक, संवाद या साऱ्या गोष्टी असायच्या. त्यालाही तिलांजली मिळाली असुन व्हॉटसअप गुड मॉर्निंग चित्रातुन पाठवलेला चहाचा कप दोन हात जोडलेले नमस्कार ही संस्कृती पुढे आली. एवढेच नव्हे तर लोकांच्या मनामनात रूजली असुन प्रत्येकजण ठोकड्याच्या मोहात पडून आपलं आयुष्य जणु काही ठोकडाच असं समजत जीवन जगताना दिसु लागला.



अत्याधुनिक तंत्रज्ञानाची प्रगती वाईट आहे असं मत आमचं मुळीच नाही. त्याहुन अधिक मोबाईल देखील वाईट असं मत आमचं मुळीच नाही. पण या साधनाच्या आहारी पडून जो तरूणाईचा विशेषतः अविवेक हरवत जात आहे. ज्याचं व्यसन लागल्यासारखं साधनाच्या हेडीक लोक बनु लागले ज्यामुळे माणसाची माणुसकी जिवंतपणाची रहात नसुन जीव असलेली माणसं मृतात्म्यासारखी वागु लागली. असो. अनेक धोके असु शकतात. काही चांगल्याही गोष्टी असु शकतात पण सर्वात धोक्याची गोष्ट म्हणजे या ठोकड्यापासुन पोटच्या लेकराला काही दिवस मुक्त करण्याची वेळ आली.करोनासारख्या संकटात ऑनलाईन शिक्षणाची गरज पडली म्हणून प्रक्रिया पुढे आली. त्यातुन ठोकड्यावरचा अभ्यास पहाटे सुरू झाला. तो आजही तसाच आहे. त्या चक्रव्युहात लेकरं आडकुन पडली. गंमत बघा, अभ्यासासाठी पहाटे लेकराला उठवायचं आई-वडिलांचं काम असतं. पुर्वी अशाच पद्धतीने अभ्यास घरच्या शाळेत घेतले जाई. पण आता पहाटे उठून लेकरू हातात मोबाईलचं ठोकडं घेवुन बसलं की आई-वडिलांना वाटतं मोबाईलवर अभ्यास लेकरू करतंय. हा गैरसमज जन्मदात्याच्या भविष्यासाठी देखील धोक्याचा असुन लेकरांच्या भविष्यासाठी चांगला नाही. पहाटे पुस्तक स्मरण करून वाचणं किंवा लिखाण करणं या गोष्टी पुनर्जिवीत व्हायला हव्या. किमान पहाटे पाच ते शाळेतुन लेकरं परत येईपर्यंत नाही म्हटलं तरी इयत्ता 7वी पर्यंतच्या मुलांच्या हातात मोबाईल देता कामा नये. अंधारात मोबाईलचा उजेड धोक्याचा मानसिक ताण वाढले, डोळ्यावर परिणाम होवु लागले. सहज उदाहरण म्हणून बघा एखादा मुलगा कानात हेडफोन ऐकून अभ्यास करत असेल (असं समजु.) पण तो त्या नादात एवढा असतो घरात चोरी झालेली देखील लेकराला कळत नाही. पहाटे उठून मैदानावर कुणी जाईना. कदाचित लेकरं गेले तर मोबाईलचे गाणे लावत बसतात. सुर्यनमस्कार, बैठका या गोष्टी बाजुला राहिल्या. आईनं जेवणाचं ताट समोर आणलं तरी अर्धा अर्धा तास मोबाईलमधील डोकं बाजुला निघत नाही. हा खरा समाज व्यवस्थेला उद्याच्या फार मोठा धोका म्हणावा लागेल. अतिवापरामुळे काय परिणाम भोगावे लागतात? हे प्रत्येक घराघरात आई-वडिलांना माहितीय. जास्त खोल जाण्यापेक्षा पालकांनीच आता आपल्या जन्मदात्या मुलांच्या शाळा घरामध्ये चालु करण्याची गरज वाटते. पहाटे उठावं, संध्या, स्नान व्यायाम, पुजा, विधी, वाचन, लिखाण या गोष्टी मुलांकडून करून घेण्याची गरज निश्चित आहे.शाळेतलं शिक्षण शाळेत होईल पण जर पालक सावध झाले तरच आपले लेकरं आणि भविष्य सुरक्षित राहिल हे मात्र नक्की. किमान पहाटपासून तरी लेकरांच्या हाती मोबाईल न देता त्याच्याकडून उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञानार्जन घडवून आणणे महत्वाचे वाटते. ठोकड्याच्या नादात अनेक कुटुंबात मातृ देवता देखील लेकरांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. टिव्हीच्या मालिका आणि मोबाईलवर व्हॉटस अप चॅटींग या प्रेमात माता भगिनी पडल्यामुळे ज्या पद्धतीने लेकराकडं लक्ष द्यायला हवं तिथं लक्ष जाईनाच. मुलगा जर शाळातुन आला तर पुर्वी आज गुरूजींनं काय शिकवलं? एवढं आई विचारायची. आजच्या परिस्थितीत टिव्हीच्या मालिका आणि हातातलं ठोकडं हे सोडून आईला देखील लेकरू शाळेतुन कधी आलं? त्याने स्वच्छता केली का नाही? जेवणं केलं का नाही? शाळेत काय ज्ञानार्जन केलं? हे विचारायला वेळच मिळत नाही. या चक्रव्युहात केवळ मुलं मुलीच आडकल्या असं नव्हे तर दस्तुरखुद्द आई-वडिल देखील आडकले असुन ज्याचे अत्यंत धोके समाज व्यवस्थेला होवु लागले. खरं म्हणजे सरकारने आता कायद्यानेच मोबाईल वापरावं योग्य वयानुसार बंदी आणण्याची गरज वाटते. पण काही गोष्टी जेव्हा माता-पित्यांच्या हातात असतात तेव्हा कायद्याची वाट न पहाता आपणच आपल्या घरामध्ये सावध रहाताना लेकरांना मोबाईल कचाट्यातुन मुक्त करणे काळाची गरज वाटते. ऑनलाईन जमान्यात सारंच ऑनलाईन घडत असेल तर मग लाईन जुळेल पण आयुष्य टिकणारं कधीच नसेल हे त्रिवादी सत्य म्हणुन पालकांनो, सावध व्हा, आत्मपरीक्षण करा आणि पहाटची शाळा घरी चालु करताना त्या ठोकड्यापासुन लेकराला बाजुला करत दिवा बत्तीसमोर ज्ञान प्राप्ती करून द्या आणि ज्यांनी हे सारं हाती घेतलं त्या माय-बापाच्या संसार जीवनाचं सार्थक निश्चित होईल यात शंका नाही.

# रस्ता ...



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८

आधुनिक केसरी

**कोरोनाचा प्रादूर्भाव पुन्हा सर्वत्र वाढू लागताच शासनाने अजून लॉकडाऊन लावला अन् त्या तालुक्याच्या शहरामध्ये पॉजिटिव्ह रुग्ण सापडू लागताच शहरातल्या सधन वसाहतीतील महिलांनी 'इतर कोणाचाही कसलाही संपर्क नको' म्हणून धुणी-भांडी करणाऱ्या सर्व महिलांना कामावरून बंद केलं. विधवा कावेरीचीही धुण्या-भांड्यांची सहा घरची कामं बंद झाली. त्या दिवसापासून तिला आडरानात वाट हरवलेल्या वाटसरूसारखंच झालं. या अचानक बसलेल्या धक्क्यानं ती तर हादरूनच गेली अन् तिला वेड लागायची पाळी आली. तिची अन्नावरची वासनाच उडून गेली.**

ती दोन-दोन तास विचार करीत बसू लागली. कुणी बोललं तरच ती तेवढयापुरतं बोलत असे अन् पुन्हा घुम्म होत असे. पर्यायानं तिची गल्लीतल्या शेजारणी सोबतची उठबसही मग बंद झाली. असं झालं कसं अन् आता या संकटातून कशी वाट काढावी हीच, काळजी तिला कुरतडू लागली. घरातली ज्वारी, दाळ-दाणा, तेल-मीठ संपत आल्यानं असल्या महागाईच्या काळात स्वतःसहित दोन पोरी कशा जगवायच्या, याचाच घोर तिच्या जीवाला लागून राहिला... आताही कावेरी अशीच विचार करीत बसली होती. मोठी सुनिता गॅसवर स्वैपाक करीत होती अन् धाकटी वनिता धुणं धूत होती. एवढयात मोबाईल वाजू लागताच कावेरी म्हणाली, " बघा गं ... " सुनितानं उठून मोबाईल घेताच कावेरी पुन्हा बसून राहिली. जराशानं सुनिता म्हणाली, आये, कधी घेणारेस गं तसला मोबाईल ? काळे सरांचा फोन आला होता आत्ता.. ते विचारीत होते- घेतला का मोबाईल म्हणून ? दहावीचे ऑनलाईन क्लास पाच तारखेला सुरु झालेत म्हणं .. " लेकीनं असं म्हणताच कावेरीनं नुसते डोळे उघडले अन् तिच्याकडं पाहिलं, पण ती काही बोलली नाही. पुन्हा सुनितानंच विचारलं, " सांग ना ? माझं दहावीचं वर्षय अन् शिक्षण बुडायलंय ... तिला रडकुंडीला आलेलं बघून कावेरीला कसंसंच झालं. तिनं एक सुस्कारा टाकला अन् म्हणाली, " करावं लागंन कायतरी .. " " अगं पण कधी ? आता भर्ती तीन म्हैणे झालं, निस्ता घ्यायचा, घ्यायचा म्हंतेस फकस, पण घेत काही नाहीस तू " कावेरीला लेकीचे पाणावले डोळे बघून एकदम भडभडून आल्यासारखंच झालं. ती म्हणाली, " एक तारखेला कामाचे पैशे भेटल्यावर बघूत .. " " कर काय करायचंय ती, सरांचा कितीदा फोन आलाय ती तर बघितलंस ना ? " सुनिता म्हणाली. " एक तारीख झाल्यावर घेता यीन की मॅडमच्या हातानं .. " कावेरी म्हणाली. " ह्या एक तारखीला नक्की घ्यायचा बघ .. " सुनिता निर्वाणीचं म्हणाली अन् कामाला लागली. कावेरी मग स्वतःच्या मनाशी काहीतरी ठरवून उठली अन् शिंदे मॅडमकडं निघाली ... शिंदे मॅडम कावेरीच्या गल्लीतच राहत. तशा त्या तालुक्यातल्याच एका खेडयाच्या होत्या अन् गावातच एका खाजगी शाळेत त्या सहशिक्षिका होत्या. त्यांचे यजमान मात्र आधुनिक पद्धतीनं शेती करीत. ह्यामुळं त्यांच्या घरी तशी आर्थिक सुबत्ता होती. पण मॅडमना श्रीमंतीचा अजिबात गर्व नव्हता. मुळात त्यांचा स्वभावच प्रेमळ असल्यामुळं त्या इतरांच्या मदतीला नेहमी धावून येत. आता कावेरीचं धुणी-भांडी करण्याचं काम बंद झाल्यामुळं ती घुम्यासारखी बसू लागल्यावर मॅडमनी कावेरीला 'काकू, या संकटातूनही रस्ता निघंन वं' म्हणून समजून सांगितलं होतं... म्हणून तर साऱ्या गल्लीत मॅडमना मान होता अन् गेल्या पाच-सहा वर्षांपासून त्यांच्या घरची धुणी-भांडी कावेरी करीत असल्यामुळं दोघींचाही चांगलाच लोभ होता. कावेरीला काही अडचण आली की, ती त्यांच्याकडं नेहमी येत असे अन् त्यांचा सल्ला घेत असे. तशीच आताही ती मॅडमच्या घरी जाऊन मोबाईलची सारी चौकशी करुन आली...

.. त्यानंतर एके दिवशी सकाळी भाजी करताना कांदे संपल्याचं ध्यानात येताच कावेरी मॅडमच्या घरून किलोभर कांदे विकत घेऊन आली अन् स्वैपाकाला लागली की, जराश्यानं स्वतः मॅडमच तिच्या घरी आल्या. त्यांना बघून कावेरी तर गोंधळूनच गेली अन् तिनं विचारलं, " का वं, मॅडम, तुमी सोता आलाव..हाक मारली असती तर नसते का म्याच आले " काकू, एक आयडिया मनात आली म्हणून आले बघा .. " मॅडम हसतच म्हणाल्या. " काय वं ? .. काकू, कांदे का विकीत नाहीत तुम्ही आमचे ?.. खोलीभरून कांदे हाईत घरात " मॅडमनी प्रश्न केला. " मपल्या ध्यानात न्हाई आलं .. " कावेरी बुचकाळत म्हणाली. आवं काकू, सकाळच्या वेळाला मेनरोडला दोन=तीन घंटे विकायचे म्हणते कांदे मी .. " तेव काय धंदा आपल्यासारख्याला जमणारंय वं, मॅडम ? " नाही जमाय काय झालं, काकू ? रोडला माळणीपशी दुकान टाकून बसायचं अन् आलं गिऱ्हाईक की विक्री करायची .. " मॅडम म्हणाल्या.

" म्या आशी अनपढ बाई आन् मपल्याला हिशेबाचं काय जमणारंय वं ? अजूक तेला माप-काटाबी लागंन की .. काकू, हिशेबाला पोरी हाईत ना ! अन् काटाबी देते ना मी आमचा , मंग तर झालं ना ? फक्त आता तुम्ही तयारी दाखवा..काकू, तुम्ही आधी करुन तर बघा..दोन-चार घंटयात तुम्हाला शंभर-पनास मिळाले तरीबी बास झाले की..."
यावर कावेरी गप्पच झाली. मग मॅडमनी कावेरीला सारं काही नीट समजून सांगितलं. सुनिता नि वनितानंही तयारी दाखवली. जराशानं कावेरी मॅडमकडून कांदे घेऊन रोडला विकायला तयार झाली... मॅडमनी मग कावेरी अन् वनिताला स्वतःच्या घरी नेलं अन् त्यांना वजन कसं करायचं, ते सारं नीट समजून सांगितलं. मग त्यांना पन्नास किलो कांदा मोजून दिला अन् सोबत वजन-काटाही दिला. सात रुपये किलोनं कांदे देत असल्याचं सांगून दहा रुपये किलोच्या भावानं कांदा विकायचंही मॅडमनी सांगितलं. मग कावेरी नि वनिता कांद्याचे दोन टोपले अन् वजन काटा घेऊन मोठया उत्साहात घरी आल्या.. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच त्या



तिघी मायलेकींनी मिळून मेनरोडला कांद्याचं दुकान लावलं अन् सात वाजता कोरोनासाठी लावलेल्या संचारबंदीची तीन तासांची ढिल सुरु होताच मास्क लावलेले बाया-माणसं खरेदीसाठी रोडला येऊ लागले. अवघ्या पाच मिनिटातच रस्त्यावर वाहनांची अन् माणसांची ही ऽ ऽ गर्दी झाली.' कांदे दाहा रुपये ऽ कांदे दाहा रुपये किलो' म्हणीत वनिता ओरडू लागली. तिचं बघून आधी लाजणारी कावेरीही ओरडू लागली. पांढरेशुभ्र नि वाळलेले कांदे असल्यामुळं लोक येऊ लागले अन् कांदे घेऊ लागले. नंतर तर गिऱ्हाईकाची कांद्यासाठी उडीच पडली. मग तिघीही कामाला लागल्या अन् दहाच्या आधीच सारे कांदे संपले. खुषीतच तिघी रिकामे टोपले घेऊन घरी आल्या. सुनितानं पाकीटातले पैसे जमिनीवर टाकले अन् मोजले. पाचशे दहा रुपये झाले होते. त्या आनंदातच दोघी मायलेकी मॅडमच्या घरी आल्या.. काकू, एवढया लौकर विकले पन्नास किलो कांदे ?" त्यांना बघताच मॅडमनी विचारलं.

आवं मॅडम, आजूक न्याया फायजी व्हते बगा कांदे .. " कावेरी उल्हासानं म्हणाली अन् तिनं पैशे मॅडमपुढं ठेवले. मॅडमनी पैसे मोजले अन् त्यातले दिडशे रुपये कावेरीला देत म्हणाल्या, काकू, धरा तुमचे दीडशे रुपये ..पहिल्या दिवसाची भवानी तर चांगली झाली बघा " व्हय की वं, मॅडम, तुमी रस्ता दावला म्हणून जमलं बघा " कावेरी म्हणाली. " काकू, ज्याची कष्ट करायची तयारी असतीय त्याला कामधंदा मिळतंयच वं .. फकस लाज नाही धरली पाह्यजी .. "
कावेरीनं मान हलवली अन् जराशानं दोघी मायलेकी घरी परतल्या. .. त्यानंतर शे=दीडशेचा रोजचा रोजगार पडू लागल्यावर एके दिवशी मॅडम म्हणाल्या,

" काकू, आता हळूहळू दुकान वाढवायचं बघा

'म्हंजी ?' कावेरीनं विचारलं.

" आवं, आमचे घरातले कांदे संपल्यावर पुन्हा काय करायचं ?.. म्हणून बाकीच्या भाज्याबी आणायच्या बीटाहून ... आलू, वांगे, टमाटे असल्या अन् विकायच्या रोडला ... " मॅडमचं बोलणं ऐकून कावेरी खुशच झाली अन् तिनं होकारार्थी मान हलवली अन् तिनं बीटाहून भाज्या घ्यायला सुरुवात केली. तिघी मायलेकींना सकाळी दहापर्यंत हा उद्योगच लागला अन् रोज त्या तिघी मायलेकी मिळून संचारबंदीच्या तीन तासांच्या ढिलमधे मेनरोडला भाजीपाल्याचं दुकान लावू लागल्या. रोज दोन-चारशे रुपये कमाई होऊ लागली अन् कावेरीची सारी चिंता जादू केल्यासारखीच मिटून गेली... त्यानंतर एके दिवशी सकाळची गोष्ट ! कावेरी अन् तिच्या दोन्ही पोरींची सातच्या आत मेनरोडला दुकान लावण्यासाठी धांदल सुरु होती. मोठी सुनिता अन् कावेरी भाज्यांचे टोपले मेनरोडला नेऊन ठेवत होत्या. दुसऱ्या खेपंला आलूची पंचवीस किलोची डाल डोक्यावर घेऊन कावेरी वाडयाबाहेर पडली की, दारात ब्रश करीत उभ्या असलेल्या मॅडमनी 'काकू ऽ ऽ' म्हणून तिला हाक मारली. कावेरी जाग्यावरच उभी राहिली अन् म्हणाली, " काय वं मॅडम ? " " काय नाही .. सज हाक मारली होती .. " मॅडम खुषीतच म्हणाल्या.

" मंगशिणी येते वं दुपारी निवांत, मॅडम, आज मोबाईलबी घ्यायचाय तुमच्या हातानं .. आता लई गरबड हाये गि-हाईकाची .." कावेरी उत्साहात म्हणाली अन् झटकन मान वळवून ती रस्त्याला लागली. " बरं .. बरंय .. " तिच्याकडं कौतुकानं हसतच मॅडम म्हणाल्या अन् रस्त्यानं झपझप जाणाऱ्या त्या दोघी मायलेकींकडं अभिमानानं बघू लागल्या...



## वाचन प्रेरणा दिन

आई, मी ज्ञानपोई होईन
मुला-मुलींना गोष्टी सांगेन,
त्यांच्यासाठी कविता गाऊन
नव्या-नव्या कथा या वाचीन.

आई, मी ज्ञानपोई होईन
गणिताची कोडे सोडविण,
इतिहास हे सोपे करून
भूगोलात चंद्रतारे दाखविण.

आई, मी ज्ञानपोई होईन
सगळ्यांची परीक्षा घेईन,
त्यांची बुद्धीमत्ता तपासून
योग्य मूल्यमापन करीन.

आई, मी ज्ञानपोई होईन
साऱ्या जगाची माहीती देईन,
सगळे होतील बुध्दीमान
ज्ञानाची तहाण भागविण,

आई, मी ज्ञानपोई होईन
बाळांसाठी अंगाई गाईन,
मोठ्यासाठी पुस्तक होऊन
वाचन प्रेरणा दिन होईन...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## स्वप्नांची रांगोळी

विस्कटली देवा सारी
गोड स्वप्नांची रांगोळी
सप्तरंगी स्वंप्ने सारी
स्वप्नांमध्येच विरली

उभ्या आयुष्याची होता
भग्न वैराण रे माती
लागे काटे वेडगळ
रुक्ष बाभळीच्या देठी

जीवनाच्या संग्रामात
हार वाट्याला रे आली
शोध घेतांना फुलांचा
काटे चोरून बोचली

सारे उन्हाळेच का रे
देवा लिहिले तू भाळी
दुःख एकच जीवनी
नाही भेटली सावली

आता सरली चाळीशी
आस उरी जगण्याची
संसाराच्या मायेमध्ये
घालमेल रे जीवाची
@ ज्ञानेश्वर गायके कन्नड

## चेहरा



माणसाचा चेहरा पाहता
नाही इथे कसला भरवसा,
त्याला पाहताना
हसतो पहा आरसा.
फसतात सारे इथे
रंग पाहून माणसाचे,
ना खरे ना खोटे
कळे अंतरंग चेहऱ्याचे.
जीवनाचा आज इथे
खरा तमाशा झाला,
पण राजू तुला माणसातला
माणूस नाही कळला
राजेंद्रकुमार शेळके
नारायणगाव, पुणे

## जोडी माय -बापाची

बाप मायेचा पाझर,
त्याच्या काळजात माया...
वटवृक्षाहून गारं,
त्याची कुटुंबाला छाया...१

बाप राबतो कष्टतो,
घाम गाळतो रानातं...
देतो लेकरा गारवां,
स्वतः तळतो उन्हातं...२

बाप बघतो सपानं,
लेकराला शिकवाया...
चंदनाच्या परि झिजें,
त्याची कष्टाळली कायां...३

जरी दिसतो कठोरं,
आतं मऊ लोण्यां वाणी...
लेक जाता सासराला,
त्याच्या डोळ्यामंधी पाणीं...४

नाही ज्याच्या घरी बापं,
त्याचं सुनं घरं-दारं...
उघड्यात्या संसाराचा,
मायं वाहतसें भारं...५

माय दाबते हुंदका,
कधी उभी आडोशाला...
बापं मोलाचं सौभाग्य,
तिच्या उभ्या संसाराला...६

रूपं मायीचं साजरं,
कुंकवाने हो खुलतं...
बाप नावाचं माणूसं,
ऊन वाऱ्याला झेलतं...७

ज्याच्या त्याच्या घरी नांदो,
माय बापाची ही जोडी...
माय -बापाच्या बिगर,
नाही संसाराला गोडी...८
नाही संसाराला गोडी...

सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे
परभणी ९८२३०६६६०६

## कर्म

चांगले करा कर्म
आहे आपला धर्म
करत रहा सतकर्म
सोडून द्या अधर्म
मागे पुढे बोलून
यांचे त्यांचे कांन
काही खोट सांगून
वाइट असे वागून
नका मागु अश्रु
कर्म तुझे फिरूनी
येती परत तुझपाशी
जसे असे मग भोगावी
तुझ लागती
तोडूंनी सर्वांची माया
मनात तुझ्या काया
मग काय पडसी पाया
देवाच्या करें गया वया
@ कु. कविता आधार चव्हाण,
म्हसावद जि. जळगाव

## आपट्याचं पान...

माझा गेला जीव
तुझं झालं सोनं
माणसाला म्हणाली
आपट्याची पानं
मागच्याही वर्षी
त्यांनीच लुटले
परत ओरबडायला
पुन्हा पानं फुटले
आज माझ्यात देव
उद्या मी पाचोळा
झाडू खराट्याने
करतात गोळा
दुःख माझं पाहून
थोडा तरी जाग
मी सुद्धा आहे ना
पर्यावरणाचा भाग
बलराज संघई

## आणि कळीचे फूल झाले

....आणि कळत नकळत
चाहुलीची जाणिव ती झाली.
रंगबिरंगी स्वप्नात न्हाऊनिया
चिंब चिंब ओलावली..१..

ओंजळीतल्या कळ्यानी
अलगद ओंजळीत झुलावे,
मौक्तीकतेतल्या मोत्यापरी
भविष्यात मग नाजूकशा
फुलापरी फुलावे..२..

कुठल्याशा अनोळखी वळणावरच
एक अनोख नातं, हृदयातल्या
हृदयातही खोल अगदी खोलवर
गुंतत ते जात..३..

घटिकांच्या कालचक्रात क्षण,
पळे घटिका अलगद निसटतात.
मनाच्या निर्वात पोकळीच्या
खोल गाभाऱ्यात हरवतात..४..

सरतेशेवटी वेळ येते नि
नवा अनुभव देवून जाते.
अन् ओलेती सर चिंब चिंब
सुखाचे गीत नवे गाते..५..

वेदनेचा शिनवटा त्या नाजुक
स्पर्शात विरून जातो.
एक नविन आकार आकाराला येतो..६..

नाजुक कळीचे मग हळूवार
सुंदर फूल होऊन जाते.
हस्तकमलात जेव्हा विसावते,
मन मग तेव्हा आनंदाचे परमोच्च
शिखर गाठते..७..
वैशाली महाडिक
मो. 9767437923



## मानाचे मानकरी

खरे मानाचे मानकरी कुठे गेले..?
पैसे देणारे, घेणारे आजकाल मोठे झाले
सत्याला आजकाल कोण विचारते..?
असत्याचा जेथे, तेथे उदो, उदो दिसते
मानाचे मानकरी मागच्या रांगेत
खोटे बोलणारे मोठ्यांच्या संगतीत
फसवून, गोड बोलून नंबर लावती
हे सर्व बघून थकून गेली माता धरती
मान गेला, सन्मान गेला कोसदूर
जेथे, तेथे भरला प्रसिद्धीचा पूर
पोटात काळेपणा बोल अमृतासारखे
जगून दाखवती खोटे बोलून माणसासारखे
बळीराजाचा मान सन्मान कुठे गेला...?
सारा जग त्याला विसरून गेला
मानाच्या मानकऱ्यांनी जवळून बघितले
या नासल्या राजकरणाला पाहून हसू लागले
मानाचे मानकरी समाजासाठीच जगले
माणुसकी ठेवून आपले योगदान दिले
त्यांना नसते कशाचीही आशा, अपेक्षा
कोणी म्हणतात मोठा होईन त्यांच्यापेक्षा
खऱ्या मानकऱ्यांना जवळून ओळखावे
त्यांचेच खरे योगदान जाणून त्यांचा योग्य
तो सन्मान करावे
सौ.संगीता संतोष ठलाल
७८२१८१६४८५

## बाबा माझा

वाणी ती रसाळ | स्वर तो मधाळ|
कीर्तन वेल्हाळ |बाबा माझा||
व्यासंग प्रचंड| दाखले उदंड|
निरूपणी दंग |बाबा माझा||
माऊलीचा दास |ज्ञानेश्वरी ध्यास|
लागली ती आस |पंढरीची||
मराठी देशात |झाला पूर्वरंग|
आता उत्तररंग |वैकुंठात ||

-- प्रसाद दत्त पाठक



## शेतकरी बाप

दिवस रात्र राबतो
करतो कष्ट हा अमाप
तरीही कर्जात बुडलाय
कारण सरकारच हे पाप
दुष्काळ, गारपिट मुळे
शेतकरी रचतोय स्वतःच सरण
पण खिसा व्यापाऱ्यांचा मात्र
राहतो नेहमीच गरम
करतोय कष्ट अमाप
कधी नं दमला, थकला
स्वतःच मालक स्वतःचा
नाही कुणापुढे वाकला
दिली जर त्याला कधी
त्या निसर्गाने साथ
काळ्या मातीतून पीकवीन
तो सोन्याचा घास
कवी : किरण थोरात,
वाळकी, दौंड, जिल्हा पुणे

## माझे ऐक जरा...

नव्हती पाटी तरी
गेलो शाळेला
सांगणारे नव्हते तरी
बसलो अभ्यासाला
कण कण वेचून
मिळविले ज्ञान
दिला मार गुरुजींनी
केला सहन.....

बापा माझे ऐक जरा
वाढविन मान रं..
वाट अवघड आहे जरी
घेईल कष्ट रं.. !! धृ !!

पायी पायी चालत
वाट चाललो
ऊन वार्या पावसात
नाही हटलो
चटणी भाकरी खावून
गेलो शाळेला
शपथ घेतो बाबा
आज मनाला.....

रात्र रात्र जागून
वाचले पुस्तक
काठोकाठ भरले माझे
तेव्हा मस्तक
बघा आज सोनियाचा
दिन आला
नंबर माझा पहिला
शाळेत आला....
@ आनंदा वारंगणे सर
मोलखेडा ता सोयगाव.

## मी दारावरून जेव्हा तुझ्या

मनातलं कागदावर -

मराठी कविता संग्रह
मी दारावरून जेव्हा तुझ्या
स्वतःला परजत
गर्जत गडगडत भरून आलो
तू तेव्हा किनाऱ्याला
अनोळखत हसत हसत
ओहटत होतीस
मी दारावरून जेव्हा
तुझ्या पाऊस थोपवत
ढगांसारखा भटकून
गेलो तू तेव्हा मेहंदीभरल्या
हातावर चंद्र वाळवत
होतीस मी दारावरून
जेव्हा तुझ्या आवढ्यात
उद्रेक गिळून दूरच्या
हाकेसारखा खोल कुठे
विरून गेलो तू तेव्हा
पैंजणाच्या रुणझुण तालात
जिना चढत होतीस
कवी : नागराज मंजुळे

## पाखरं..

आसवांनी खुशीत
भिजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत
निजली पाखरं..

ना ऊन, ना वारा,
ना पावसाची भिती,
बघताच तुला फुलली
५६ इंच छाती

पुस्तकं घेऊन उशीत
निजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत
निजली पाखरं..

तेजापुढे तुझ्या चंद्र
तारे फिके पडावे
जीवनात एकदा बा
तुझे दर्शन घडावे
आनंदाचे अश्रू पुशीत
निजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत
निजली पाखरं..

निळ्या भगव्यांनी
फुलले दिक्षाभुमी शहर,
नागनगरीला आला
नागवंशी यांचा बहर,

बघं कशी तुझ्या एसीत
निजली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत
निजली पाखरं..

जाता जाता फक्त विचार
घेऊन जाईल,
अडाणी असलो तरी
तुला लेकरात पाहिल,

परिवर्तन वादळात ना
विझली पाखरं..
बाबा तुझ्या कुशीत
निजली पाखरं.

## शेतामधी

शेतामधी माझी खोप तिला
बोराटीची झाप तिथं राबतो,
कष्टतो माझा शेतकरी बाप
तो अंगावर चिंध्या खातो
मिरची भाकर काढी उसाची
पाचट
जगा मिळाया साखर
काटा त्याच्याच का पायी त्यानं
काय केलं पाप ?
माझा बाप शेतकरी उभ्या
जगाचा पोशिंदा त्याच्या भाळी
लिहिलेला रातदिस कामधंदा
कष्ट सारे त्याच्या हाती
दुसऱ्याच्या हाती माप
बाप फोडतो लाकडं माय
पेटविते चुल्हा पिठामागल्या
घामाची काय चव सांगू तुला
आम्ही कष्टाचंच खातो जग
करी हापाहाप !
- इंद्रजीत भालेराव

## अ आ आई

अ आ आई,
म म मका मी तुझा
मामा दे मला मुका
प प पतंग आभाळात उडे ढ ढ
ढगांत चांदोमामा दडे
घ घ घड्याळ,
थ थ थवा
बाळ जरि खट्याळ,
तरि मला हवा
ह ह हम्मा गोड
दूध देते
च च चिऊ अंगणात येते
भ भ भटजी, स स ससा
मांडिवर बसा नि खुदकन हसा
क क कमळ पाण्यावर डुले
ब ब बदक तुरुतुरु चाले ग ग
गाडी झुक झुक जाई बाळ माझे
कसे गोड गाणे गाई
मधुसूदन कालेलकर

## लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**संप्रेरके :** आयुष्यावर मोठा परिणाम करणाऱ्या हार्मोन्सची (संप्रेरके) माहिती आपण घेत आहोत. यापूर्वीच्या भागात तीन हार्मोन्सची माहिती आपण घेतली. आजच्या भागात वाचा इतर हार्मोन्सचे कार्य...

४. गोनॅडोट्रॉपिन्स- ल्युटिनायझिंग हार्मोन (एल एच) व एफ एस एच याला गोनॅडोट्रॉपिन्स म्हणतात. स्त्री आणि पुरुषांमध्ये टेस्टीज व ओव्हरीजला उद्दीपित करण्याचे काम गोनॅडोट्रॉपिन्स करतात. तसेच हे पिट्युटरी ग्रंथी (अँटिरिअर) तयार करते. आता हे जे एल. एच. (ल्युटिनायझिंग हार्मोन) आहेत ते स्त्री आणि पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन आणि इस्ट्रोजन तयार करतात. बीजांड फुटताना एल. एच. वाढतं याला प्रीओव्ह्युलेटरी एल. एच. सर्ज असं म्हणतात. प्रोजेस्टेरॉन, इस्ट्रॅडीऑल हे ल्युटिनायझेशन ऑफ ओव्हरियन फॉलिकल (LHRH) हे हायपोथॅलामस (मेंदूचा भाग) मध्ये तयार होते.




५. इस्ट्रोजन- मासिक पाळीचे नियमन, स्त्रीचे लैंगिक अवयव, गर्भाशयाची म्युकोसल वाढ करणे हे कार्य करते. पाळी बंद झाल्यानंतर (मेनोपॉज) इस्ट्रोजन अतिशय कमी होते व पाळी बंद होते. योनीअंग कोरडे होणे, वेदना होणे, झोप आणि मूड यावर याचा परिणाम होतो.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

६. DHEA ( एक्झायटेशन हार्मोन)- यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेली अॅण्ड्रोजन स्त्रियांमध्ये उत्तेजना, भावना तयार करण्याचे महत्त्वाचे काम करतात.

७. टेस्टोस्टेरोन- लैंगिक इच्छा तयार करणे, डोपॅमीन, इपीनेफरीन व - वासोप्रेसीन तयार करणे, सिरोटोनीन, ओपीऑईड व प्रोलॅक्टीनची मात्रा कमी करणे. ही कामं हे हार्मोन करते.

८. हायपोगोनॅडिझम- ३०० नॅनोग्रॅम प्रति डेसीने वाढलेल्या मात्रा यामुळे - स्त्रियांमध्ये अनियमित पाळी, शरीरावर केस येणे , आवाजात बदल होणे, PCOD अशा समस्या उद्‌भवतात.

९. वासोप्रेसीन- कामभावना तयार करणे, त्यावर लक्ष केंद्रित करणे हे यामुळे घडते. हृदय हा सुद्धा एक छोटा मेंदूच आहे.

१०. PEA (फिनाईलइथनालामाईन)- प्रेमात पडलं की मेंदू काम करत नाही असं म्हणतात. यात हार्मोन्सचा काही रोल आहे का ? तर होय. प्रेमात पडलेले ते जवळ आल्यानंतर तळहाताला घाम येणे, श्वास वाढणे, वैचारिक शक्ती बदलणे, पोटात गुदगुल्या होणे अशा क्रिया घडू लागतात. फक्त प्रेयसीच्या नजरेला नजर दिली किंवा हाताचा स्पर्श झाला किंवा उत्साहवर्धक संगीत, पुस्तक वाचलं तरीही या भावना तयार होतात. PEA हे एक नैसर्गिक केमिकल असून, ते लव्ह-मॉलिक्युल्स तयार करते आणि हे सगळं न्यूरो ट्रान्समीटर्सच्या माध्यमातून नॉरश्पीनेफरीन, इपी नेफरीन, सिरोटोनीन, PEA, डोपॅमीन आणि विटामीन B6 मुळे हे तयार होते. PEAR 900- डोपॅमीन आणि नॉर इपीनेफरीन हे उत्तेजना व इच्छा तयार करते.


# सिगारेटचे झुरके घेत हवेत धुराची वलये सोडणारा तो मुलगा...

आधुनिक केसरी

माणसाचे नशीब कधी फळफळेल हे कोणालाच ठाऊक नसते. जगात असे कितीतरी लोक आहेत की ते रात्रंदिवस कठोर परिश्रम करतात पण नशीब काही त्यांना साथ देत नाही. परंतु नेमके याच्याविरुद्ध असेही अनेक लोक आहेत ज्यांना घरबसल्या नशीब अशी नामी संधी देते आणि त्यांचे भाग्य एका रात्रीत पालटते व त्यांचे हात जणू स्वर्गाला पोहोचतात. लाहोर शहरातील (आता पाकिस्तानात) एका छायाचित्रकाराकडे सहायक म्हणून काम करणाऱ्या एका मुलाच्या बाबतीत असेच काहीसे घडले. हा मुलगा दररोज रात्री आपल्या मित्रांबरोबर पानाच्या टपरीवर जाई आणि पान खात असतानाच सिगारेटचे झुरके घेऊन हवेत धुराची वलये सोडीत असे. असाच एकदा तो पानाच्या टपरीवर बसून सिगारेट पीत विशिष्ट लकबेने हवेत धुराची वलये सोडत होता. नेमके त्याचवेळी एक प्रख्यात लेखक त्या पानाच्या टपरीवर आले. त्यांची नजर त्या मुलावर पडली मात्र आणि काही तुटपुंजी कमाई करणारा तो मुलगा चित्रपटसृष्टीचा एक महत्त्वाचा भाग बनून लाखो रुपये कमवू लागला. त्या मुलाचे नाव प्राण सिकंद ऊर्फ प्राण !ही घटना १९३९ सालातील आहे.



लाहोर शहरातील काही मुले दररोज रात्री पान खाण्यासाठी एका पानाच्या टपरीवर जात असत. हिंदी चित्रपटसृष्टीत खलनायक म्हणून नावारूपाला आलेले आणि नंतरच्या काळात विविध प्रकारच्या भूमिका करणारे अभिनेते प्राण यांचाही त्या पोरसवदा मुलांमधे समावेश होता. ते त्यावेळी एका छायाचित्रकाराचे सहायक म्हणून काम करीत असत. नेहमीच्या शिरस्त्यानुसार प्राण त्या मुलांबरोबर पान खाण्यासाठी टपरीवर गेले. पान खाता खाता हातात सिगारेट घेऊन ते एका कोपऱ्यात उभे राहिले आणि झुरके घेत एका विशिष्ट ढंगात धुराची वलये हवेत सोडू लागले. त्यावेळी टपरीवर आलेल्या एका व्यक्तीचे त्यांच्याकडे लक्ष गेले. निश्चिंतपणे सिगारेट ओढत उभ्या असलेल्या प्राण यांना त्यांनी नाव विचारले पण त्या व्यक्तीकडे लक्ष न देता प्राण सिगारेट ओढण्यातच मग्न होते. त्या व्यक्तीने त्यांना पुन्हा एकदा नाव विचारले तेव्हा प्राण त्यांना म्हणाले, माझे नाव विचारून आपण काय करणार आहात? यावर ते गृहस्थ प्राण यांना म्हणाले, माझे नाव वली मोहम्मद आणि मी प्रख्यात चित्रपट निर्माते दलसुख एम. पंचोली यांचा लेखक आहे. `यमला जट' या त्यांच्या आगामी चित्रपटाची कथा मी लिहितो आहे. या चित्रपटातील एक पात्र अगदी तुझ्यासारखे बोलत बोलत पान खाते. ती व्यक्तिरेखा साकारण्याची तुझी इच्छा आहे का? प्राण यांनी वली मोहम्मद यांचे बोलणे गांभीर्याने न घेता सरळ त्यांना नकार दिला. नकार मिळालेला असतानाही वली मोहम्मद यांनी प्राण यांना दुसऱ्या दिवशी स्टुडिओत येण्याचे निमंत्रण दिले. ते निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी प्राण यांच्या मनात विचार आला की नक्की या माणसाने रात्री जमलेल्या लोकांवर आपली छाप पाडण्याचा प्रयत्न केला असावा. कशाला जाऊ स्टुडिओत? प्राण स्टुडिओत गेलेच नाहीत.



या घटनेनंतर बरेच दिवस लोटले. असेच प्राण एक चित्रपट पाहायला एका चित्रपटगृहात गेले. मध्यंतरात त्यांची वली मोहम्मद यांच्याशी गाठ पडली. प्राणना पाहताच वली यांचा पारा चढला आणि ते रागात आणि तक्रारीच्या सुरात प्राणना म्हणाले, मी पंचोलीसाहेबांबरोबर स्टुडिओत तुझ्या येण्याची प्रतीक्षा करत बसलो पण तू आलाच नाहीस! तू माझ्या नावाला बट्टा लावलास! तू जे वागला आहेस त्याची तुला शरमही वाटत नसेल ना? वली यांचे बोलणे संपताच प्राण त्यांना म्हणाले, की मी स्टुडिओत यायला तयार आहे. यावर वली त्यांना म्हणाले, माझा तुझ्यावर विश्वास नाही. तू मला तुझ्या घराचा पत्ता दे; मी तुला माझ्याबरोबर घेऊनच स्टुडिओत जाईन.

दुसऱ्या दिवशी वली मोहम्मद प्राण यांना घेऊन स्टुडिओत पोहोचले. पंचोली यांनी प्राण यांना करारबद्ध करण्याची इच्छा व्यक्त केली. यावर प्राण त्यांना म्हणाले, की माझ्या कुटुंबातील कोणीही चित्रपटाशी संबंधित नाही. म्हणून मला एकदा घरच्यांशी बोलू द्या. प्राण यांचे म्हणणे ऐकताच पंचोली भडकून म्हणाले, करार करायचा असेल तर आत्ता या क्षणी कर; अन्यथा जाऊ शकतोस! पंचोली यांचा संताप पाहून प्राण यांनी शेजारीच बसलेल्या वली यांना विचारले, मला या भूमिकेसाठी किती पैसे मिळतील? वली म्हणाले, ५० रुपये महिना! प्राण म्हणाले, याच्यापेक्षा छायाचित्रकाराकडे मला जास्त पैसे मिळतात. प्राण यांचे म्हणणे ऐकून पंचोली संतापून त्यांना म्हणाले, मग तू आयुष्यभर दुसऱ्याची चाकरीच करत राहा. आज तू थोड्या पैशासाठी आपल्या नशिबाला लाथ मारत आहेस. आज ५० रुपये मिळत आहेत; उद्या १ हजारही मिळतील! पंचोली यांनी हे जे सांगितले त्याने प्राण यांच्यावर काय जादू केली कोण जाणे पण त्यांनी क्षणार्धात त्या करारावर स्वाक्षरी केली. त्यानंतर प्राण यांनी हजारात काय आयुष्यभर लाखातच प्राप्ती केली !

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# वल्लभभाई पटेल



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**वल्लभभाई पटेल हे भारतातील एक राजकीय व सामाजिक नेते होते.वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकसंघीकरणात मोठे योगदान दिले. त्यांना भारतीय महिलांनी 'सरदार' ही उपाधी दिली. वल्लभभाई पटेल पेशाने वकील होते. वकिली करीत असताना ते महात्मा गांधीच्या प्रभावाखाली आले. गुजरातच्या खेडा, आणंद जिल्ह्यातील बोरसद आणि सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील खेडुतांना संघटित करून त्यांनी इंग्रजी अत्याचाराविरुद्ध सत्याग्रह केला.**

या सत्याग्रहानंतर त्यांची गणना गुजरातच्या प्रभावशाली नेत्यांमध्ये होऊ लागली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे ते एक महत्त्वाचे नेते होते. १९३४ व १९३७ च्या निवडणुकांमध्ये त्यांनी पक्षाचे संघटनही बांधले. भारत छोडो आंदोलनात ते आघाडीवर होते.

वल्लभभाई पटेल हे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान झाले. या रूपात त्यांनी पाकिस्तानातून आलेल्या आणि पंजाब व दिल्ली येथे राहणाऱ्या निर्वासितांच्या मदतीसाठी खूप काम केले. फाळणीनंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांतीस्थापनेकरीताही त्यांनी कार्य केले. सरदारांनी हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे भारतात विलीनीकरण करवून घेणे हे पटेलांचे सर्वात मोठे कार्य होय. मुत्सद्देगिरी व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदारांनी संस्थाने भारतात विलीन केली आणि म्हणूनच ते भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात. सरदार पटेल हे मुक्त व्यापार व खासगी मालकी हक्कांचे समर्थक होते भारताची एकता आणि अखंडता यांसाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचा जन्मदिवस भारत सरकारने राष्ट्रीय एकता दिन म्हणून घोषित केला आहे. राष्ट्र उभारणीत त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.वल्लभभाई झवेरभाई पटेल यांचा जन्म लेवा पटेल समाजामध्ये, त्यांच्या मामांच्या नडियाद (गुजरात) येथील घरी झाला. त्यांची अचूक जन्मतारीख ज्ञात नाही, पण त्यांनी मॅट्रिक परीक्षेच्या वेळी स्वतःची जन्म तारीख ३१ ऑक्टोबर अशी लिहिली होती. पिता झवेरभाई व माता लाडबा यांचे ते चौथे पुत्र होत. झवेरभाई खेडा जिल्ह्याच्या करमसद गावचे रहिवासी होते. सोमाभाई, नरसिंहभाई व विठ्ठलभाई (विठ्ठलभाई - पुढे राजकारणीही झाले) ही त्यांची मोठी भावंडे होती. त्यांना एक काशीभाई नावाचा धाकटा भाऊ व दहीबा नावाची धाकटी बहीण होती. बालपणी वल्लभभाई वडिलांना शेतीत मदत करत असत. ते१८ वर्षाचे झाले असता त्यांचे लग्न जवळच्या गावातील १२/१३ वर्षाच्या झवेरबा यांच्यासोबत झाले. वल्लभभाई मॅट्रिकची परीक्षा तुलनेने उशिरा, म्हणजे वयाच्या २२व्या वर्षी उत्तीर्ण झाले. इतरांकडे पुस्तके मागून, कुटुंबापासून दूर राहून दोन वर्षात वल्लभभाई पटेल वकिलीची परीक्षा पास झाले. त्यानंतर गोध्रा येथे झवेरबांसोबत त्यांनी गृहस्थ जीवनाची सुरुवात केली. तिथल्या बार कौन्सिलमध्येही नाव नोंदवले. झवेरबांपासून त्यांना दोन अपत्ये झाली - १९०४मध्ये मणीबेन आणि १९०६मध्ये डाह्याभाई. गुजरातमध्ये त्या वेळी ब्युबॉनिक प्लेगची साथ पसरली होती. या काळात त्यांनी स्वतःच्या कुटुंबास सुरक्षित स्थानी हलवले. वल्लभभाई गोधरा, बोरसद व आणंद भागात वकिली करत असताना करमसदच्या घराची जबाबदारीही सांभाळत होते. कणखर व्यक्तिमत्व आणि राजनैतिक दूरदर्शीपणा या व्यक्तिविशेषातून एकसंध राष्ट्रनिर्मितीसाठी भरीव योगदान देणारे देशाचे पहिले गृहमंत्री, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची आज पुण्यतिथी आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म 31 ऑक्टोबर 1875 साली झाला. वल्लभभाई पटेल हे पिता झवेरभाई व माता लाडबा यांचे ते चौथे अपत्य. वल्लभभाई पटेल पेशाने वकील होते. वकिली करीत असताना ते महात्मा गांधीच्या प्रभावाखाली आले. गुजरातच्या खेडा,आणंद जिल्ह्यातील बोरसद आणि सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील खेडुतांना संघटित करून त्यांनी इंग्रजी अत्याचाराविरुद्ध सत्याग्रह केला. या सत्याग्रहानंतर त्यांची गणना गुजरातच्या प्रभावशाली नेत्यांमध्ये होऊ लागली. भारत छोडो आंदोलनात ते आघाडीवर होते. वल्लभभाई पटेल हे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान झाले. फाळणीनंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांतीस्थापनेकरताही त्यांनी कार्य केले. मुत्सद्देगिरी व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदारांनी संस्थाने भारतात विलीन केली आणि म्हणूनच ते भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात.



# आंबेडकरी चिंतन या ग्रंथात बाबासाहेबांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाची सखोल चर्चा

आधुनिक केसरी

**आंबेडकरी विचारवंत म्हणून भीमराव सरवदे हे नाव आंबेडकरी समाज व एकूणच पुरोगामी महाराष्ट्राला परिचयाचे आहे. अलीकडेच त्यांचा आंबेडकरी चिंतन हा नूतन ग्रंथ प्रकाशित झाला असून त्यामध्ये त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रातील काही लक्षणीय घटनांवर नव्याने प्रकाश टाकला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक तत्त्वज्ञानाबद्दल गांभीर्याने सखोल चर्चासुद्धा केली आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य व तत्वज्ञानाचा वेध घेताना तदनुषंगाने तत्कालीन काही महनीय व्यक्ती, ज्यांचा बाबासाहेबांचे जीवन व कार्याशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे जो संबंध व संपर्क आला. त्यांचे विचार व कार्य व त्यामुळे बाबासाहेब व त्यांच्या चळवळीवर झालेल्या परिणामाचीसुद्धा समीक्षा केली आहे.**

त्यामध्ये छत्रपती शाहू महाराज, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड, कॉ. श्रीपाद डांगे, साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे इत्यादी मान्यवरांचा विशेष उल्लेख करावा लागेल. आंबेडकरी तत्त्वज्ञान व चळवळीच्या अनुषंगाने भीमराव सरवदे यांनी भारतीय राज्यघटना व लोकशाही, बौद्धधम्म, मार्क्सवाद व कामगार चळवळीबद्दलसुद्धा सविस्तर व स्पष्टपणे आपले विचारत व्यक्त केले आहेत. वेळोवेळी विविध नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या भीमराव सरवदे यांच्या लेखांचा हा संपादित व संकलित स्वरूपाचा ग्रंथ सर्वसामान्य वाचक, विद्यार्थी वर्ग व संशोधकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र व कार्याबद्दल मार्गदर्शक ठरणार आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्राशी संबंधित या ग्रंथातील बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर एक प्रतिभावंत विधीज्ञ पुस्तकासाठी घर बांधणारे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्व बाबासाहेबांचे देदीप्यमान विद्यार्थी जीवन व शैक्षणिक तत्वज्ञान आणि आदर्श राजा सयाजीराव गायकवाड यांच्या बडोद्यात बाबासाहेब ढसढसा रडले ही प्रकरणे आहेत. विद्यार्थी जीवनात बाबासाहेबांनी सोसलेल्या अपार कष्टांचा लेखाजोखाच या प्रकरणांमधून लेखकाने सादर केला आहे. नंतरच्या आयुष्यामध्ये थोर विद्वान म्हणून जे बाबासाहेब संपूर्ण जगाला परिचित झाले, त्याची ती कष्टप्रद अशीच पायाभरणी होती. कुटुंबांच्या स्थलांतरामुळे बाल भिवाला दापोली, सातारा, मुंबई अशी शालेय शिक्षणासाठी स्थलांतरे करावी लागली. त्या विद्यार्थीजीवनात बाल भिवाला आलेल्या अस्पृश्यतेच्या भयंकर अनुभवांचे तपशील जे लेखकाने दिले आहेत ते अर्थातच इथल्या जातीयवादी सनातनी धर्माचे अमानवी रूप उघडे करणारे आहेत. यादरम्यान मुंबईत केळुस्कर गुरुजींनी बाबासाहेबांच्या उच्च शिक्षणाबद्दल दर्शविलेली आत्मीयता त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी दिसून येते. बाबासाहेब मॅट्रिक पास झाल्यावर समाजसेवक बाबासाहेब बोलेंसह केळुस्कर गुरुजींनी विशेष अभिनंदनपर सभेत त्यांचे कौतुक करून उच्च शिक्षणासाठी दिलेली प्रेरणा व त्यासाठी बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांच्याकडून मंजूर करून दिलेली शिष्यवृत्ती बाबासाहेबांचे विद्यार्थी जीवन देदीप्यमान करणारी ठरली. शिष्यवृत्तीच्या कालमर्यादितच इच्छित पदव्या प्राप्त करायच्या असल्यामुळे आणि मिळणारी शिष्यवृत्ती ही तोकडी असल्यामुळे बाबासाहेबांनी अध्ययनासाठी जे कठोर परिश्रम केले त्याची साद्यन्त माहिती आपणास या प्रकरणात मिळते. या चिंतनशील मनोभूमीतूनच बाबासाहेबांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान तयार झाले असून त्यांचा संक्षिप्त ओनामा आणि दलित-शोषितांसाठी बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या शिक्षणसंस्थेचाही परिचय लेखकाने येथे करून दिला आहे. बडोद्याचे सयाजीराव महाराज यांच्याकडून परदेशातील उच्च शिक्षणासाठी बाबासाहेबांना शिष्यवृत्ती मिळाली होती व कराराप्रमाणे नंतर त्यांना बडोदा संस्थानात नोकरी करावी लागणार असल्यामुळे वडिलांच्या इच्छेविरुद्ध ते बडोद्याला नोकरीत रुजू झाले; परंतु तेथील अस्पृश्यतेच्या दाहक अनुभवामुळे त्यांना मुंबईला परत जावे लागले. महाराजांनी यात लक्ष घातले असते तर तरुण बाबासाहेबांना शासकीय बंगला मिळाला असता किंवा त्यांची दुसऱ्या ठिकाणी राहण्याची सोय झाली असती, असे लेखकाला वाटते. पुरोगामी आणि उदार स्वभावाच्या सयाजीराव महाराजांचे याकडे कसे दुर्लक्ष झाले असा महत्त्वाचा प्रश्न लेखकाला पडतो.

हा प्रश्न खरेच गंभीर असला तरी सोन्याला पुन्हा पुन्हा तावून सुलाखून निघावेच लागते आणि बाबासाहेब कोणत्याही शासकीय सेवेत अडकणारे नव्हतेच म्हणून तसला भयंकर अनुभव त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा तर ठरला; परंतु अस्पृश्योद्धाराच्या चळवळीसाठी तो मैलाचा दगडही ठरला, असेच म्हणावे लागेल.

घराचे रूपांतर ग्रंथालयात करणारे बाबासाहेब हे खरेच एकमेव असे ज्ञानश्री आहेत. त्यांच्या ज्ञानतपस्येचा विस्तृत असा मागोवा लेखकाने येथे घेतला आहे. त्यांची ज्ञानपिपासा सर्व अनुयायासाठी प्रेरणादायी आहे.

याप्रमाणेच एक थोर कायदेपंडित म्हणून बाबासाहेबांच्या या महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूवरसुद्धा लेखकाने प्रकाश टाकला आहे. आपले कायद्याचे ज्ञान त्यांनी केवळ अर्थार्जनासाठी वापरले नसून दलित शोषितांवरील अन्यायाच्या प्रतिकारासाठी पुरोगामी चळवळ व नेते कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी आणि संबंधित निर्मितीद्वारे देशसेवेसाठी बाबासाहेबांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग केल्याचे लेखकाने अनेक उदाहरणांनी निदर्शनास आणून दिले आहे.

भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर आपणा सर्वांनाच परिचित आहेत; परंतु वकिली करतानाही केवळ अर्थार्जनासाठी नव्हे तर त्या कायदेविषयक ज्ञानाचा उपयोग सामाजिक चळवळीच्या गतिमानतेसाठी हवा म्हणून अनेक खटल्यामध्ये त्यांनी सामाजिक क्षेत्रातील लोकांवर गंडांतर आले असताना निस्पृहतेने मदत केल्याची काही महत्त्वाची उदाहरणे लेखकाने विस्ताराने दिली आहेत, जी ऐतिहासिक आणि सामाजिक चळवळीला समजून घेण्यासाठी महत्त्वाची आहेत. त्यामध्ये ब्राह्मणेतर चळवळीतील एक नेते दिनकरराव जवळकर यांच्या देशाचे दुश्मन या ग्रंथाविरुद्धचा खटला, फिलिप स्प्रॅट या ब्रिटिश मार्क्सवादी तरुणाने लिहिलेल्या भारत आणि चीन या पुस्तकाबाबतचा खटला तसेच समाजस्वास्थ्य मासिकाचे संपादक रघुनाथ धोंडो कर्वे यांच्या विरुद्धचा खटला ही काही महत्त्वाची उदाहरणे होत. बाबासाहेब




गरीब अस्पृश्यांचे खटले कोणतीही फीस न घेता लढवत असत याचेही काही उल्लेख येथे आहेत. सुरुवातीला वकिलीचा व्यवसाय सुरू करताना एक अस्पृश्य म्हणून त्यांना सामोरे जावे लागलेल्या कठीण प्रसंगाची माहितीही लेखकाने येथे विस्ताराने दिली आहे. मुळात अस्पृश्योद्धारासाठी आर्थिक सुबत्ता मिळवून देणाऱ्या मोठ्या पदांना नाकारून बाबासाहेबांनी स्वेच्छेने हेतूपूर्वक हा मार्ग निवडला होता याचे भान वाचकाला लेखक करून देतो ते महत्त्वाचे आहे. या ग्रंथात आंबेडकरी चळवळ व कम्युनिस्ट चळवळीचे लेखकाने केलेले तौलनिक मूल्यमापनही लक्षणीय आहे. आतापर्यंत या दोन चळवळीमधील संवादात्मक व विसंवादात्मक बाजूंवर बरेचसे लिहिल्या गेले आहे, असे असतानाही यावर रोखठोक विचार मांडताना मार्क्सवाद व मार्क्सवादी यांची लेखकाने केलेली समीक्षा

त्यांच्या सत्यान्वेषी चिकित्सेचे दर्शन घडवतानाच आंबेडकर निष्ठाही सूचित करते. या अनुषंगाने ब्राह्मणी मानसिकतेतून न सुटलेल्या कम्युनिस्ट श्रीपाद अमृत डांगे आणि कम्युनिस्ट चळवळीच्या प्रचार प्रसारासाठी आपली शाहिरी पणास लावणाऱ्या साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या ऐतिहासिक कार्याची लेखकांनी केलेली मर्मभेदी चिकित्सा लक्षणीय आहे. 1952 च्या पहिल्याच लोकसभा निवडणुकीत बाबासाहेबांचा पराभव करण्यासाठी श्रीपाद डांगे यांनी केलेली नीच अशी राजकीय खेळी आणि कथा कादंबऱ्यांमधून दलितांच्या हालअपेष्टांचे वेधक चित्रण करूनही आंबेडकरी चळवळीचे आकलन होण्यात अण्णाभाऊंना पडलेल्या मर्यादा लेखकाने स्पष्ट केल्या असून केवळ आर्थिक सुधारणांच्या मर्यादित परिघात परिभ्रमित असणाऱ्या मार्क्सवादाच्या तुलनेत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय अशा सर्वांगीण परिवर्तनाच्या लढ्यासाठी प्रेरित करणाऱ्या आंबेडकरवादाची वैशिष्ट्ये लेखकाने खुबीने निदर्शनास आणून दिली आहेत.

आज हिंदू राष्ट्रवाद आणि देशभक्तीच्या नावावर उच्चवर्णीयांच्या धार्मिक संघटना व राजकीय पक्ष देशात जातीय तेढ व सांप्रदायिक द्वेषाला चालना देऊन धार्मिक दंगली घडवून भारताची एकता व अखंडता नष्ट करू पाहत आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाची हमी देणाऱ्या राज्यघटनेला बदलण्याचे षडयंत्र रचल्या जात आहे. त्यांना रामराज्याच्या गोंडस नावाखाली मनुस्मृतीची अंमलबजावणी करायची आहे. अशा बिकट प्रसंगी आंबेडकरानुयायांनी अतिशय सजग राहण्याची आवश्यकता असल्याचे लेखकाने वारंवार सूचित केले आहे. भारताचे ऐक्य आणि परिवर्तन व सर्वांगीण विकासासाठी बाबासाहेबांनी घेतलेल्या अपार कष्टाची आठवण आपणास लेखक करून देतो. या अनुषंगाने या ग्रंथातील अनेक लेख उल्लेखनीय आहेत. त्यापैकी संविधानाच्या प्रत्येक कलमात दिसते बाबासाहेबांची राजनीतिक प्रतिभा बाबासाहेबांचे कुटुंब- नियोजनावरील चिंतन व चिंता बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली धर्मनिरपेक्षता स्वातंत्र्योत्तर भारताविषयीचे बाबासाहेबांचे स्वप्न बाबासाहेबांनी मांडलेली वित्त उत्क्रांती आणि बजेटची संकल्पना इत्यादी प्रकरणे महत्त्वाची आहेत. तथागत भगवान गौतम बुद्ध हे आपले गुरु असल्याचे बाबासाहेबांनी जाहीर केले होते. सभा-संमेलनामधील बाबासाहेबांची भाषणे त्यांच्या ग्रंथ लेखनातील बौद्ध तत्त्वज्ञानात्मक चर्चा आणि 1956 मध्ये त्यांनी आपल्या लक्षावधी अनुयायासह केलेला बौद्धधम्माचा स्वीकार यावरून तथागत भगवान बुद्धांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर, विचारप्रणालीवर आणि त्यांच्या नेतृत्वातील सर्व चळवळीवर किती प्रभाव पडला होता याची प्रचिती येते. संपूर्ण भारत बौद्धमय करण्याची त्यांची तळमळ होती. बुद्धिझम हा त्यांच्यासाठी पूजा-पाठाचा धर्म नव्हता तर भारतीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठीचा सम्यक मार्ग होता. भारताची राज्यघटना लिहिताना मानवी प्रगतीला चालना देणाऱ्या उदात्त तत्त्वांचा अंतर्भाव त्यांनी घटनेतील कलमांच्या परिघात केला होता. स्वातंत्र्य, समता व न्यायाची तत्वे आपण फ्रेंच राज्यक्रांतीमधून घेतलेली नाहीत तर ती बौद्ध तत्त्वज्ञानातून घेतल्याचे त्यांनी सांगितले होते.

भारतीय राष्ट्रध्वजावर आरेखित अशोकचक्र हे खरे तर धम्मचक्रच आहे. या अनुषंगाने लेखकाने बाबासाहेब, बौद्ध तत्त्वज्ञान, लोकशाही, भारतीय राज्यघटना व नव्या युगातील आधुनिक भारत यांच्या समन्वयाची काही लेखांमधून मांडलेली तत्वसूत्रे चिंतन-मननीय असल्यामुळेच उल्लेखनीय आहेत.

एकूणच आंबेडकरी चिंतन या ग्रंथातून बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रभावी व प्रेरणादायी व्यक्तिमत्व आणि त्यांची भारत देश व भारतीय समाजाच्या उत्थानासाठी मांडलेले मौलिक विचार व केलेल्या ऐतिहासिक कार्याचा यशस्वीपणे मागोवा घेण्याचा भीमराव सरवदे यांनी केलेला प्रयत्न हा उल्लेखनीय आणि प्रशंसनीय असा आहे.

**पुस्तकः आंबेडकरी चिंतन लेखकः भीमराव सरवदे**
**प्रकाशकः कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद**
**पृष्ठेः १२८**
**मूल्यः रु. १३०/**

डॉ. भगवान धांडे,
7030706666



## ह.भ.प.नामदेव महाराज ढवळे यांच्यासह ३१ भाविक नर्मदा परिक्रमेसाठी रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** श्री मार्कंडेय ऋषींनी ७ हजार वर्षापूर्वी सर्व प्रथम नर्मदा मातेच्या तिर्थाची पायी परिक्रमा केली होती अशी धारणा आहे. मार्कंडेय ऋषीं हे नर्मदा परिक्रमेचे आद्य प्रवर्तक आहेत. त्या परिक्रमच वैशिष्ट्य असे की त्या ऋषींनी नर्मदा मातेचे नव्हे तर तिच्या उभय तटांवर तिला येऊन मिळणाऱ्या सुमारे ९९९ नद्यांचे धारा- प्रवाह न ओलांडता प्रत्येकीच्या उगमाला वळसा घालून मार्गक्रमण केले. अश्या पूर्णतः शास्त्रोक्त महापरिक्रमेला त्यांना ४५ वर्षे लागली ! स्कंदपुराणात नर्मदेचे वर्णन आले आहे असे म्हणतात. ह्या परिक्रमेचे एकुण २६००कीमी अंतर पायी यात्रा ४महीने १५ दिवसात पूर्ण होते अशी माहीती येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थापक अध्यक्ष ह.भ.प नामदेव महाराज ढवळे चारठाणकर यांनी नर्मदा परिक्रमा प्रस्थान कार्यक्रमात बोलत आसतांना सागितले आहेत, या नर्मदा परिक्रमेस नामदेव महाराज ढवळे,संतोष पांडे,प्रनिता पांडे,,जनार्धन जोशी,प्रमोद मुळे, दिनकरराव आघाव,किसनराव डाके,नागनाथ म. चव्हाण, बालाजी चव्हाण, भागवत चव्हाण, वैभव काचगुंडे, राम जाधव, योगेश वारे, बाजीराव कटारे,कमल कटारे,विजया सोळके, शुभांगी ब्रम्हे,बळीराम चव्हाण यांच्या आदी भाविक नर्मदा परिक्रमेस रवाना होत आसताना, या ससर्वाचा वारकरी शिक्षण संस्था येथे भगवानराव राऊत,नानासाहेब राऊत, मीनाताई नानासाहेब राऊत, डॉ.प्रकाशचंद कोठारी,तहेसिन देशमुख, एकबालोद्दीन काझी, सुधाकर क्षीरसागर, गिरीश जोशी, संतोष काळे, ओमप्रकाश लोखंडे,विठ्ठल चव्हाण, अरुण चव्हाण, बापुराव महाराज जाधव, पंजाबराव महाराज काळे,यांच्यासह आदी गावातील प्रतिष्ठित नागरिक व इतर मान्यवरानी पुष्पहार शाल श्रीफळ देऊन सत्कार केले. यावेळी महिला-पुरुष, भक्तगण मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.

## 76 व्या निरंकारी संत समागमाची भव्य तयारी पूर्ण; निरंकारी संत समागमाला प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** 76व्या वार्षिक तीन दिवसीय निरंकारी संत समागमाची भव्यदिव्य तयारी पूर्ण झाली आहे. सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता जी यांच्या पावन छत्रछायेखाली हा दिव्य संत समागम 28, 29 आणि 30 ऑक्टोबर रोजी संत निरंकारी अध्यात्मिक स्थळ, समालखा येथे संपन्न होणाऱ्या विशाल निरंकारी संत समागमाचा प्रारंभ आजपासून होत आहे. या अनुपम दिव्य समागमामध्ये देश विदेशामधून सहभागी होणारे लाखो भाविक सज्जन 'शांती अंतर्मनातील' याचा परिचय करून घेतील.



समागमाला आलेल्या भाविक सज्जनांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. समागमस्थळी एक विशाल सत्संग पंडाल बांधण्यात आले आहे. भाविकांच्या सोयीसाठी सत्संग पंडालमध्ये अनेक एलईडी स्क्रीन लावण्यात आल्या असून ज्यामुळे दूरवर बसलेल्या सर्व भाविकांना स्टेजवर होणारा प्रत्येक कार्यक्रम स्पष्टपणे पाहता येईल आणि समागमाचा पुरेपूर आनंद प्राप्त करता येईल. प्रतिदिन आलेल्या सर्व भावीकांसाठी सदगुरु माताजी प्रवचनाद्वारे आशीर्वाद प्रदान करतील आणि उपस्थित लाखो भाविक सज्जन अंतर्मनाच्या शांतीचा प्रत्यक्ष अनुभव घेतील. समागम स्थळ हे चार मैदानामध्ये विभागले आहे. या सर्व मैदानात भाविकांसाठी निवासी मंडपांची व्यवस्था करण्यात आली आहे. लंगरच्या सुविधेसोबतच अल्पोपाहारासाठी 22 कॅन्टीनचीही व्यवस्था करण्यात आली आहे. वैद्यकीय व आरोग्य विभागानेही प्राथमिक उपचारापासून उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व्यवस्था केली आहे. याशिवाय, सुमारे 60 देशांतील कायरोप्रॅक्टिक डॉक्टरांचे पथकही समागम स्थळावर आपली सेवा देतील. मिशनच्या साहित्या संबधी अधिक माहितीसाठी प्रकाशन विभागातर्फे अनेक स्टॉल्सही लावण्यात आले आहेत. निरंकारी समागम स्थळावर संत निरंकारी मंडळाची विविध कार्यालये, संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन, समागम कमिटी, सेवादलाचे मध्यवर्ती कार्यालय, वित्त विभाग, पत्र-पत्रिका विभाग, ब्रँच प्रशासन, भवन निर्माण, प्रचार विभाग, प्रेस व प्रसिद्धी विभाग, दूर संचार व रेल्वे आरक्षण केंद्र इत्यादी महत्वाची कार्यालये उभारण्यात आली आहेत.

## मंठ्यातील"पौर्णिमा कवितेची" कविसंमेलन रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** येथील 'आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने "पौर्णिमा कवितेची" या शीर्षकांतर्गत घेण्यात येणारे कविसंमेलन पुढे ढकलण्यात आले आहे. मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यात व महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सद्यस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दि.२९ ऑक्टो.रविवार रोजी मंठा येथे होणारे कविसंमेलन पुढे ढकलण्याचा निर्णय आविष्कार साहित्य मंडळाने एक तातडीची बैठक घेऊन सर्वानुमते घेतला आहे.



# आरक्षणासाठी मराठा बांधव आक्रमक: नेत्यांना गावबंदी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मराठा समाज आरक्षण आणि मनोज जरांगे यांनी सरकारला दिलेले ४० दिवस पूर्ण झाल्यानंतरही आरक्षण न मिळाल्याने पैठण तालुक्यांतील १४० गावांमध्ये राजकीय पुढाऱ्यांना गावबंदी करण्यात आली आहे. या संदर्भात ' चुलीत गेले नेते, अन् चुलीत गेला पक्ष ' असे लिहिलेले बॅनर्स लक्ष वेधत आहेत. याच पार्श्वभूमीवर आपेगाव येथे सर्कल साखळी उपोषण करत दहा गावातील नागरिक उपोषणास हजेरी लावत आहेत. तसेच या सर्वच गावात नेत्यांना गावबंदी करण्यात आली असुन १४० गावांत नेत्यांना गावबंदी झाली आहे. तर १६० गावांत आरक्षणाविषयी साखळी उपोषण सुरू आहे. या साखळी उपोषणानंतर आमरण उपोषणात रुपांतर होणार असून आपेगाव सर्कलमधील आगरनांदुर, मायगाव, वडवाळी,वाघाडी, नायगाव, मायगाव, आनंदपुर, माळवाडी, ज्ञानेश्वरवाडी, सोलनापुर, अखातवाडा, करजखेड, नारायणगाव या गावात कँडलमार्च काढुन निषेध केला जात आहे.

## आळंद येथील सरपंच कैलास गायके यांच्या हस्ते घंटागाडीचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील आळंद येथे घंटागाडी आली हो, कचरा गाडी आली...' असे सुमधूर गाणे कानावर पडले, की नागरिकांची पावले कचरा घेऊन गाडीच्या दिशेने पडत आहेत. नाव घंटागाडी असले, काम कचरा संकलनाचे असले, तरीही अभिनव संकल्पनेमुळे लोकांना त्रासदायक न ठरता मनोरंजनातून घातलेली स्वच्छतेची साद आळंद करांना भावू लागली आहे. अलीकडे मात्र शहरात नवीन कंपनीमार्फत कचरा संकलनाचे काम सुरू होते त्याच पाठोपाठ आता गावात सुध्दा कचरा संकलन करण्याचे काम ग्रामपंचायत आळंद यांनी घेतले आहे. फुलंब्री तालुक्यातील आळंद येथील ग्रामपंचायत १५ वित्त आयोग तुन नवीन घंटा गाडी आणून त्यांचे उद्घाटन मा.सरपच कैलास गायके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित उपसरपंच रामेश्वर चोपडे ,ग्रामसेवक के पी जंगले,सदस्य सुनिल तायडे,योगेश खिल्लारे,अलीम शेख, क्षीकांत भालेराव, दिपाली तायडे,शितल खिल्लारे, अलका गायकवाड, प्रभा शिंदे,साहिन शेख, रुखमन पायगवहान व समस्थ गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.





## राहेरी बुद्रुक येथे राजकीय नेत्यांना गाव बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**सिंदखेडराजा :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यात असलेल्या राहेरी बुद्रुक येथे मराठा समाजाला जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत सर्वच राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना गावबंदी करण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटलांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी सुरू केलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मराठा समाज बांधवांनी एक मराठा लाख मराठा च्या घोषणेचा जयघोष करीत राहेरी बुद्रुक येथे गावाच्या प्रवेशद्वारावर, "मराठा आरक्षण मिळेपर्यंत सर्वपक्षीय आमदार,खासदार, पुढारी यांना गावबंदी करण्यात येत आहे. विनाकारण आमच्या गावात येऊन अपमान करून घेऊ नये" अशा प्रकारचा फलक लावुन गांवकरी अधिकच आक्रमक झाले आहेत.गांवकर्यांनी गावबंदीविषयक आक्रमक भूमिका घेतल्याने तालुक्यात आरक्षणाचे आंदोलन पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. यामुळे सिंदखेडराजा तालुक्यात अनेक गावांमध्ये नेत्यांना गावबंदी होण्याची शक्यता आहे. मराठा समाजाला सरसकट आरक्षण द्यावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी लढा उभारला असून या लढ्याला तालुक्यातील मराठा समाजाकडुन मोठा पाठिंबा मिळत आहे. या गांवबंदीमुळे लोकप्रतिनिधींची अधिकच कोंडी होण्याची शक्यता आहे,गाव बंदी आता तालुक्यामध्ये पसरण्याची शक्यता आहे,त्यामुळे तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये राजकीय नेत्यांना मराठा समाज बांधव प्रवेश देणार का? हेच पाहावे लागणार आहे.यावेळी ग्रामस्थ मदन देशमुख यांनी बोलतांना सांगितले की जोपर्यंत आम्हाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत कोणत्याच पक्षाच्या नेत्यांनी गावात येऊ नये,अन्यथा गावांमध्ये आल्यास त्यांचा अपमान करण्यात येईल.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

लय भारी
# सुगरण



सौ. सविता अ. खंडगावकर, नांदेड.
संपर्क क्र. 90283 25973



## कांदा पकोडे

आधुनिक केसरी

प्रथम कांदा लांब आकारात बारीक कापून घ्यावा. एका मिक्सिंग बाऊल मधे बारीक लांब चिरलेला कांदा त्यावर जीरे, तिखट,मीठ, ओवा, तीळ,धने पूड, लहसून - मिरची पेस्ट आणि लिंबू रस सर्व साहित्य टाकून छान मिक्स करून घ्या. कांद्याला सगळा मसाला प्रोपर्ली कोट करून घ्या. आणि 10 मिनटे मिश्रण तसेच राहू द्या. ज्या मुळे कांद्याला छान पाणी सुटेल. नंतर कांद्याच्या सारणा मधे बेसन टाकून छान मिक्स करून घ्यावे. गरेजनुसार पाणी वापरा. मला 4 कांद्यासाठी जवळ जवळ 1 कप बेसन लागले आणि मी पाणी थोडेच यूज केले (2 टेबलस्पून) या स्टेज ला सोडा मिश्रण मधे घालू शकता ते पूर्णपणे ऐच्छिक आहे. मिश्रण थोडे घट्ट भिजवायच म्हणजे कांद्या मुळे पकोडे छान क्रिस्पी होतात आणि सोडा टाकायची गरज राहत नाही. कांदा गॅसवर कढई तेल तापायला ठेवायचे, तेल तापले की त्यांमध्ये पकोडे सोडायचे, पकोड्याची साईज तशी मोठीच असते पण आपल्या आवडी नुसार ठेवायची. गॅस ची फ्लेम मिडीयम ठेवायची. पकोडे छान गोल्डन रंग येई पर्यंत तळायचे. सर्वांच्या आवडीचे गरमागरम क्रिस्पी अशे कांदा पकोडे तयार आहेत सर्व्हिंग साठी तेही झटपट.

# मराठा आरक्षणासाठी राज्यभर सायकल प्रवास



आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**निरा :** वयाच्या ५८ व्या वर्षी बारामती (वसंतनगर ) येथील राजेंद्र पाटील यांनी मराठा आरक्षणा साठी महाराष्ट्र भर सायकलवर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. राजेंद्र पाटील यांनी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांना पाठींबा दर्शविला असून मराठा समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी राजेंद्र पाटील बारामती येथून निघालेले असून ते कोल्हापूरच्या दिशेने सायकलवर चाललेले आहेत. ते निरेच्या हद्दीत आल्यानंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे पुणे जिल्हा युवाउपाध्यक्ष अमोल साबळे, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ पुणे जिल्हा समनवयक सुभाष जेधे यांनी त्यांचे स्वागत केले.तसेच त्यांनी सायकलवर जो प्रवास सुरु केलेला आहे.त्यास पाठींबा त्यांनी दर्शविला. यावेळी एक मराठा लाख मराठा तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला.



# बनावट देशी, विदेशी दारु वाहतूक करणाऱ्या इसमास पोलिसांकडून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** राज्य उत्पादन शुल्क छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शना खाली राज्य उत्पादन शुल्क क-२ विभाग (सिल्लोड) छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक २५/१०/२०२३ रोजी कार्यालयात उपस्थित असतांना खबर मिळाली की, दिपक अशोक धनगर नामक इसम प्रथम दर्शनी बनावट देशी, विदेशी दारुसाठा हा एक पांढ-या रंगाची टाटा सफारी चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. १५ बी.एक्स. ८०६४ मधून बाबरा फुलंब्री रोडने घेवून जाणार आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने बाबरायेथील हॉटेल गुलमोहर समोरील रोडच्या कडेला सापळा लावला असता काही वेळाने पांढऱ्या रंगाची टाटा सफारी चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. १५ बी.एक्स. ८०६४ येतांना दिसली. सदर वाहनास अडवून तिची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यात प्रथमदर्शनी बनावट विदेशी २) इम्पेरिअल बल्यु व्हिस्की १८० मि.ली. क्षमतेच्या विविध बॅचेसच्या एकूण २४० सिलबंद दारू बाटल्या एकूण ०५ कागदी खोक्यात २) रॉयल स्टंग किस्की १८० मि.ली. क्षमतेच्या विविध पंचेसच्या एकूण ४८० सिलबंद दारू बाटल्या एकूण १० कागदी खोक्यात ३) रॉयल चॅलेंज व्हिस्की २८० मि.ली. क्षमतेच्या विविध बॅचेसच्या एकूण २४० सीलबंद दारु बाटल्या एकूण ०५ कागदो खोक्यात ४) देशी दारा भिंगरी संत्रा १८० मि.ली. क्षमतेच्या एकूण ४८० सिलचंद दारु वाटल्या एकूण १० कागदी खोक्यात मिळून आल्या. अशा देशी, विदेशी मद्याच्या एकूण १४४० बाटल्या मिळून आल्या. त्याची किंमत रु. १.९९,२००/- असून वाहनासह किंमत रु. ६,९९,२००/- (सहा लाख नव्यान्नव हजार दोनशे रुपये मात्र) किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दिपक अशोक धनगर याच विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क क.२ विभाग (सिल्लोड) औरंगाबाद या कार्यालयात गुन्हा नोंद करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त मा. विजय सुर्यवंशी साहेब, सुनिल चव्हाण साहेच, संचालक, प्रदिप पवार साहेब, विभागीय उपायुक्त छत्रपती संभाजीनगर, संतोष झगडे साहेब, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क छत्रपती संभाजीनगर, श्री. शरद फटांगडे साहेब, उप अधोक्षक,श्री. एस. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्क के विभागाचे निरीक्षक एस. एन. डहाके दुम निरीक्षक एस. एस. पाटील, स.दु.नि. आर.एम. भारती, जवान सर्वश्री एम. एच. बहर, बी.सी. किरवले. एस. एस. खरात, कि.बी. मकरंद, ए.पी. नवगिरे यांनी केली.

# फुलंब्री पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व अवैध धंदे तत्काळ बंद करा : रिपाइं (ए)

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करावा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ए पक्षाच्या महिला तालुका अध्यक्ष पुष्पा मोरे यांनी औरंगाबाद विभागीय आयुक्त, औरंगाबाद पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद जिल्हाधिकारी, फुलंब्री तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांच्या सह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. तर यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुलंब्री पोलीस ठाण्याच्या हद्दीतील स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने अनेक दिवसांपासून बेधडक पणे मोठ्या प्रमाणात अवैध धंदे व जुगार अड्डे सुरू आहे. यामध्ये अवैध धंदे वाल्यांकडुन पोलीस अधिकार्यांच्या नावाखाली पोलीस कर्मचारी संबंधित विभागाच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी च्या मिलीभगतने फुलंब्री शहरात ऑनलाइन मटका ऑनलाइन चक्री, ऑनलाइन लॉटरी कल्याण मुंबई मटका ऑनलाइन झन्ना मन्ना पत्यांचे क्लब काळा पिवळा अवैध देशी विदेशी दारू अशा विविध प्रकारचे जुगार अड्डे फुलंब्री शहरातील बाजारगल्ली मध्ये आठ ते दहा दुकाने थाटलेली आहे. फुलंब्री चा बसस्थानक, फुलंब्री टी पॉइंट, औरंगाबाद जळगाव महामार्गावरील दुकाने थाटली आहेत. ही सर्व दुकाने स्थानिक पोलीस अधिकार्यांच्या अशीर्वादाने सुरू आहे. फुलंब्री शहरात भुरटे चोर वाढले आहे त्या कडे दुर्लक्ष करत आहे. या संबंधित कारभाराकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देत फुलंब्री शहरातील अवैध धंदे बंद करा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ए आघाडी पक्षाच्या फुलंब्री तालुका अध्यक्ष पुष्पा मोरे यांनी केली.

# फतियाबादच्या उपसरपंच महिलेचा विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** दि. २५ रोजी फतियाबाद येथील उपसरपंच महिला यांना ठेकेदार नारायण कांबळे यांनी फोन करून गोकुळवाडी येथील हनुमान मंदिराजवळ गट्टू बसवण्याचा सरकारी काम बघण्यासाठी बोलविले होते. महिला व त्यांचे पती असे दोघे हनुमान मंदिराजवळ गेलो असता गावातील प्रदीप अजबसिंग जारवाल, संजयसिंग केसरसिंग जारवाल, गुलाब भाऊसिंग सुलाने हे तेथेच उभे होते. त्यांनी शिवीगाळ करून म्हणाले की तू येथे कशाला आली. त्यावर मी त्यांना म्हणाले की मी उपसरपंच आहे. ठेकेदाराने मला काम बघण्यासाठी बोलविले म्हणून पाहणी करण्यासाठी आले, असे बोलत असताना त्यांनी मारहाण करून प्रदीप जारवाल यांने साडीचा पदर ओढला तसेच संजयसिंग व गुलाब यांनी अश्लिलरित्या अंगाला हात लावला. त्यावेळी पती वाचविण्यासाठी आले असता त्यांना सुध्दा मारहाण करून जिवे मारु अशी धमकी दिली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये विनयभंग चा गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

# ब्रिक्स हुमन राईट्स मिशनचे मुख्यमंत्री यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय भट्राचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स हुमन राईट्स मिशनच्या वतीने मराठा समाजाला विना विलंब तत्काळ आरक्षण द्यावे त्याचबरोबर मराठा समाजाच्या भावना दुखावणारे वादग्रस्त विधान करणारे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना अटक करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करा हिंगोली जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली. दिनांक 27 रोजी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स हुमान राईट मानव अधिकार मिशनच्या माध्यमातून हिंगोली जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी मराठा समाजाला आरक्षण देऊन मराठा समाजाच्या मागण्या मान्य करून गुणरत्न सदावर्ते यांना तत्काळ अटक करून योग्य ती कार्यवाही करावी. मराठा बांधवांच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केलेला आहे. मराठा बांधवांच्या हक्कासाठी आरक्षण मिळावे म्हणून अखिल भारतीय भट्राचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स हुमन राईट्स मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागण्या मान्य करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र मधील प्रत्येक गावामध्ये जिल्ह्यामध्ये तालुका मधील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठा समाजाचे होत असलेले साखळी उपोषण व धरणे आंदोलन या मध्ये सहभागी होऊन सकाळ मराठा बांधवासह सहभागी व्हावे मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे मराठी समाजाला न्याय मिळालाच पाहिजे कारण हि मागणी रास्ता असून मराठा समाजाला आरक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे म्हणून मराठी समाजाच्या सर्व मागण्या मान्य करून मराठा समाजाला आरक्षण देऊन न्याय द्यावा हि विनंती. मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून मराठा समाजाच्या मागण्या तात्काळ मान्य करून समाजाला न्याय द्यावा अशी हिंगोली जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# गांजाची अवैध लागवड करणाऱ्या व्यक्तीवर आष्टीत कारवाई; 22 हजारांचा माल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**कैलास चव्हाण**

**परतूर :** गुप्त माहीतीदारा मार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे आष्टी हथीतील मौजे येणोरा शिवारातील गट नं. 57 मध्ये इसम नामे लक्ष्मण निवृत्ती बोराडे याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विना परवाना बेकायदेशीर रित्या गांजाचे झाडांची लागवड करून त्यांचे संवर्धन व जोपासना करीत आहे, अशी खात्रीलायक माहीती मिळालेवरुन मा. पोलीस अधीक्षक साहेब, जालना श्री. बलकवडे व सुरेश बुधवंत, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, परतुर यांचे मार्गदर्शनाखाली आष्टी पोलीसांनी पथक तयार करुन तहसील कार्यालय परतुर येथील एक सक्षम अधिकारी व दोन शासकीय पंचासह मौजे येणारा शिवारातील गट नं. 57 जावून छापा मारला असता सदर ठिकाणी इसम नामे नामे लक्ष्मण निवृत्ती बोराडे रा. बोराडे गल्ली मंठा ह.मु. येणोरा ता. परंतूर जि. जालना हा मिळून आला. आम्ही व सोबत असलेल्या स्टॉफने सदर शेतीची पाहणी केली असता सदर इसमाचे



त्याचे मालकीचे शेतात लहान-मोठे एकुण 173 झाडे बननी 03 क्विंटल 69 किलो ग्राम किमती अंदाजे 22,14,000/- असे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विना परवाना बेकायदेशीर रित्या गांजाचे झाडांची लागवड करुन त्यांचे संवर्धन व जोपासना करीत असल्याने निर्दशनास आले. सदर गांजाचे झाडाचे शासकीय पंचासमक्ष वजन करुन व सविस्तर पंचनामा करून तपासकामी जात करण्यात आले असुन इसम नामे लक्ष्मण निवृत्ती बोराडे रा. बोराडे गल्ली मंठा ह.मु. येणारा ता. परतुर जि. जालना यास ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत. सदरील कारवाई मा. पोलीस अधीक्षक जालना बलकवडे साहेब यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर सुरेश बुधवंत साहेब. स.पो.नि. तथा प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन आष्टी सोमनाथ नरके, सपोउपनि मुंढे, भिमराव राठोड, राणा पांढरे, दिपक पवार, सज्जन काकडे, विनोद वाघमारे, आण्णा लोखंडे, राजु काळे, इमरान तडवी, शुभम ढोबळे यांनी पार पाडली आहे.

# 'उदे गं अंबे उदे'च्या गजरात दुर्गामूर्तींचे विसर्जन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे भक्तिमय वातावरणात दुर्गामातेला निरोप जय सरस्वती तरुण मित्र मंडळाचे वतीने बुधवारी दुर्गामातेचे विसर्जन करण्यात आले अशी माहिती जय सरस्वती तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष भारत नप्ते यांनी बोलताना सांगितले. दुर्गामातेचेः 'उदे गं अंबे उदे'चा जयघोष, ढोल-ताशांचा गजर, फुलांचा वर्षाव मंगळवारी व बुधवार असे दोन दिवस सावळदबारा येथील जय सरस्वती तरुण मित्र मंडळ, जय बजरंग मित्र मंडळ,जय भवानी मित्र मंडळ व जय महाराणा प्रताप तरुण मित्र मंडळांनी दुर्गामातेचे मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी चौका चौकात रांगोळ्या काढून चौक सजविले होते अशा भक्तिमय वातावरणात दुर्गामातेचे शांततेत भाविकांना दर्शन झाले पाहिजेत करीता दोन दिवस वेगवेगळ्या मिरवणूक काढून शांततेत मातेला निरोप दिला. दुपारी तीन वाजता सुरू झालेला विसर्जन मिरवणूक सोहळा तब्बल सहा तास रंगला. जय सरस्वती मंडळाच्या दुर्गामूर्तीचे सर्वात शेवटी सायंकाळी आठ वाजता संदीप आप्पा काळे यांच्या शेतातील विहिरीत दुर्गामातेचे विसर्जन करण्यात आले. दुर्गामूर्तींना भाविकांकडून भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. प्रतिष्ठापनेपासून सलग आठ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.




# आदिवासी बांधवांना शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळावा

## वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आदिवासी समुदायायासाठी असलेली शबरी घरकुल योजना ही ग्रामीण भागात सुरू होती पण या योजनेचा लाभ नागरी भागातील आदिवासी बांधवांना होत नव्हता. ही बाब लक्ष्यात घेत राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी आदिवासी विकास मंत्री यांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडूनच शबरी आदिवासी घरकुल योजने अंतर्गत घरकुले मंजूर करण्यात यावी अशी सविस्तर पत्र लिहत मागणी केली आहे. शबरी आदिवासी घरकुल आवास योजनेची कार्यपध्दती तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये ग्रामविकास विभागाची इंदिरा आवास योजना, गृह निर्माण विभागाची घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची रमाई घरकुल योजना आदींची अंमलबजावणी शहरी व ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून करण्यात येते. मात्र आदिवासी विभागाची शबरी घरकुल आवास योजना मात्र नागरी स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत देण्यात आलेली नाही. ग्रामीण भागात शबरी आदिवासी घरकुल योजना ग्रामीण स्वराज्य संस्था राबवत आहेत. परंतु शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था शबरी आदिवासी घरकुल योजना राबवत नाहीत. त्यामुळे शहरी भागातही नगर पंचायत, नगर परिषद, महानगरपालिका क्षेत्रात शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्याची जबाबदारी ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्याची आवश्यकता आहे, याकडे सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे.

**लक्षांक निश्चित करावा :** चंद्रपूर जिल्ह्यात अनुसूचित जमातीची जवळपास ९ टक्के लोकसंख्या शहरी भागात वास्तव्यास आहे. शहरी भागात राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लक्षांक हा अपुरा असतो. ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागालाही लक्षांक ठरवून देण्याची आवश्यकता असल्याचे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी पत्रात म्हटले आहे.

**समिती गठीत व्हावी :** शहरी भागात रमाई आवास योजनेसाठी गठीत असलेल्या समितीनुसार शबरी आवास (शहरी) योजनेसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी, तसेच या समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून संबधित जिल्ह्याचे प्रकल्प अधिकारी असावेत, शबरी आवास योजनेचा लक्षांक निश्चित करताना ग्रामीण व शहरी लोकसंख्येनुसार वेगवेगळे लक्षांक निश्चित करण्यात यावेत, अशाही सूचना ना. श्री सुधीर मुनगंटीवार यांनी या पत्राद्वारे केल्या आहेत.

# हरभऱ्यावर रोग नको तर पीकपेरा बदलावा

## परतीच्या पावसाअभावी रब्बीवर संकट; धर्माबाद तालुक्यातील स्थिती

आधुनिक केसरी न्यूज


**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** यावर्षी परतीचा अवकाळी पाऊस बरसला नसल्याने धर्माबाद शहरासह ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. ऑक्टोंबर महिना संपत आला असला तरी तालुक्यात कुठेही पाऊस पडलेला नाही. ऑक्टोंबर हिट चा परिणाम सर्वत्र जाणवत आहे. मागील काही दिवसांपासून पडणाऱ्या कडक उन्हामुळे जमिनीतील ओल झपाट्याने कमी होत आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने रब्बी पिकांसाठी शेतकरी धजावत नाहीत. जमिनीत ओलावाच नसल्यामुळे रब्बी पेरणीच्या आशा संपल्या असल्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. त्यामुळे चिंतेत भर पडली आहे.

तसेच दरवर्षी हरभरा पिकावरील पडणाऱ्या मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पीक पेरा बदलणे आवश्यक आहे.

धर्माबाद तालुक्यात रब्बी हंगामासाठी 23 हजार हेक्टर क्षेत्र पेरणी योग्य आहे. त्यापैकी 21 हजार 500 हेक्टर क्षेत्रावर मागील वर्षी हरभरा पिकाची पेरणी झालेली होती. म्हणजे रब्बी हंगामात धर्माबाद तालुक्यात हरभरा हे मुख्य पीक आहे. परंतु अलीकडे हरभऱ्यावर मर रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. हा रोग फुजारियम ऑक्सीस्पोरम या बुरशीमुळे होतो. सदर बुरशी जमिनीत वाढते मुळाद्वारे पिकामध्ये प्रवेश करून पिकांच्य अन्न नलिकेत वाढ करते. त्यामुळे पिकांना जमिनीतून अन्नद्रव्य घेता येत नसल्याने पीके कुळमुडून वाळतात. सदर रोग दरवर्षी हरभरा त्याच क्षेत्रामध्ये घेतल्यामुळे वाढत जातो. ही बुरशी जमिनीत वाढत असल्याने यावर नियंत्रण करण्यासाठी जमिनीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. दरवर्षी मर आलेल्या क्षेत्रावर हरभरा न घेता पिकाची फेरपालट करणे आवश्यक आहे. यासाठी रब्बी हंगामामध्ये ज्वारी, करडई किंवा जवस या पिकाची मर रोगाचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या क्षेत्रांमध्ये पेरणी करण्यात यावी. पोस्टिक तृणधान्य असल्यामुळे ज्वारीची मागणी वाढत आहे. तसेच बाजारभावी चांगला ज्वारीस प्राप्त होत आहे. करडी पिकासाठी प्रक्रिया करून तेल विक्री केल्यास चांगले उत्पन्न शेतकऱ्याला मिळू शकते. तसेच जवस या पिकासाठी बाजारात चांगली मागणी आहे व जवस या पिकास कोणतीही फवारणी करण्याची गरज नाही किंवा जनावरे या पीकास खात नाहीत. त्यामुळे शेतकऱ्याच्या दृष्टीने फायदेशीर पीक आहे व कमी कालावधीमध्ये तयार होते. मर या रोगावर उपाययोजना करण्यासाठी ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स एकरी चार किलो किंवा चार लिटर या जैविक बुरशीनाशकाची जमीनद्वारे उपाययोजना करणे आवश्यक आहे .यासाठी ट्रिकोडर्मा किंवा बायोमिक्स चार किलो/लिटर बुरशी दहा ते वीस किलो कुजलेल्या शेणखतामध्ये टाकून झाडाखाली ओलसर अवस्थेत चार ते आठ दिवस ठेवून सदर शेणखत जमिनीत ओलावा असताना शेतात मशागत/पाळी घालण्याचे वेळी जमिनीत टाकून जमिनीमध्ये गाढणे आवश्यक आहे. यामुळे मररोगाची बुरशी नियंत्रणात येऊ शकते सदर प्रक्रिया सतत दोन ते तीन वर्ष करणे आवश्यक आहे. यामुळे आपणास खात्रीशीर शंभर टक्के मर या रोगाचा उपाय होऊ शकतो. बियाणे पेरणी अगोदर प्रथम हरभरा बियाण्यास कर्बांक्सीन + थायरम (विटावॅक्स पावडर) ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीज प्रक्रिया करावी. त्यानंतर रायझोबियम, पी एस बी व ट्रायकोडर्मा प्रत्येकी 10 मिली प्रति किलो बियाणे साठी बीज प्रक्रिया करून सावलीमध्ये सुकवून लगेच पेरणी करणे गरजेचे आहे.

**शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार :** धर्माबाद शहरासह ग्रामीण भाग हरभरा या पिकासह ज्वारीसाठीही प्रसिद्ध आहे. त्यामुळे पिकाच्या फेरपालटमध्ये ज्वारी पिकाचा मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्याने पेरा वाढवून मर रोगाचा प्रादुर्भाव कमी करता येतो. तसेच करडी व जवस याही पिकास अलीकडे मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे या पिकाखालचा पेरा वाढल्यास शेतकऱ्यांना निश्चितच फायदा होणार आहे.



दीर्घकालीन बुरशी नियंत्रणासाठी जमिनीवरील उपचाराबाबत शेतकऱ्यांनी टप्प्याटप्प्याने काही क्षेत्र जमीन प्रक्रियेसाठी घेऊन या रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यास उपयोगी होऊ शकतो. तसेच ज्या शेतकऱ्याकडे वरील प्रक्रिया करणे शक्य नाही. त्यांनी हरभरा पिक पेरते वेळेस बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी.
**- सुरेंद्र पवार, तालुका कृषी अधिकारी धर्माबाद.**

